# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०/०२/२०१० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक २०/०१/२०१० रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.२.१० वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त, डॉ.पुरूषोत्तम भापकर,**भा.प्र.से.**,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
११. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.सौ.विजया संजय बनकर
१५. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
१६. स.स.श्रीमती मसरत बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद
२५. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२६. स.स.सौ.मिटकर शोभा हरिश्चंद्र
२७. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
२८. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
२९. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३०. स.स.श्री.अ.रशिद खान मामु हमीद खान
३१. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल

३२. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३३. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३४. स.स.श्री.खान मुजीब मिर आलम खान
३५. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३६. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
३७. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
३८. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३९. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
४०. स.स.श्री.मोतीवाला अशरफ युनूस
४१. स.स.श्री.त्र्यबंक तुपे
४२. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४३. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४४. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
४५. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४६. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४७. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४८. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
४९. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५०. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५१. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५२. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५४. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५५. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५६. स.स.सौ.ससाणे सरिता अशोक
५७. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५८. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
५९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६०. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६१. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६२. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६४. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६६. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६७. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
६८. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
६९. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले
७०. स.स.श्री.विनोद सोनवणे

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले

०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**<u>चर्चा :</u>**

श्री.अ.रशिद खान : पुणे येथील बॉम्बस्फोट झाला त्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी व झालेल्या आतंकवादी घटनेचा निषेध करण्यांत येतो.

श्री.रेणुकादास वैद्य :यास माझे अनुमोदन आहे.

श्री.गजानन बारवाल :या घटनेचा निषेध करावा मृतांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

मा.महापौर :अनेक लोक या घटनेत मृत्यूमुखी पडले या घटनेचा सभागृह निषेध करते. सर्वांनी श्रेध्दाजंलीसाठी उभे रहावे.

याचवेळी पुणे येथील बॉम्बस्फोटात मृत्यू पावलेल्यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.मो.जावेद मो.इसहाक :शहरात यापूर्वी दररोज पाणी येत असे एक दिड वर्षापूर्वी १ दिवसाआड पाणी केले आता ३ दिवसा आड पाणी येते ते ही कमी दाबाने आता उन्हाळयाचे दिवस आले माझे वार्डात ३-४ दिवसापासून पाणी का आले नाही खुलासा घेण्यात यावा.

श्री.संजय केनेकर :ही शेवटची सभा व यानंतर आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे.सन २००५-१० या पाच वर्षात शहरासाठी जी जी विकास कामे सर्वांनी मिळून केली जे पदाधिकारी या कार्यकाळात होवून गेले त्यांचे व सर्व सदस्यांचे,अधिकारी यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचा अभिनंदन करावे.व भविष्यातही असेच सहकार्य करण्याची अपेक्षा करतो.

श्री.प्रशांत देसरडा :या पाच वर्षात जे महापौर होवून गेले त्यांचे अभिनंदन करतो या सभागृहातून नुसते नगरसेवकच नव्हते तर त्यातून काही सदस्य आमदार झाल्याचे चित्र समोर आले.सभागृह अभिनंदनास पात्र आहे वेगवेगळया पक्षाचे सदस्य असले तरी एक जुटीने गेल्या ५ वर्षात कामे केली. विदयमान महापौर यांना सतत अडीच वर्ष काम करण्याचे भाग्य मिळाले. अधिकारी कर्मचारी यांना अनेक वेळा जास्तीचे व रात्री बेरात्री काम करावे लागते कौतुकास पात्र आहे त्यांचेवर आरोप प्रत्यारोप केले गेले असेल कारण परीस्थिती तशी असते ज्योतिनगर येथे स्वीमींग पूल, शहरातील मुख्य रस्ते करण्यास स.सदस्यांचा,प्रशासनातील अधिकारी याचा सहकार्य लाभले गेल्या पाच वर्षात जे आयुक्त येवून गेले त्यांचे सहकार्य चांगले मिळाले या सर्वांचे तसेच पत्रकार बंधुचे आभार व्यक्त करतो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :गेल्या ५ वर्षात या सभागृहातील सदस्यांमधून पदाधिकारी होवून गेले. यासभागृहातील काही स.सदस्य आमदार,खासदार झाले जे नशीबवान असतात ते महापालिकेत निवडून येतात विकास कामात सर्वांचे सहकार्य लाभले अभिनंदनाचा ठराव ठेवला मंजूर करावा.

श्री.अ.रशिद खान :गेल्या ५ वर्षात जे महापौर व इतर पदाधिकारी झाले त्यांनी तसेच जे आयुक्त म्हणून काम केले तसेच प्रशासनातील अधिकारी यांनी त्यांचेवर नाराजीचा सुर होत असतांना विकास कामास सहकार्य केले.सर्वेंचे अभिनंदन करावे.

श्री.विनायक पांडे :माझे वार्डात अनेक ऐतिहासीक तसेच प्रेक्षणीय स्थळे आहेत वार्डातील विकास या सभागृहाच्या सहकार्याने प्रशासनातील अधिकारी कर्मचारी

यांचे सहकार्याने झालेला आहे हनुमान टेकडीचा जीर्णोध्दार होत असतांना सिमेंटच्या रस्त्याचे काम केले,गोगाबाबा ते निपंटनिरजन भागात पेव्हरब्लॉक बसविले तसेच या वार्डातील ९५ टक्के पाणी पुरवठा सुरळीत करण्यास प्रशासनाला यश आले त्याबध्दल सर्वांचे अभिनंदन करतो.

श्री.सलीम खान :५ वर्षात जे ही विकास कामे झाली त्यामागे सर्व पदाधिकारी अधिकारी जे आयुक्त येवून गेले त्यांचे सहकार्य लाभले सर्वाचे अभिनंदन करावे.

श्री.संतोष जेजूरकर :पाच वर्षात विकास कामे करण्यासाठी सर्वाचे सहकार्य मिळाले अभिनंदन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :चांगला प्रस्ताव स.सदस्य श्री.केनेकर संजय यांनी ठेवला मान्य करावा. विकास कामासाठी सर्वानी मदत केली धन्यवाद देतो आपणही अडीच वर्षाच्या कार्यकाळात गुंठेवारीचा प्रश्न पुडलिंकनगरचा पाण्याचा प्रश्न व इतर विकास कामात चांगला सहभाग घेतला त्याबध्दल आपलेही अभिनंदन करतो.

श्रीमती कला बोरामणीकर: विकास कामात सर्वाचे सहकार्य मिळाले. ५ वर्षातील सर्व आयुक्तांचे अभिनंदन, शहर स्वच्छतेत बदल दिसत नाही.रॅमकीने अजून एकही अटी व शर्ती पूर्ण केल्या नाही.नाला,घाण व डास आहेत.रॅमकीवर ॲक्शन घ्यावी. आणखी स्वच्छतेकडे लक्ष देण्याची गरज आहे सर्वांचे अभिनंदन करते.

सौ.लता दलाल :५ वर्ष कार्यकाळ संपत आला शेवटीची सभा असेल भावना व्यक्त केल्या १९८८ पासून या सभागृहात मी सदस्य असून वेगवेगळे अनुभव येत गेले. या बॉडीच्या कार्यकाळात मोठी आर्थीक समस्या जाणवली प्रत्येक स.सदस्य निवडून आल्यानंतर वार्डाचा विकास होण्याची नवीन काही करण्याची अपेक्षा करतो परंतु काही कामे होवू शकली नसेल माझे वार्डातील वीर बाजीप्रभू यांचा पुतळा बसण्याचे स्वप्न अर्धवट राहिले. दुसरी खंत माझे वार्डात रात्री ११-०० वा. पाणी येते तेही पुरेसे नाही, तिसरी खंत तिसऱ्यांदा निवडूण आल्यानंतर महापौर होण्याचे माझे स्वप्न पूर्ण झाले नाही. हरकत नाही पुन्हा प्रयत्न करू गेली पाच वर्ष चांगली गेली सर्व सदस्यांचे अधिकाऱ्याचे,पत्रकाराचे मनपुर्वक अभिनंदन धन्यवाद देते.

श्री.संतोष खेंडके :पहिल्यांदा नगरसेवक झालो होतो माझा वार्ड ग्रामीण भागाप्रमाणे होता परंतु सर्वांच्या सहकार्याने सर्व सुविधा गेल्या ५ वर्षात करू शकलो सर्वांचे आभार व्यक्त करतो.

श्री.मिलींद दाभाडे :गेल्या ५ वर्षात सिध्दार्थ उदयान येथे भगवान गौतम बुध्दाची मुर्ती बसविण्याचा ऐतिहासीक निर्णय झाला सदरचे काम शेवटच्या टप्प्यात असून १४ एप्रिल पर्यत या मुर्तीचे अनावरण व्हावे.अशी सर्वाच्या वतीने विनंती करतो. या सभागृहात बॉडी व प्रशासनाचे जे मतभेत झाले ते वैयक्तीक पातळीचे नसून शहराच्या विकासासाठी सामाजीक कार्यासाठी होते.प्रशासनाचे मोठे मार्गदर्शन लाभले तसेच वार्डात अनेक विकास कामे करण्यास स.सदस्य सक्षम झाले. सर्व अधिकारी पदाधिकारी स.सदस्य पत्रकार यांचे सर्वाचे सहकार्य लाभले मनापासून आभार व्यक्त करतो. अनावधानाने काही चुक झाली असेल दिलगीरी व्यक्त करतो. सर्वांना धन्यवाद.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जे गेल्या ५ वर्षात इतिहासात नोंद होईल अशा अनेक बाबी आहे. बीओटीचे नवीन दालन झाले,सीटी बस सेवा सुरू झाली काही वार्डात १० लक्ष तर काही वार्डासाठी काहीच खर्च केले नाही या सभागृहातील काही सदस्य आमदार झाले अडीच वर्ष कार्यकाळ आपल्याला मिळाला सेना-भाजपाची सत्ता असतांना आघाडीतील पक्षाला दोन वेळा स्थायी समिती सभापती पद मिळाले कॉग्रेस पक्षाला सेना भाजप मदत करण्याचाही इतिहास घडला आहे. जेथे आर्थीक लॉस होत असे तेथे थांबविण्याचे काम केले यासाठी पत्रकार बंधुनी मदत केली. नुकतेच ७ कोटीच्या टेंडरमध्ये पुन्हा रिकॉल करून मा.आयुक्त व संबधीत अधिकारी यांनी १.५० कोटी रूपये महापालिकचे वाचविले. सर्वसामान्य संस्थांना पाठबळ दिले. या शहराचा आराखडा तयार करावा बैठका वेळेवर होण्याची अपेक्षा करतो सर्वांना सुभेच्छा तसेच ज्याच्या कुणाच्या भावना आमच्यामूळे दुखावल्या असतील दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.संजय जोशी :सर्वांनी मिळून कामे केली एकटयानी काही केले नाही. १९८८ पासून सेना-भाजप याची सत्ता असून ६७ कोटीचे बजेट होते तेंव्हापासून सदस्य आहे.तेंव्हाचा व आता बजेटमध्ये मोठा फरक जाणवतो विकास कामे होत असतात प्रशासनातील अधिकारी पदाधिकारी यांनी मिळून जे विकासाची ठळक कामे त्यात उड्डाणपूल असेल, संग्रामनगर रेल्वे गेट,शहानुरमिया दर्गा बाजूचा पूल,अमरप्रीत बीडबायपास रस्ता,जळगाव रस्ता असेल हे सर्व रस्ते एमएसआरडीसीकडून करून घेण्यास आम्ही सर्व एकत्र येवून काम केले.या विकास कामात अधिका-यांचे मोठे श्रेय लाभले सर्वांचे अभिनंदन करतो.पुढे असेच सहकार्य मिळण्याची अपेक्षा करतो.

श्रीमती मेहरून्नीसा खान :गेल्या पाच वर्षात सर्व पदाधिकारी स.सदस्य व सर्व अधिकारी वर्ग यांचे सहकार्याने वार्डातील विकास होवू शकला त्याबध्दल सर्वांचे आभार व्यक्त करते. सर्वांना धन्यवाद.

श्री.कचरू मोरे : हे ऐतिहासीक शहर असून पर्यटक येतात तेंव्हा हे शहर स्वच्छ असल्याचा संदेश बाहेर जातो.मद्रासचे पर्यटक लोक माझे रिलेटयूव त्याचा संपर्क झाला त्यांनी हे शहर स्वच्छ असल्याचे म्हटले वार्डातील कामे नगरसेवक जागृतेने करून घेतात निवडून आलो सुरूवातीला वाटले झोपडपटटी स्लम भागात विकास कामे होणार नाही परंतु तसा काही भेदभाव पदाधिकारी,प्रशासनाचे अधिकारी यांनी केला नाही. विद्यमान आयुक्त यांचे काम चांगले व त्यांचेत धैर्य असून त्यांनी कुणालाही नाराज केले नाही.शहराचा ऐतिहासीक वारसा जतन करावा. औरंगाबाद शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी यापूढेही सर्वांनी जातीने काम करावे. सर्व अभिनदंनास पात्र आहेत.

श्री.भगवान घडमोडे :अनेक लोक महापालिकेच्या बाबतीत निगेटयूव बोलत असतात १९९५ पासून मी सदस्य आहे.शहर झपाटयाने वाढते लोकसंख्या व बजेट याचा ताळमेळ लागत नाही तरी देखिल अधिकारी कर्मचारी व सर्व सदस्यांनी वैचारीक पातळी जागेवर ठेवून शहराचा विकास केला.मोठे प्रोजेक्ट हाती घेतले एसटी महामंडळाकडील शहर बससेवा बंद झाली होती. ती महानगरपालिकेने सुरू केली, ऐतिहासीक दरवाजे जतन केले मुलभुत सुविधाच न देता इतरही सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जे समाजासाठी नवीन देता येईल ते देण्याचा प्रयत्न झाला.सदस्य निवडून येतील ५

वर्षानंतर पुन्हा जातील परंतु अधिकारी/ कर्मचारी या संस्थेची सतत सेवा करणार आहे त्यांनी या संस्थेचे जास्तीत जास्त हित जपावे मा.महापौर व उपमहापौर यांना अडीच वर्षाचा कार्यकाळ मिळाला त्यांचे,सर्व पदाधिकारी स.सदस्य,अधिकारी/कर्मचारी यांनी चांगले सहकार्य केल्याबध्दल आभार व्यक्त करतो.

याच वेळी पिठासीन अधिकारी म्हणून मा.उपमहापौर काम पाहतात वेळ दु.३-०० वा.

मा.उपमहापौर : एक-एक सदस्यांनी बोलावे शांतता ठेवावी.

डॉ.भागवत कराड :मागिल १५ वर्षापासून या महापालिकेचा मी सदस्य आहे. प्रत्येक टर्ममध्ये मला पद मिळत गेले.पदावर काम करीत असतांना वेगवेगळे प्रकारचे अनुभव आले व गेल्या ५ वर्षात ९९ वार्डात अनेक विकास कामे झालेली आहे.मी महापौर असतांना कोणताही भेदभाव न करता सर्व भागात विकास कामे करण्याचा प्रयत्न केला या सभागृहात अनेक अभ्यासू नगरसेवक आहे त्यात मा.आमदार श्री.संजय सिरसाट तसेच स.संजय जोशी त्यांचे अभ्यासू वृतीमूळे संग्राम पुलाच्या संदर्भात महापालिकेचे २.५० कोटी रूपये भरावे लागले नाही.स.सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांनी स्पेक एजन्सीच्या विरोधात जावून मा.उच्च न्यायालयात न्याय मागविला त्यात महापालिकेचे लाखो रूपयाचे फायदा झाला. या बरोबरच अनेक सदस्यांनी महापालिकेचे हित जोपासण्यासाठी मोठे प्रयत्न केलेले आहे. गेल्या ५ वर्षात जी ठळक कामे झाली किंवा सुरू केली त्यात समातर जलवाहिनी होण्यासाठी पुर्णपणे कार्यवाही झाली.याचबरोबर सीटी बस सेवा,तसेच स.स.श्री.भाउसाहेब ताठे यांचे वार्डात स्व.प्रमोदजी महाजन क्रिडा संकुलनाचे काम ५ वर्षात १५० कोटीचे रस्तेची कामे झाली.तसेच ज्योतीनगर येथील स्वीमींग पूल,सिध्दार्थ गार्डन येथील पार्कींग,शॉपीग कॉम्प्लेक्स,रेल्वेस्टेशन येथील शॉपींग असेल, शाहनुरवाडी येथील भाजी मार्केट असेल तसेच नारेगाव येथे जाणाऱ्या कचऱ्यापासून नागरीकांना त्रास होतो म्हणुन कचऱ्याची विल्लेवाट १० कोटी खर्च करून लॅण्डफिलींग करण्याचे काम हाती घेतले.उडडाणपुलाचे काम केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयाचे आज उदघाटन होत आहे. गौतम बुध्दाचा पुतळयासाठी तरतुद केलेली आहे काम अंतिम टप्पयात आहे त्याचे लगेच उदधाटन करून १४ एप्रिल पर्यंत पुतळयाचे काम पुर्ण करण्याचा प्रयत्न करावा.सिडको भागात बॉटीनीकल गार्डन केले.गरवारे येथे स्वीमींग पूलाचे काम सुरू केले तसेच सलीम अली सरोवराचे काम चालू केले. सांस्कृतिकदृष्टया शहरात अनेक कार्यक्रम घेतले,जी जी विकासाची कामे केली ती जनतेला कळावी म्हणून विनंती की आपण ती कामे लवकरात लवकर आचांरसहिता लागण्या आधी पेपर मध्ये जनतेला कळण्यासाठी जाहिरात दयावी.

मा.उपमहापौर (पिठासीन अधिकारी) :आताच डॉ.भागवत कराड यांनी म्हटल्या प्रमाणे व इतर ही जी जी कामे केलेली आहे त्या सर्व कामाचा आढावा घेवून त्यास माझे अनुमोदन आहे. जी जी विकास कामे झाली त्या सर्व कामाची मा.आयुक्तानी मान्यता देवून जाहिरात दयावी.

श्री.अ.रशिद खान :लोकमतचे पत्रकार श्री.मुजीब यांना महाराष्ट्रातून चांगले पत्रकार तर फोटोग्राफस म्हणून श्री.फिरोजखान यांना तर श्री.अरूण तळेकर, विशाल सावरकर यांना पुरस्कार मिळाला या सर्वांचे अभिनंदन करावे.

डॉ.भागवत कराड :शहरातील अनेक विकास कामे मार्गी लागली परंतु गुंठेवारी भागात विकास करू शकलो नाही पुढील पाच वर्षात या भागाचा शासनाची मदत घेवून विकास व्हावा अशी अपेक्षा करतो. सर्वाचे सहकार्य मिळाले, अडीच वर्षाचा कार्यकाळ काम करण्यासाठी आपणाला मिळाला त्याबध्दल आपले व सर्व सदस्यांचे,अधिकारी/ कर्मचारी यांचे आभार मानतो.

श्री.संजय सिरसाट : ५ वर्षात झालेल्या कामावर चर्चा होते.स.सदस्य कोणत्याही पक्षाचे असतील परंतु वार्डात कामे केली हे सर्वांनी मान्य केले ही जमेची बाब आहे.महापालिकेचे क्षेत्र मोठे असून काम करतांना वेगवेगळे अनुभव येतात.नगरसेवक म्हणून निवडून आले तेंव्हा आपणच नव्हे तर अधिकारी सुध्दा त्याच भावनेने काम करतात जाणीव झाली ए-१,बी-१, रेटलिस्ट काय असते माहित नव्हते त्यावेळी अधिका-यांचे मार्गदर्शन लाभले. अभिनंदन करणे गैर नाही. इतर सदस्य पुन्हा निवडून येतील मला ती संधी मिळणार नाही ही शेवटची बैठक आहे कडू-गोड आठवणी हया मनाशी रूजून आहे.महेद्र खैरनार अधिकारी होवून गेले त्यांचेबध्दल स.सदस्यांना आत्मीयता होती.५ वर्षात ३ सदस्यांचा मृत्यु झाला त्यांचे दु:ख सुध्दा आम्च्या मनात आहे.काम करणे सोपे आहे परंतु त्या पध्दतीने ते करून घेतले पाहिजे.गेल्या १५ वर्षापासून बहुमतामध्ये येथील सत्ता आहे. या मागिल पाच वर्षात मी सभागृह नेता होतो आघाडीतील काही सदस्य सोबत घेवून जातीभेद न करता सत्ता चालविली २० वर्षापासून सत्ता चालविली चांगले संकेत दिले.महापालिकेत नेहमीच गोंधळ चालतो या बातम्या येण्या ऐवजी चांगले काम केले हे कदाचीत आपल्यामुळे पुढे जात नसावे त्यामूळे गैरसमज वाढत जात आहे.प्रत्येकाने ज्याची त्याची भुमिका वटवली.महापालिकेचा व्याप वाढला सिडको भाग आला सीटी बसेस, समांतर जलवाहिनीचे काम व इतर मोठे प्रोजेक्ट हाती घेतले लोकांपर्यत ख-या अर्थाने माहिती देवू शकलो नाही ठराविक पॅटर्न ठरलेला असतो ५ वर्षात अनेक मोठी कामे झाली त्याचा आराखडा तयार करून कोणती कामे केली करणार आहे ती जनतेपर्यत येण्याची गरज आहे. ज्या कुणी सदस्यांनी ते काम केले असेल त्याचे कार्यकाळात काम झाल्याची नोंद वृत्तपत्रात येवून त्यांना समाधान वाटेल.ज्यानी निवडून दिले त्या जनेतेचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो.आताच सुचवल्या प्रमाणे सिध्दार्थ उदयानमध्ये भगवान गौतम बुध्दाचा पुतळा बसविण्याची मागणी केली पुतळा पुर्ण तयार आहे उदयाच उदघाटन करावे इतरही कामाचे बाबतीत या दोन दिवसात उदघाटन करून घ्यावे विकास कामासाठी सर्वांनी सहकार्य केले त्याबध्दल सर्वाचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो.

श्री.वसंत नरवडे :पत्रकाराना मिळालेल्या पुरस्कारा बाबत जो ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे त्यांचे अभिनंदन करावे. ५ वर्षात झालेली होणार असलेली विकास कामाबाबत वृत्तपत्रात देवून जनतेसमोर जावे.

श्री.गजानन बारवाल : वार्डात विकास केला सर्वांनी हेच मत मांडले वार्डाचा विकास हा शहराचा विकास असतो असे समजणे गैर नाही.या सभागृहातील सदस्यांमधून दोन आमदार झाले.३ स.सदस्य तसेच अधिकारी/कर्मचा-याचा मृत्यू झाला त्यांचे दु:खात सहभागी असून त्याची जाणीव आपणा सर्वांना आहे.सर्वच पक्षाच्या सदस्यांनी मिळून या सभागृहात चांगले

निर्णय घेतले त्यात गुंठेवारी,सिडको हस्तांतर, शैक्षणिक उपक्रम राबविले, विविध ठिकाणी पुतळे बसविले,स्लम भागासाठी बीओटीचे कामासाठी श्री.सिकदर अली तर समांतर जलवाहिनी साठी श्री.पानझडे,उपआयुक्त श्री.एम.वाय.कांबळे यांनी अतिशय चांगले काम केले सेवानिवृत्त झाले श्री.सी.एस.सोनी,श्री.मोईनोद्दीन यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून कामे केली. मोठमोठे प्रकल्प हाती घेतले तीनही संशोधन केंद्रात चांगल्याप्रकारे काम चालू आहे.नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांनी मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचा विकास करण्याच्या दृष्टीने चांगले काम हाती घेतले तसेच त्यांनी नगरसचिव पदावर एक सक्षम अधिकारी म्हणून वेळोवेळी सभागृहाला मार्गदर्शन देत चांगली भुमिका पार पाडली त्याबध्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो.तसेच पत्रकार बंधुनी प्रसार माध्यमातून चांगल्या कामाबध्दल प्रशंसा केली होत असलेल्या चुका जसे रॅमकीच्या कामाबध्दल मार्मीक पध्दतीने होत असलेली चुक दाखवून दिली प्रशासनाने या बाबत खुप प्रयत्न केले स्पेक मुळे मोठे नुकसान झाले रॅमकीमुळे नुकसान होत आहे त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.अनेक संस्थाना मदत केली बिल्डरांचे प्रश्न सोडविले, संस्थाना जागा दिली धार्मीक स्थळाचे प्रश्न सोडविले अनेक संस्थाना नागरीकांना सभागृह हॉल उपलब्ध करून दिले अनेक वार्डात चांगल्या प्रकारे विकास कामे स.सदस्यांनी करून घेतली अभिमान वाटतो. काम करतांना बहुमोल सहकार्य येथील मा.खासदार,आमदार यांचे लाभले तसेच शासनाचे वेळोवेळी निधी असेल व इतर कामासाठी सहकार्य लाभले प्रशासनाने वेळोवेळी मदत केली सभागृहाची मदत घेतली हे सुध्दा विसरता येणार नाही. कर्मचाऱ्याच्या काही मागण्या पूर्ण करू शकलो नाही ही खंत नेहमीच मनात राहिल. मुख्यलेखा परीक्षक यांनी लेखापरीक्षणाचे काम अतिशय चांगले केले तसेच मुख्यलेखाधिकारी यांनी खर्चाची काटकसर कशी करावी मार्गदर्शन दिले. सेना-भाजपाची सत्ता असतांना देखील विकास कामे करण्यास अडचण आली नाही असे काहीनी मत व्यक्त केले.याचा अर्थ आपण सर्वांच्या सहकार्याने केलेले कार्य चांगले केले आहे. माझ्या कारकिर्दीत १३ आयुक्त झाले, आपण रात्रंदिवस काम करत आहे. मा.आयुक्त यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभले आहे. आपण आपल्या कार्यकाळात महापालिकेपासून ते दिल्लीपर्यत विविध योजना आणण्यासाठी प्रयत्न केले आपला सिहांचा वाटा राहिला स.सदस्यांच्या प्रस्तावाला वेळावेळी मान्यता दिली मा.महापौरांचे अभिनंदन तसेच हे काम करीत असतांना अधिकारी कर्मचारी यांनी मोठे प्रयत्न केले त्याबध्दल सर्वांचे आभार व्यक्त करतो.

श्रीमती अजरा जबीन : माझा वार्ड हा ८० टक्के गुंठेवारीत येतो तरी सुध्दा या भागात विकास कामे व्हावी यासाठी प्रशासनाने मार्ग काढला व आवश्यक असलेली कामे केली आपले व सर्व अधिकाऱ्यांचे विकास कामे करण्यासाठी सहकार्य लाभले सर्वाचे अभिनंदन करते.

सौ.मोमीन सफिया फिरदोस:५ वर्षात माझे वार्डातील ड्रेनेज,पाणी लाईट,रस्त्याच्या संदर्भात असलेले प्रश्न सोडविण्यासाठी मा.महापौर,मा.आयुक्त यांनी नेहमीच साथ दिली त्याबध्दल आपले,पदाधिकारी तसेच प्रशासनातील सर्व अधिकारी यांचे अभिनंदन करते.

श्री.अशोक विरकर :निवडून येवून १६ महिणे झाले आचारसंहितेचा कार्यकाळ वगळता खऱ्या अर्थाने ६ महिणेच विकासासाठी मिळाले.हे काम करणतांना महापौर म्हणून आपले व सर्व पक्षाचे सदस्यांनी तसेच मा.आयुक्त,संबधीत अधिकारी यांनी मोठे सहकार्य मार्गदर्शन केले त्याबध्दल मनपुर्वक आभार व्यक्त करतो.

श्री.हिम्मतराव दाभाडे :विकास कामाबध्दल मोठी प्रशंसा होत आहे.कोणते काम महापालिकेच्या हिताचे आहे किंवा नाही याकडे प्रशासनाचे लक्ष असावे.स.सदस्य पोटतिडकीने काही प्रश्न मांडतात परंतु येथे हास्यास्पद होते याबध्दल खंत वाटते.लक्ष्मण नरवडे नावाचे कर्मचारी हे सुरक्षा रक्षक म्हणून महापालिकेत कार्यरत होते सेवा बजावत असतांना बीडकीन जवळ प्रवासामध्ये त्यांचा अपघाती मृत्यू झाला सदर कर्मचारी यांना ४ आपत्ये होती त्याची पत्नी सौ.शोभा नरवडे यांनी विनंती करून पत्नीच्या जागेवर नोंकरी देण्याची विनंती केलेली आहे त्यांचे कुटूंबीयाचा उदरनिर्वाह चालेल या दृष्टीने त्यांनी केलेल्या अर्जावर विचार करावा.

मा.महापौर :चांगल्या शब्दात स.सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या गेल्या ५ वर्षात जी कामे केली त्याचा लेखाजोखा या सभागृहासमोर ठेवावा. शहराची मोठी वाढ या ५ वर्षात झाली मोठे योगदान महापालिकेने विकासासाठी दिले. सभागृहाने कर्तव्य या भावनेतून ती केली आताच स.सदस्यांनी कामाचा उल्लेख केला त्यात समांतर जलवाहिनी,१०० कोटीचे रस्ते,टाऊनहॉल व त्यातील कलादालन,बससेवा,महावीरस्तंभ,सलीमअलीसरोवराचे सुशोभिकरण, महिला व बाल कल्याण समितीच्या माध्यमातून केलेल्या योजना, कर्मचाऱ्यासाठीच्या योजना शिक्षण धोरण असेल देशातील होत असलेल्या हस्तकला एकत्रित बघण्यासाठी कलादालन असेल तसेच शहराच्या वैभवात आरोग्य भर टाकणारे जसे स्वींमींग पूल क्रिडा संकुल असेल अशा अनेक कामात योगदान दिले.सर्वच वार्डात रस्ते डांबरीकरण झाले. खुल्या जागा सुशोभित केल्या,तेथे बगीचा, वाचनालय सामाजिक हॉल, मुलांना खेळणी ई. सुविधा तसेच जागा संरक्षित केल्या मुख्य रस्त्यावर लाईटची व्यवस्था,तसेच सांस्कृतिक उपक्रम राबविले,बचत गटाकरीता काम करणारी सर्वात चांगली महापालिका आहे बचत गटांना काम दिले पाहिजे पण पुढे येत नाही परंतु या महापालिकेने बचत गटांना काम दिले सध्या २८ बचतगट सफाईच्या क्षेत्रात. एक बचत गट बेवारस मृतदेहाचे अत्यंसंस्कार करतो एक वेगळा आदर्श या बचत गटाने करून दिला.प्रकल्प दृष्टी प्रोजेक्ट लोकांच्या पर्यत ही योजना नेणे व गरजू लोकांना महापालिकेच्या पर्यत आणून त्यांचे ऑपरेशन होणे तसेच कराच्या पावती वाटपाचे तसेच अनेक इतर कामे बचतगटांना महापालिकेने दिले.क्रांतीचौक उड्डाणपूल,अमरप्रिल बीड बायपास रस्ता संग्रामनगरच्या पुलाचे काम मार्गी लावले. शहानुरमिया दर्गा जवळील पुलाचे काम,१४-१५ मोठे रस्ते डिफर पेमेंन्ट आयआरडीपी मधून केले. युआयडीएसएमटीमध्ये मोठा निधी जे ६५० कोटीची समांतर जलवाहिनीचे कामाचे प्रोसेस चालू असून ही या सभागृहाच्या सहकार्यामधून मोठी उपलब्धी मिळाली. हे शहर ऐतिहासीक असून मोठी प्रेक्षणीय स्थळ येथे आहे त्याचा विकास करण्यामध्ये कमी पडलो परंतु पुढील काळात या संदर्भात आवश्यक जो विकास करता येईल तो करण्याचा प्रयत्न असेल. पुढील ५० वर्षापर्यत होणाऱ्या लोकसंख्येला पाणी पुरेल अशी योजना राबवितो आहोत. ड्रेनेज

लाईनसाठी डीपीआर तयार असून केंद्र शासनापर्यंत पोहचविला आहे जेएनएनयुआरएम स्कीम करीता या शहराचे नाव समाविष्ट झालेले असून मोठा निधी मिळतो आहे.मोठी कामे पुढील बॉडीच्या कार्यकाळात होतील डीपीआर तयार करून बारकाईने काम केले नाही तर पुढील योजनाचे नियोजन चुकू शकते. योजनाची कामे चालू करण्याचे कामास या सभागृहाने एकमताने मान्यता दिली. महापुरूषाचा आदर्श आमच्या समोर रहावा अनेक पुतळे उभारणीचे काम करण्याचे योगदान मिळाले. महापौर म्हणून आपणसर्वांनी मला नेहमीच मार्गदर्शन,मदत केली वेगवेगळया पक्षाने आम्ही असलो तरी विकास कामासाठी एकत्र होतो हे दाखवून दिले. विकास कामे करतांना या बॉडीतील माजी महापौर सर्व पदाधिकारी कमेटीचे सदस्य यांनी नेहमीच साथ दिली त्याबध्दल त्यांचे मनपुर्वक आभार. पदावर असलेला व्यक्ती मोठा नसतो आपली संस्था मोठी आहे जे निर्णय संस्थेने घेतले ते पुढे नेणे आवश्यक असते.त्याच मार्गाने आपण सर्व गेलो. या सभागृहातील दोन स.पदाधिकारी पद भुषवलेले दोन सदस्य आमदार झाले या सभागृहात काम केल्यानंतर नक्कीच पुढे जावून राज्याच्या विकासासाठी पाय ठेवू शकतो हे दोन सदस्यांना आमदार पदावर निवडून देवून चांगली दृष्टी निर्माण करून दिली. राज्य व केंद्र शासनाने नेहमीच मदत केली त्याची जाणीव आहे. यात योजना कार्यान्वित करतांना मा.खासदार, मा.आमदार यांनी राज्य केंद्र शासनाकडून सतत पाठपूरावा करून प्रश्न मार्गी लावले त्यामूळेच या शहराचा विाकस होवू शकला सदस्यांमध्ये मतभेद झाले असतील परंतु विकासासाठी मतभेद झाले नाही. महिला सदस्यांनी त्यांचे वार्डात अनेक कामे करून घेतली व सभागृहातही नेहमीच त्यांची मला साथ मिळाली.मा.मुख्यमंत्री,माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख,श्री.गोपानाथ मुंडे, मा.श्री.नितीन गडकरी, मा.उध्दव ठाकरे,शिवसेना प्रमुख मा.बाळासाहेब ठाकरे मा.शरद पवार,मा.अजीत पवार यांचे भरपूर मार्गदर्शन,सहकार्य मिळाले त्याबध्दल सर्वाचे अभिनंदन करते.गुंठेवारी भागात पुरेसे काम करू शकलो नाही यांची खंत आहे तसेच सिडको हडको भागात अनेक विकास कामे रस्त्याचे डांबरीकरणाची कामे,केली ओपनस्पेसमध्ये सुशोभिकरण केले, जॉगींग ट्रॅक तेथे पेव्हरब्लॉक बसविले, सुशोभिकरण केले यामुळे या जागा बाजूच्या लोकांना चांगल्या प्रकारे वापरता येतात. या भागातील लीज होल्डची घरे फ्रि होल्ड करावी म्हणून पाठपुरावा केला शासनाकडे प्रस्ताव पाठविला या दोन्ही प्रश्न पुढील काळात प्रशासनाने सोडविण्याचा प्रयत्न करावा.भगवान गौतम बुध्दाच्या मुर्ती बसविण्यासाठी एकमताने मंजूरी दिली त्या मुर्तीचे काम सुरू केले परंतु लगेच भुमिपुजनाचा कार्यक्रम प्रशासनाने ठेवावा.जी कामे झाली ती सर्व महापौरांच्या काळात झाली अशीच भावना सर्वाची आहे. सभागृह व प्रशासन ही रथाची दोन चाके असतात सभागृहाने घेतलेल्या निर्णयावर/धोरणात्मक निर्णयावर प्रशासनाने नेहमीच अंमलबजावणी केली त्याबध्दल प्रशासनाचे विशेष अभिनंदन करते. काही वेळा चुका झाल्या असतील जो काम करतो तोच चुकतो जो करत नाही तो टिका करतो हे तितकेच सत्य आहे या शहराच्या विकासासाठी आपण नेहमीच बांधील आहोत त्यासाठी यापूढेही प्रशासनाचे चांगले काम करण्याची अपेक्षा करते.महापालिकेतील सर्वच अधिका-यांनी अतिशय उत्तम काम केले आताच काही मृत्यूमूखी झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत स.सदस्यांनी मागणी केली

दै.वेतनावर कार्यरत असलेले श्री.लक्ष्मण नरवडे हे महापौर बंगल्यावर सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते त्यांचा अपघाती मृत्यू झाला तसेच श्री.खुशाल गोंविद राठोड हे सुध्दा दै.वेतनावर हाते त्यांचाही कार्यरत असतांना दिनांक २१-१२-०७ रोजी मृत्यू झाला हे दोघेही बरोबर काम करीत होते कमी वयात अशा प्रकारे अकाली मृत्यू येणे ही त्या कुटूंबावर एक धक्कादायक बाब आहे. प्रशासनाला आदेशीत करते की अशा कर्मचाऱ्यांच्या निधनानंतर त्यांचे कुटूंबीयासाठी चांगली योजना असावी, जेणे करून त्यांचे कुटूंबीयाना आर्थीक परीस्थितीचा सामना करण्याची वेळ येणार नाही त्यांना रिलीफ मिळाला पाहिजे.अशी योजना प्रशासनाने येणाऱ्या कार्यकाळात त्वरीत करावी. त्यांचे कुटूंबीयातील व्यक्तींना दै.वेतनावर सेवा देता येईल का किंवा जी आर्थीक मदत देता येईल ती करण्याची कार्यवाही करावी.इतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात कार्यवाही करावी.गेल्या ५ वर्षात चांगली कामे केली सर्व लेखाजोखा उत्तम पध्दतीने पत्रकार बंधुनी जनतेसमोर मांडलेला आहे. चांगल्या कामाचे कौतूकही केले.सर्व मिडीया व पत्रकारांनी नेहमीच मदत केली त्याबध्दल त्यांचे मनपुर्वक अभिनंदन करते. त्याचा अनुभव स.सदस्यापर्यत पोहचविला जी मदत केली ती नक्कीच हे सभागृह लक्षात ठेवून चांगले काम करण्याचा प्रयत्न करेल, वाईट कामे झाली असेल ती जरून वृत्तपत्रात यावी परंतु ५ वर्षात जी विकासात्मक कामे केली त्याकडे सकारात्मक दृष्टीकोन ठेवून बघा व येणाऱ्या काळात केलेली कामे जनतेसमोर आणावी. गेल्या ५ वर्षात कामे केली त्यांचा लेखाजोखा तयार करून जनतेसमोर आणावा येत्या दोन दिवसात महानगरपालिकेची आचांरसहिंता लागणार आहे. जी जी विकास व महापालिका प्रशासनाने चांगली कामे केली त्या सर्व कामाचे कलेक्शन करून ते मिडीयाकडे जावून जनतेपर्यत कशी जातील यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. ९८५ :</u>**

दिनांक ११.०२.२०१० च्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.३७० अन्वये सन २०१०-२०११ या सरकारी वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे. या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास मंजूरी देण्यांत आलेली आहे.

<u>प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.</u>

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१०-२०११ या सरकारी वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहर हे औद्योगिकदृष्टया व ऐतिहासिकदृष्टया एक महत्वाचे शहर म्हणून सर्वश्रुत आहे. औरंगाबाद शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने या शहराचा समावेश हा जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण योजने अंतर्गत (JNNURM) व तत्सम योजने अंतर्गत करण्यासाठी प्राधान्याने कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या कर प्रणालीमध्ये काही अंशी बदल करणे गरजेचे आहे. त्यानुसार खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सन २०१०-२०११ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक असे चार गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे ...

०१ **निवासी** :- राहते घर, सर्व अनुदानीत शाळा, सर्व महाविद्यालये, सर्व शैक्षणिक संस्था तसेच शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेले वस्तीगृहे, माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७,दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

**शहरातील सर्व शैक्षणिक संस्थेकडून वारंवार होत असलेल्या मागणीवर फेरविचार करून सर्व शैक्षणिक संस्थांचा समावेश निवासी प्रकारामध्ये करण्यात येत आहे.**

०२ **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न नसलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३ **व्यावसायीक** :- ०१. पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स,सर्व प्रकारची दुकाने,खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कीगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल.

वरील अ व ब गटामध्ये न मोडणाऱ्या इमारतीस व्यावसायीक दराने करआकारणी करण्यात येईल.

०४ **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल.

०५ **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०६ **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त **अ** प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त **ब** प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त **क** प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त **ड** प्रमाणे) | ३६% | ३६% |

०७ **नामांतर शुल्क** :-

७.१ खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे, शिध्द शिघ्र गणकाप्रमाणे (Ready Reckner) किंवा बाजार मुल्य यामध्ये जे जास्त असेल त्याच्या **०.५% नामांतर शुल्क निवासी मालमत्तेस** आकारण्यात येईल व **निवासेत्तर मालमत्तेसाठी १% नामांतर शुल्क** आकारण्यात येतील.

७.२ **वारसाहक्काने** :- बक्षीसपत्र, वाटणीपत्र, दान, देणगी, मृत्युपत्र व तत्सम मार्गाने हस्तांतर केलेला असल्यास, स्लम (घोषीत झोपडपट्टी) व गुंठेवारी क्षेत्र यांना रू.१०००/- नामांतर शुल्क आकारण्यात येतील.

०८ **विलंब शुल्क** :-

औरंगाबाद महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील थकीत मालमत्ता कराची वसूली प्रभावीपणे होण्यासाठी व महानगरपालिकेची वसूलीत वाढ व्हावी म्हणुन थकीत मालमत्ता करावर विलंब शुल्क खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

पहिल्या सहा महिन्यासाठी (एप्रिल ते सप्टेंबर)　　५%

ऑक्टोबर महिन्यासाठी ६%
नोव्हेंबर महिन्यासाठी ७%
डिसेंबर महिन्यासाठी ८%
जानेवारी महिन्यासाठी ९%
फेब्रुवारी महिन्यासाठी १०%
मार्च महिन्यासाठी ११%

०९ **विशेष सवलती** :-

९.१ **सुट** :- दोन वर्षाचा आगाऊ (अॅडव्हान्स) मालमत्ता कर (चालु आर्थिक वर्षाचा वगळुन) भरणाऱ्यास सामान्य करात १०% सूट ही पुढील वर्षाच्या दर निश्चितीच्या दरास अधिन राहुन देण्यात येईल.

९.२ जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट देण्यात येईल.

९.३ जे मालमत्ताधारक चालु वर्षाच्या खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१०-२०११ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

एप्रिल १०%
मे ८%
जुन ६%
जुलै ४%

ऑगस्ट ते मार्च सूट अनुज्ञेय होणार नाही व थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

९.४. माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना मागील वर्षाप्रमाणेच सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एक मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल. सदरील सूट ही स्वतः किंवा त्यांचे पत्नी हयात असे पर्यंत लागु राहील.

९.५ ग्रुप हौसिंग स्किम किंवा रो-हाऊसेस् स्किम जे विकासक स्वः खर्चाने विकास करतील अशा स्किम / योजनेला सामान्य करात ५०% सूट देय राहील.

१० **कर आकारणी प्रणाली** :-

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१०.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक १-४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग खालील प्रमाणे करणे योग्य राहील.

| अ. क्र. | विभाग | प्रचलित विभागानुसार मिळकतीचा दर /चौ.मी. | प्रस्तावित विभागानुसार मिळकतीचा दर /चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.११,०००/- पेक्षा जास्त | रू.१४,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.९,५०० ते रू.१०,९९९/- | रू.११,००० ते रू.१३,९९९/- |
| ३ | क | रू.८,००० ते रू.९,४९९/- | रू.९,००० ते रू.१०,९९९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ड | रू.६,५०० ते ७,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या मिळकती) | रू.७००० ते ८,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

त्यामुळे वरील भागासाठी शिघ्र शिध्द गणकातील दिलेल्या दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. वरील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

११ **मंजुर रेखांकनातील मोकळया जागेची कर आकारणी** (**Open Plot**) :-

मंजुर रेखांकनातील मोकळया जागेस वरील प्रमाणे अ, ब, क, ड मधे दर्शविलेल्या विभागानुसार प्लॉटची किंमत विचारात घेवुन एकूण किंमतीच्या पाच टक्के कर योग्य मुल्य काढण्यात येते आणि त्यावर सामान्य कराच्या दरानुसार आकारणी करण्यात येते.

१२ **इमारतीचे बांधकामाच्या प्रकारानुसार व विभागानुसार करण्यात येणारी कर आकारणी** :-

**उदा** :- गुलमंडीभागात 'अ' प्रकारचे निवासी बांधकामास रू.९.५०/- प्रती चौ.मी.प्रती माह या दराने कर आकारणी करण्यात येईल व शहराच्या बाहेरील हर्सुल, मिटमिटा, नक्षत्रवाडी, नारेगांव या भागातील 'अ' प्रकारचे निवासी बांधकामास रू.९.५०/- प्रती चौ.मी. आकारण्यात येत नाही. यामुळे शहरातील भागानुसार कर आकारणी करण्यात येते. (म्हणजेच उच्च भू वस्तीत व स्लम वस्ती मध्ये जर आर.सी.सी.चे बांधकाम असेल तर त्यास एकच दर आकारण्यात येणार नाही व मिळकतधारकावर अन्याय होणार नाही.)

**१३ सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार, सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. दर कायम करणे योग्य राहतील :-**

१३.१ **निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. दर** :-

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.९.५०/- | रू.८.५०/- | रू.७.५०/- | रू.६.५०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.७.५०/- | रू.७.००/- | रू.६.५०/- | रू.५.५०/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.६.५०/- | रू.६.००/- | रू.५.५०/- | रू.३.५०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.४.००/- | रू.३.००/- | रू.२.००/- | रू.१.५०/- |

१३.२ **निवासेत्तर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. दर** :-

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२४/- | रू.२२ /- | रू.२१/- | रू.२०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८/- | रू.१६ /- | रू.१४/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१०/- | रू.८.००/- | रू.६.००/- |

१४ **निवासी/निवासेत्तर/व्यावसायीक इमारती समोरील असलेल्या मोकळया जागेची आकारणी** :-

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.२.८०/- | रू.२.४०/- | रू.२.००/- | रू.१.८०/- |
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार | रू.११.२०/- | रू.९.६०/- | रू.८.००/- | रू.६.४०/- |

१४.१ निवासी, बिगर निवासी मोकळया जागांच्या (Open Plot) वापरात बदल झालेला असेल तर त्या मिळकतीची आकारणी ही त्या निवासी / निवासेत्तर / व्यावसायीक इमारती समोरील असलेल्या मोकळया जागेस करण्यात येईल.

१४.२ ज्या मोकळया जागांचा व्यावसायीक कारणांसाठी वापर केला जातो. उदा.मोकळी जागा विकसीत करून त्याठिकाणी लॉन्स तयार केली जाते व अशा लॉन्स लग्न कार्य व अन्य धार्मीक, सामाजीक

कार्यक्रमासाठी व्यावसायीकदृष्टया भाडयाने दिल्या जातात, मोकळया जागांचा वापर गोडावुन स्वरूपात केला जातो. उदा.फरशा, विटा, भंगार, लाकुड, फर्निचर, लोखंड ठेवणे, पार्कींग इत्यादी अथवा मोकळया जागा विकसीत केलेल्या किंवा व्यावसायीक कारणासाठी वापर होत असलेल्या मोकळया जागांची कर पात्र रक्कम ठरविण्यासाठी वरील प्रमाणे निव्वळ मोकळया जागांसाठी जो दर नमूद केला आहे,त्याच्या चौपट दराने आकारणी करणे योग्य होईल.

१५. **मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१०-२०११ साठी प्रस्तावित व सन २००९-१० चे प्रचलित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन ०९-१० चे प्रचलित दर | सन २०१०-२०११ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | **८ %** |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | **१५ %** |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | **२० %** |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | **२ %** |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | **३ %** |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | **३ %** |

१६ **शासनाचे कर :-**

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारणे योग्य.

१७ तसेच औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आर्थिक वर्ष २०१०-२०११ मध्ये महानगरपालिका हद्यीतील (सिडकोसह) मिळकतींचे फेर सर्वेक्षण (Revision) व संगणकीकरण हाती घेण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यात येत आहे.

कल्याण-डोंबीवली महानगरपालिका धर्तीवर मालमत्ता कराचे संगणकीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे.मालमत्ताचे संगणकीकरणा बाबत मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे.

वरील कर आकारणीच्या दर निश्चिती मध्ये अशंतः बदल प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. त्याबदलासह वरील प्रमाणे कर आकारणीसाठी करण्यात आलेल्या गटाचे दर सन २०१०-२०११ साठी कायम करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : हा विषय रद्यच करायला पाहिजे पुर्वी मालमत्ता कर व पाणी पटटी वसुली ज्या प्रमाणे आहे त्याच प्रकारे असायला पाहिजे कुठल्याही प्रकारची वाढ करणे अपेक्षीत नाही व करू नये.तसेच विलंब शुल्क लावलेले आहे ते लगेच रद्य करण्यात यावे.

श्री.संजय सिरसाट :यापुर्वीच्या बैठकीत ९०४ पर्यत विषय होते आता ९८५ पासून सुरूवात झाली यामधील क्रमांकाचे विषय हे लेखाशिर्षक बदलण्याचे घेतले असावे असा आमचा समज आहे इतर महत्वाचे विषय असतील पण आता इतिवृत्त नसल्यामूळे काही उल्लेख होत नाही. लेखाशिर्षक बदलण्याचे किंवा इतर किरकोळ स्वरूपाचे असतील, त्यास सभागृहाने मान्यता दिली असे आम्ही गृहीत धरतो इतर त्यात नसावे. अशी अपेक्षा आहे.

श्री.गजानन बारवाल :स.सदस्य श्री.संजय सिरसाट यांनी जी सुचना मांडली त्यांचा विचार व्हावा. विलंब शुल्क हा मालमत्ता कर व पाणीपट्टीवर चालू केला आहे अनेकांना यामूळे त्रास होत आहे कर भरणा नागरीकांना करावाच लागणार आहे विलंब शुल्क लगेच आज पासून रद्य करावे अभय योजना चालू होती १५ तारखेला मा.आयुक्तांनी ती मागे घेतली आता उन्हाळा लागला नागरीकांना पाणी मिळण्यास त्रास होणार आहे त्यासाठी अभय योजना मार्च पर्यत राबविण्यात यावी तसे प्रशासनाला आदेशीत करावे.जे वर्षाच्या सुरूवातीस टॅक्स भरणा करीत त्यांना १० टक्के सुट देण्यास हरकत नाही. हा प्रस्ताव रद्य करावा पुर्वी ज्या प्रमाणे टॅक्स घेतला जात असेल त्याच प्रमाणे घ्यावे.

श्री.अ.रशिद खान :टॅक्स जास्त होतो रद्य करण्यात यावे.

मा.महापौर :याविषयात नमूद केल्याप्रमाणे करामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यास सभागृह मान्यता देत नाही.मागिल वर्षाप्रमाणे सर्व दर असणार आहे.

श्री.गजानन बारवाल :विलंब शुल्क लावले जात आहे ते रद्य करावे तसेच अभय योजना पुर्ववत चालू ठेवावी.नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मा.महापौर :अभय योजनेला अतिशय चांगला प्रतिसाद मिळतो आहे

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : शिक्षण संस्था सिडको हडको भागात जास्त आहे.सिडको कडे असतांना या संस्थेकडून टॅक्स घेतला जात नसे आता मोठी थकबाकी दाखवली.शासनाचे काहीही नाही शासन टॅक्स भरण्याकरीता नेट पेमेन्ट करते.शिक्षण क्षेत्राकरीता जी रक्कम मागील भरावयाची प्रस्तुत केली आहे जो पर्यत महापालिकेचा निर्णय होत नाही व जी रक्कम आहे त्यामध्ये काही सुट देवून जास्तीत जास्त रक्कम वसुली कशी करता येईल ते पहावे ५० टक्के रक्कम भरणा करून घ्यावी उर्वरीत रक्कम ही शिक्षण संस्थांना कशा प्रकारे कर आकारायचा शासनाकडून माहिती घेवून हप्त्याप्रमाणे वसुल करावी.

श्री.गजानन बारवाल : सिडको नागरीकाकडून ज्या प्रमाणे टॅक्स घेतो त्याच प्रकारे या संस्थाकडून घ्यावा कारण जेवढया संस्था आहे त्या डोनेशन घेतात त्यांचे मालमत्तेची मोठया प्रमाणात किंमत वाढलेली आहे. कोणतीही सुट देण्याचे कारण नाही असे माझे मत आहे ज्या प्रमाणे मालमत्ता कर लावला गेला त्याप्रमाणेच यांनाही लागू करावे.

मा.महापौर :शैक्षणिक संस्थाच्या बाबतीत प्रशासनाने जे सुचविलेले त्यावर चर्चा करावी.कोणत्या प्रकारची करात वाढ करीत नाही तसेच रेट बदलणार नाही मागील वर्षी प्रमाणे कायम राहणार आहे. इतर जे विषय आहे शैक्षणिक संस्थाकडील टॅक्सची वारंवार मागणी होत आहे जे प्रशासनाने यात सुचविलेले आहे त्यावर चर्चा करावी.

श्री.गजानन बारवाल :यापूर्वी नामांतर शुल्क ५०० रू. ऐवजी ०.५ % असे केले, वादग्रस्त विषय झाला होता.

मा.महापौर :नामांतर शुल्क आकारणी संदर्भात जी रूलींग दिली होती ती आज सुध्दा कायम आहे.त्यात कोणतीही वाढ किंवा बदल सभागृह सुचवत नाही शैक्षणिक संस्थाच्या बाबतीत विचार करावा.जे जुने दर आहे त्यावर प्रशासनाने कायम राहायचे आहे.

श्री.भगवान घडमोडे :शैक्षणिक संस्थेला टॅक्स मध्ये सुट देण्याचा शासन जीआर आहे असे कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण केला त्यामुळे वसुली करतांना त्रास होतो सर्व माहिती घ्यावी काही विशिष्ट संस्थेचा टॅक्स कर्मचाऱ्यांनी कमी केलेला आहे त्यामूळे इतर संस्थाचालक कर कमी करून दयावा म्हणून मागणी करीत आहे.ज्या शैक्षणिक संस्था डोनेशन घेत असेल व कमर्शियल वापर करीत असेल त्यांना त्या पध्दतीनेच टॅक्स आकारण्याचा ठोस निर्णय घेवून कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : या महापालिकेप्रमाणेच इतर महापालिकेतही शिक्षण संस्था आहे हा प्रश्न का समोर आला कारण सिडको हडको भागातील शिक्षण संस्थेस हस्तांतरणाच्या पुर्वी कर लावलेला नाही.ज्या कर्मचा-यांचे पेमेन्ट करू शकतात.त्या संस्थेचा पुर्ण टॅक्स माफ केला बालवाडी व लहान संस्था असेल त्यांना काही इन्कम मिळत नसेल तर टॅक्स आकारला तरी भरणा करणार नाही.त्यासाठी इतर महापालिकेत शिक्षण संस्थेच्या बाबतीत टॅक्स आकारणीची कशी पध्दत आहे.माहिती घेवून धोरणात्मक निर्णय घ्यावा. तुर्त जो टॅक्स आकारला तो भरणा करण्यासाठी ५० टक्के वसुली करावे. आता परीक्षेच्या काळात टॅक्स भरणा करीत नाही म्हणून संस्था बंद करणे वगैरे योग्य नाही.

श्री.सिताराम सुरे :शैक्षणिक संस्था,अनुदानित शाळा, महाविदयालये काही दवाखाने यांना यांचेकडून निवासी कर घेणार आहे.शहरात जे मोठमोठे दवाखाने असतील ट्रस्टी जसे, डॉ.हेडगेवार,कमलनयन बजाज, एमजीएम हॉस्पीटल असेल अशा दवाखान्यांत येणारे गरीब रूग्णासाठी एक सुविधा म्हणून सामान्य करात त्या दवाखान्यास सुट दयावी यामूळे गरीब लोकांना फायदा होईल.

श्री.प्रशांत देसरडा :सभागृह नेता यांनी सुचना मांडली आतापर्यत ज्या पध्दतीने कर आकारणी केली ती अमलात आणावी शैक्षणिक संस्थाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय जो इतर महापालिकेत कशा पध्दतीने टॅक्स आकारला जातो काही शिक्षण संस्था २५ हजार डोनेशन तर काही २०० रू मासिक फिस घेवून शिक्षण देतात. धर्मदाय संस्थेची नेमकी व्याख्या काय?याचा योग्य अभ्यास करून इतर महापालिकेत कशा पध्दतीने टॅक्स आकारला जातो माहिती घ्यावी पूढील सभेत तसा ठराव सादर करावा तोपर्यत जे रेग्यूलर आकारणी करतो त्या प्रमाणे करावी.

मा.महापौर : आताच म्हटल्याप्रमाणे कोणतीही वाढ सभागृह करीत नाही. मागच्याच पध्दतीने रेट असावे. इतर जे विषय व्यावसायिक किंवा शैक्षणिक संस्था असेल चॅरीटेबल ट्रस्ट असेल इतर महापालिकेत कशा पध्दतीने काम करतात माहिती घेवून पुढील बैठकीमध्ये हा प्रस्ताव आणावा.या प्रस्तावामध्ये कोणतीही दरवाढ होत नाही.तसेच पुढील वर्षाकरीता विलंब शुल्क हे सभागृह सुचवित नाही जे जुने दर आहे तेच दर पुढील वर्षाकरीता मान्य करण्यात येते.

श्री.गजानन बारवाल : मागिल वर्षी विलंब शुल्क लावण्यात आलेला आहे अनेक नागरीकांना त्यांचा त्रास होतो.

मा.महापौर : या बाबतीत मा.आयुक्तांनी योग्य निर्णय घ्यावा तसेच अभय योजनेसाठी आणखी मुदतवाढ दयावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, सन २०१०-११ या वर्षासाठी मालमत्ता कराचे दर व मर्यादा या संदर्भात कोणतीही वाढ करण्यांत येत नसून मागील वर्षाचेच मालमत्ता कर आकारणीचे दर कायम ठेवण्यास मंजूरी देण्यांत येते. तसेच जे व्यावसायिक किंवा शैक्षणिक संस्था असेल धर्मदाय संस्था असेल त्या संदर्भात इतर महापालिकेत कशा पध्दतीने आकारणी केली जाते, याची माहिती घेवून पुढील बैठकीमध्ये तसा प्रस्ताव सादर करणेस व पुढील वर्षाकरीता विलंब शुल्क हे सभागृह सुचवित नाही जे जुने दर आहे तेच दर पुढील वर्षाकरीता मान्य करण्यास आणि विलंब शुल्क बाबत मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी योग्य तो निर्णय घेण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.आयुक्त यांचेकडील प्रस्ताव**

**विषय क्र. ९८६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मॉडल मिडल शाळेसमोर गांधीनगर स्लम भागात श्री.राज चव्हाण व इतर यांच्या गल्लीमध्ये व मुख्य रस्त्यालगत ड्रेनेज लाईन टाकणे च्या कामाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,०५,०००/- चे तयार करण्यात आलेले असून सदरील कामाच्या अंदाजपत्रकास दि.१३.०१.२०१० अन्वये कार्योत्तर मान्यता प्राप्त झालेली आहे व सदरील कामास अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध नाही.

तरी अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,०५,०००/- अंदाजपत्रकाचा प्रस्ताव आर्थिक तरतूद उपलब्ध करून मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मॉडल मिडल शाळेसमोर गांधीनगर स्लम भागात श्री.राज चव्हाण व इतर यांच्या गल्लीमध्ये व मुख्य रस्त्यालगत ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.२,०५,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, आमखास मैदान लगत असलेल्या टी.बी.हॉस्पीटल ते दिलरस कॉलनी शहर भिंत (फसील पर्यंत) डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग दरसूची सन २००८-०९ नुसार तयार करण्यात आले असून रक्कम रु.२१,२६,२८०/- होत आहे.

सदर काम अर्थसंकल्प २००९-१० मधील पान क्र. ACE-A-०८ वरील लेखाशिर्ष नवीन खडी रस्ते (शहर) मधील अ.क्र. १० वरील उपलब्ध तरतुद र.रु.२५.०० लक्ष मधून प्रस्तावीत आहे.

करीता अंदाजपत्रक र.रु.२१,२६,२८०/- प्रशासकीय मान्यतेस्तव आणि अल्पमुदतीच्या निविदा काढून काम हाती घेणेस मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आमखास मैदान लगत असलेल्या टी.बी.हॉस्पीटल ते दिलरस कॉलनी शहर भिंत (फसील पर्यंत) डांबरीकरण करणेच्या कामाचे रक्कम रु.२१,२६,२८०/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका औरंगाबाद यांचे तर्फे मा.सर्वसाधारण सभेपूढे पूढील प्रमाणे प्रस्ताव ठेवण्यात येतो की, श्री.प्रकाश प्रभुदास परसवाणी व इतर यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम -१२७ खालील सुचना/नोटीस अन्वये कळविले आहे की, मौजे सातारा पैकी गट क्रमांक ३० (पैठण बायपास रोडच्या दक्षिणेस स्थित) हया

वाढीव क्षेत्रासाठीचे विकास योजनेनूसार आरक्षण क्रमांक डी/बी "बगीचा" ने बाधित आहे. सदर शहर विकास योजनेस महाराष्ट्र शासनाने जा.क्र.टिपीएस ३०८८-४५४ सी.आर.५९/८८/नवि-१२ दिनांक १५.१०.१९९१ अन्वये अंतिम मंजुरी प्रदान केली असून सदर विकास योजना दिनांक १९/११/१९९१ पासून अंमलात आलेली आहे. सदर अंतिम विकास योजनेत अर्जदाराचे मालकीची जमीन गट क्रमांक ३० दक्षिण हद्दीने पूर्व पश्चिम १५.०० मीटर रुंद रस्त्याने व बगीचा (आरक्षण क्रमांक डी/बी) या आरक्षणाने बाधित असल्याचे नोटीसाद्वारे कळविले आहे.

सदर गट क्रमांक ३० मौजे सातारा औरंगाबाद अंतर्गत आरक्षण क्रमांक डी/बी व १५.०० मीटर विकास योजना रस्ता यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ खरेदी सूचना दिलेली आहे. सदर क्षेत्राचे विकास योजनेस मंजुरी होऊन दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने सदर खरेदी सूचना लागू होते. अर्जदार यांचे एकुण क्षेत्र १०६५० चौ.मी. हे आरक्षण व पोच रस्त्याने बाधित होत असून सन २००९ च्या सिध्दसिग्र गणकानुसार त्यासाठी रक्कम रुपये १,७५,००,०००/- (अंदाजे) एवढा मोबदला अपेक्षित आहे. मात्र अंतिम निवाडा होतांना त्यात तफावत होऊ शकते.

संबंधीतांनी मौजे सातारा औरंगाबाद येथील गट क्रमांक ३० चे त्यांचे मालकीचे क्षेत्राचा महसूल अभिलेख ७/१२ जोडला आहे. त्यानूसार त्यांचे मालकीच्या क्षेत्राची नोंद आहे. विकास योजना नकाशानूसार संपूर्ण गट नंबर ३० बगीचा व १५ मीटर विकास योजना रस्ता या आरक्षणाने मिळकत बाधित होते. त्यामुळे अर्जदाराचे खरेदी सुचने आधारे आवश्यक कार्यवाही खर्चासह करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :यापूर्वी १२७ नोटीस संदर्भात निर्णय धेतले त्या जागेचे प्रकरण आजही प्रलंबीत आहे.बराच कालावधी निघून गेला १२७ नोटीस देवू शकतात असे मोठया प्रमणात मालमत्ताधारक आहे. सविस्तर माहिती घ्यावी. |
| श्री.प्रशांत देसरडा | : माझे माहिती प्रमाणे १२७ च्या नोटीस संदर्भात मा.उच्च न्यायालयात प्रकरण आहे. हे करणे योग्य आहे का ? |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :१२७ नोटीसचे अनेक प्रकरणे रिजेक्ट केलेले आहे हे सुध्दा परत पाठवावे. |
| मा.महापौर | :हा विषय तुर्त स्थगित करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ९८९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,डॉ.डी.एस.देशपांडे हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरुन दिनांक ३१.०७.२००२ रोजी ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. मुख्य लेखा परिक्षक,महानगरपालिका औरंगाबाद सन २०००-०१ व २००१-०२ या कालावधीतील आरोग्य विभागातील औषध खरेदी संबंधी लेखा परिक्षण करुन त्या बाबतचा अहवाल सादर केला होता. सदर लेखा परिक्षण अहवालात नमूद करण्यात आल्याप्रमाणे,औषधी/वैद्यकीय उपकरणे/साहित्य इत्यादी खरेदीतील अनियमितते संदर्भाने,डॉ.डी.एस.देशपांडे,तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची म.ना.से. (शिस्त व अपील) १९७९ चे नियम ८ अन्वये खाते चौकशी करण्याकरिता,चौकशी अधिकारी म्हणून,श्री.एस.एस.निरखी,सेवानिवृत्त न्यायधिश यांची नियुक्ती करण्यात आली होती.

त्यानुसार चौकशी अधिकारी यांनी विधीवत चौकशी पूर्ण करुन,सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार डॉ.डी.एस.देशपांडे,हे दोषी असल्याचे सिध्द झाले आहे व त्यामुळे महानगरपालिकेचे एकूण रु.१०,५५,३२३/- चे आर्थिक नुकसान झाल्याबद्दल व त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम ३ (१) (३) चा भंग केला असल्या बद्दल चौकशी अधिकारी यांचा निष्कर्ष होकारार्थी आहे.

चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल विचारात घेता डॉ.देशपांडे हयांना 'कारणे दाखवा नोटीस' देवून महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीची रक्कम रु. १०,५५,३२३/-

त्यांचे सेवा उपदान व निवृत्तीवेतनातून का वसूल करण्यात येवू नये अशी विचारणा करण्यांत आली होती. त्याउत्तरी डॉ.डी.एस.देशपांडे यांनी सादर केलेले स्पष्टीकरण हे समर्थनिय नाही,पटण्यासारखे नाही तसेच विचारात घेण्यासारखे नाही कारण त्यास कायदेशीर आधार नाही व चौकशी अधिकारी यांनी,चौकशी अहवालात त्यांचा युक्तीवाद पूर्वीच फेटाळून लावलेला आहे. त्यामुळे त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) इ व म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे नियम ५ (१) तीन अन्वये, रु. १०,५५,३२३/- चा भरणा करण्यासाठी ७ दिवसांची मुदत देऊन व मुदतीत रक्कम न भरणा केल्यास उक्त रकमेची वसूली प्रचलित नियमांच्या तरतुदीनुसार करण्यात येईल, असे दि. २७.०७.२००४ च्या कार्यालयीन आदेशान्वये कळविण्यात आलेले होते.

दरम्यान डॉ.देशपांडे यांनी त्यांची तात्पुरती निवृत्ती वेतन,अर्जित रजेचे रोखीकरण,भविष्य निर्वाह निधिची रक्कम व सेवानिवृत्तीचे इतर फायदे देय करण्यासाठी विनंती करणारी याचिका क्र. २४४९/०३ ही महानगरपालिके विरुध्द मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेली होती. तथापी,चौकशी पुर्ण करुन आदेश पारित केलेले असल्यामुळे दिनांक २९.०७.२००४ रोजी मा. उच्च न्यायालयाने सदरील याचिका निकाली काढलेली आहे. डॉ.देशपांडे यांनी कार्यालयातर्फे पारित केलेल्या दिनांक २७.०७.२००४ च्या आदेशास स्थगिती देण्यासाठी मा.उच्च न्यायालयास विनंती केली होती. परंतू मा. उच्च न्यायालयाने स्थगितीस नकार देवून,डॉ.देशपांडे यांना,ॲपिलेट ॲथॉरिटी समोर अपिल दाखल करता येईल व त्यासंबधी गुणवत्तेवर विचार करता येईल असे नमुद करुन त्यांची याचिका निकाली काढलेली आहे.

डॉ.देशपांडे यांना देण्यात आलेल्या दिनांक २७.०७.२००४ च्या कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने त्यांनी आदेशाच्या तारखेपासुन सात दिवसांच्या आत रक्कम रु. १०,५५,३२३/- चा भरणा केलेला नाही. परंतू उक्त आदेश रद्द करणे/त्याची अंमलबजावणीस स्थगिती देण्यासंबधी,मा.स्थायी समिती महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०९.०८.२००४ रोजी अपिल दाखल केलेले होते. त्यांचे अपिलाच्या संदर्भाने मुद्देनिहाय स्वयंस्पष्ट अभिप्राय पाठविण्यासाठी मा.सभापती स्थायी समिती यांनी प्रशासनास दिनांक. १०.०८.२००४ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मा.सभापती यांना प्रकरणी मुद्देनिहाय अभिप्राय पाठविण्यात आलेले असून डॉ.देशपांडे यांचेकडून रक्कम रु. १०,५५,३२३/- वसूल करणेबाबत मंजुरी होणेस्तव स्वतंत्र प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी ठेवण्यात येत असल्याचेही मा.सभापती स्थायी समिती यांना कळविण्यात आलेले होते. मा.स्थायी समिती ठराव क्र.२११ दिनांक २७.०१.२००५ अन्वये डॉ.देशपांडे यांचे अपील मंजूर करुन सेवानिवृत्तीचे सर्व फायदे व उपदानाची सर्व रक्कम संबंधितास देणे बाबत मान्यता देण्यात आली होती.

तथापी उक्त नुकसानीची रक्कम वसूल करण्याबाबत प्रशासनाने दिनांक ०७.१०.२००५ च्या मा.सर्वसाधारण सभेत विषय क्र. ७०/११ अन्वये प्रस्ताव सादर करण्यांत आला. मा.सर्वसाधारण सभेने सदर प्रस्तावास स्थगिती देऊन,प्रशासनाने पुन्हा दोन किंवा तीन सदस्यीय समिती स्थापन करुन त्यामध्ये सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी व येत्या सहा महिन्यात चौकशी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात यावा,असे निर्देश दिले. मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे दिनांक १२.०३.२००६ रोजीच्या आदेशानूसार प्रकरणात सविस्तर चौकशी करण्यांकरिता तत्कालीन मुख्य लेखापरिक्षक व आरोग्य वैद्यकिय अधिकार यांची चौकशी समिती नियुक्ती करण्यात आली होती. परंतु सदर समितीमार्फत अहवाल प्राप्त झाला नाही.

प्रशासनामार्फत मा.प्रधान सचिव,नगरविकास विभाग यांना दिनांक १७.०३.२००६ रोजीचे पत्राद्वारे मा.सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र. ७०/११ दिनांक ०७.१०.२००५ हा पूर्णत: विखंडीत न करता या प्रस्तावास देण्यात आलेली स्थगिती विखंडीत करण्यात यावी व डॉ.देशपांडे यांचे निवृत्तीवेतनातून प्रस्तावास नमूद केल्याप्रमाणे नुकसानीची रक्कम वसूल करण्याची मुभा देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. प्रकरणांत शासनाकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने दिनांक १०.१०.२००८ रोजी पत्रान्वये याबाबत शासनास पुनश्च विनंती करण्यात आली आहे. अद्यापही सदर प्रकरण शासनाकडे प्रलंबीत आहे.

तसेच प्रकरणांची चौकशी करण्यासाठी पुन्हा मुख्य लेखा परिक्षक व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची चौकशी समिती नियुक्त करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानूसार संबंधीतावरील दोषारोप सिध्द झालेले आहेत.

करीता डॉ.डी.एस.देशपांडे यांच्या विरुध्द आदेशीत करण्यात आलेल्या खाते चौकशीमध्ये ते दोषी असल्याचे सिध्द झालेले असल्यामुळे,महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीची रक्कम रु.१०,५५,३२३/- भरणा करण्यासाठी त्यांना आदेशीत करुन ही त्यांनी उक्त रक्कमेचा भरणा न केल्यामुळे,उक्त रक्कम त्यांना देय असलेल्या उपदानाची र.रु.२,५०,०००/- ही म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ चे नियम २७ (१) नुसार व महानगरपालिका पेन्शन विनियम १६ नुसार कायमस्वरुपी थांबवून व उर्वरित रक्कम रु.८,०५,३२३/-ही रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (इ) अन्वये डॉ.देशपांडे यांना देय असलेल्या मासिक निवृत्ती वेतनाच्या रक्कमेतुन रु.९,१८२/-प्रतिमहाप्रमाणे वसूल करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मुजीब खान : डॉ.देशपांडे यांचेकडून रक्कम वसूल करणेचा प्रस्ताव आहे.यापूर्वीही असाच प्रस्ताव आला होता. याबाबत सर्वसाधारण सभेने चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता.प्रशासनातर्फे याबाबतीत शासनाकडे पत्र पाठविण्यांत आले होते,त्यावर निर्णय घेण्यांत आलेला नाही.चौकशी समितीचा अहवाल नाही,शासनाने कोणताही निर्णय दिलेला नाही, सभेत प्रस्ताव ठेवणे निरर्थक आहे. डॉ.देशपांडे यांच्या प्रकरणात मनपाने शासनाकडे पाठपुरावा करून मार्गदर्शन घ्यावे. शासनाच्या निर्णयानंतरच रक्कम वसूलीची कार्यवाही करावी. मनपाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वास अनुसरून कार्यवाही करावी. जेणेकरून कुणावरही अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

श्री.अ.रशिद खान :या बाबत मा.न्यायालयात प्रकरण चालू आहे तसे पत्र दिले प्रकरण काय आहे कमेटी नेमली होती. अहवाल स.सदस्यांना अभ्यासासाठी दिलेला नाही काय निर्णय घेवू शकतो

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाला योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :या प्रकरणी मा.न्यायालयात वाद चालू आहे. यापूर्वी चौकशी कमेटी नियुक्त केल्या त्यांचे अहवाल पण आलेले नाही.अहवाल आले असेल तर स.सदस्यांना दयावे.त्यानुसार निर्णय घेता येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :या प्रकरणात निर्णय झालेला आहे फक्त कार्यवाही झाली नाही.

मा.महापौर : मा.आयुक्त यांनी या विषया संदर्भात सविस्तर माहिती घ्यावी. स.सदस्यांच्या सुचनेवरून या प्रकरणी न्यायालयात प्रकरण आहे असे वाटते चौकशी समितीचा अहवाल समोर आलेला नाही तुर्त हा विषय स्थगित करण्यात येतो पुढील सभेत सविस्तर माहितीसह ठेवण्यात यावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हा विषय स्थगित ठेवणेस व प्रशासनाने पूढीलसभेत सविस्तर माहितीसह ठेवण्यास मंजूरी देण्यांत आली.वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>स.सदस्यांचे प्रस्ताव</u>

**<u>विषय क्र. ९९० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२८ येथे बालवाडीत एका बालवाडी शिक्षिकेची फार आवश्यकता असून वार्ड क्र.२८ साठी बालवाडी शिक्षिकेचे पद निर्माण करुन या पदावर एका शिक्षिकेची नियुक्ती करण्यात यावी करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती खान मेहरुन्नीसा हमीद खान अनुमोदक : श्रीमती मोमीन सफिया फिरदोस

श्री.गजानन बारवाल :विषय चांगला असला तरी एक पद ऐवजी अनेक बालवाडी शिक्षकेची पदे भरण्याची आवश्यकता आहे सध्याला एकच पद भरणे योग्य नाही.हा विषय

शिक्षण समितीमध्ये ठेवून शासन किती पदांना मंजूरी देते ते बघून विचार करावा तुर्त हा विषय रद्द करावा.

मा.महापौर : शिक्षण समितीमध्ये या विषयावर चर्चा व्हावी इतर आवश्यक पदाचे बाबतीत त्यामध्ये घ्यावे. एकत्रित निर्णय त्यावर प्रशासनाने घ्यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने बालवाडी शिक्षिकांची पदे भरण्याबाबत आढावा घेवून एकत्रित प्रस्ताव शिक्षण समितीमध्ये ठेवण्यास व त्यानुषंगाने प्रशासनाने कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ९९१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, चौंडेश्वरी (गारखेडा परिसर) मधील मनपाने बांधलेल्या सभागृह आहे. हे सभागृह चौंडेश्वरी सहकारी गृहनिर्माण संस्थेने लिजवर देण्याबाबत विनंती केली आहे. तथापि सदरील सभागृह भाडेतत्वावर दिल्यास मनपाचा आर्थिक फायदा व सदर हॉलची देखरेख देखील होईल. करीता मनपाने बांधलेल्या चौंडेश्वरी सभागृह श्री.चौंडेश्वरी सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित यांना मनपाच्या अटी शर्ती नुसार लिजवर देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गजानन बारवाल　　　　　अनुमोदक :श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.रविंद्र गांगे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चौंडेश्वरी (गारखेडा परिसर) मधील महापालिकेने बांधलेले चौंडेश्वरी सभागृह श्री.चौंडेश्वरी सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित यांना नियमानुसार मनपाच्या अटी शर्ती नुसार लिजवर देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.९५ पदमपूरा येथील मुख्य चौकास संत शिरोमणी रोहिदास महाराज असे नांव देण्याबाबत येथील नागरीकांची मागणी होत आहे. तथापि सदर चौकास संत शिरोमणी रोहिदास महाराज चौक असे नांव देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गजानन रामकिशन बारवाल　　　　　अनुमोदक :श्री.संतोष जेजुरकर

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९५ पदमपूरा येथील मुख्य चौकास नियमानुसार संत शिरोमणी रोहिदास महाराज असे नांव देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,रोषनगेट ते जकातनाका या रस्त्यावर वाहतुकीची अत्यंत वर्दळ असते या ठिकाणी नागरीकांनी मागणी केलेली असल्याने या ठिकाणी श्री.एम.एम.शेख, मा.आमदार यांच्या घराजवळ चौकात एक हायमस्ट बसविणे अत्यंत आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.गजानन रामकिशन बारवाल

अनुमोदक :डॉ.भागवत कराड,श्री.रशीद खान (मामू),श्री.मो.जावेद मो.इसाक

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,रोषनगेट ते जकातनाका यारस्त्यावर श्री.एम.एम.शेख,मा.आमदार यांच्या घराजवळ चौकात नियमानुसार एक हायमस्ट बसविणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासन निर्णय क्रमांक-अग्रिम-१०००/प्रक्र.४२/२०००/विनियम मंत्रालय,मुंबई दिनांक ०१ जुलै,२००६ नुसार शासकीय वर्ग-३ चे कर्मचारी व वर्ग-२ आणि त्यावरील अधिकारी यांना वैयक्तिक संगणक खरेदीसाठी अग्रिम मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी यांना वरील शासन निर्णयाप्रमाणे वैयक्तिक संगणक खरेदी करणे करीता र.रु.२०,०००/- अग्रिम देण्यांत यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.विजय किसनराव खुडे अनुमोदक :श्री.मधुकर सावंत

मा.महापौर : प्रशासनाने निर्णय घ्यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्रमांक-अग्रिम-१०००/प्रक्र.४२/२०००/विनियम मंत्रालय, मुंबई दिनांक ०१ जुलै,२००६ नुसार शासकीय वर्ग-३ चे कर्मचारी व वर्ग-२ आणि त्यावरील अधिकारी यांना वैयक्तिक संगणक खरेदीसाठी अग्रिम मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्यामूळे, औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी यांना नियमानुसार वरील शासन निर्णयाप्रमाणे वैयक्तिक संगणक खरेदी करणे करीता र.रु.२०,०००/- अग्रिम देण्यांबाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घेण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, राज्यस्तरावरील सायकलींग खेळाडूंना वाव मिळावा म्हणून राज्यस्तरीय महापौर चषक सायकलींग स्पर्धेचे आयोजन करण्यांत यावे. सदरील स्पर्धा या येणाऱ्या संभाव्य खर्चासह शहरातील औरंगाबाद जिल्हा सायकलींग असोसिएशन, औरंगाबाद या संस्थेमार्फत घेण्यात याव्यात. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्यस्तरावरील सायकलींग खेळाडूंना वाव मिळावा म्हणून नियमानुसार राज्यस्तरीय महापौर चषक सायकलींग स्पर्धेचे आयोजन करण्यांस व सदरील स्पर्धाचे संभाव्य खर्चास नियमानुसार या स्पर्धा शहरातील औरंगाबाद जिल्हा सायकलींग असोसिएशन, औरंगाबाद या संस्थेमार्फत घेण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता व मनपाच्या प्रकल्प विभागामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांचा विचार करता आणि गलिच्छ वस्ती निर्मूलन,घर बांधणी व समाजकल्याण समितीमार्फत राबविण्यांत येत असलेल्या योजनेकरीता कर्मचारीवर्ग अपुरा पडत आहे.करीता प्रकल्पविभागाकरीता मनपा अस्थापनेवर कम्युनिटी ऑर्गनायझर म्हणून हे पद निर्माण करण्यांत यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय केनेकर अनुमोदक : श्री.सीताराम सुरे

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी<br>श्री.रेणुकादास वैद्य } : प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर : प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा व तसा अहवाल सादर करण्यांत यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा व तसा अहवाल सादर करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ९९७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५७,भावानीनगर येथील जुना मोंढा चौकाचे "श्री.संत रोहिदास महाराज चौक" असे नामकरण येथील नागरीकाच्या मागणीनुसार करण्यात यावा येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर करण्यात यावे.

सुचक :श्री.त्र्यंबक तुपे अनुमोदक :सौ.रेखा कैलास काथार

मा.महापौर		: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७,भावानीनगर येथील जुना मोंढा चौकाचे नियमानुसार "श्री.संत रोहिदास महाराज चौक" असे नामकरण करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,

| जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|
| १. प्रभाग क्र.०४ मधील होनाजीनगर येथे पाथवे तयार करणे या कामासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र्.ए.सी.इ.ए-९ अ.क्र. १ वर तरतुद रक्कम रु.३.९० लक्ष<br>२. प्रभाग क्र.०४ मधील एन १३ बेघर योजना मधील विविध गल्यामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र्.ए.सी.इ.ए-९ अ.क्र.१० वर तरतुद रक्कम रु. ६० हजार | प्रभाग क्र. ०४ मधील होनाजीनगर येथे २५० मी.मी. आरसीसी व चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे यासाठी सदरील रु.४.५० लक्ष वळती करण्यात यावे. |

सुचक : श्री.रविकांत गवळी		अनुमोदक : श्री.सिताराम सुरे,श्री.मो.जावेद मो.इसाक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पात प्रभाग क्र.४ करीता असलेल्या तरतूदीचे लेखाशिर्ष नियमानुसार खालीलप्रमाणे बदलणेस मंजूरी देण्यांत येते.

| जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|
| १. प्रभाग क्र.०४ मधील होनाजीनगर येथे पाथवे तयार करणे या कामासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र्.ए.सी.इ.ए-९ अ.क्र. १ वर तरतुद रक्कम रु.३.९० लक्ष<br>२. प्रभाग क्र.०४ मधील एन १३ बेघर योजना मधील विविध गल्यामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र्.ए.सी.इ.ए-९ अ.क्र.१० वर तरतुद रक्कम रु. ६० हजार | प्रभाग क्र. ०४ मधील होनाजीनगर येथे २५० मी.मी. आरसीसी व चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे यासाठी सदरील रु.४.५० लक्ष वळती करण्यात यावे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.३६ नागेश्वरवाडी परिसरातील काबरा उद्यान मधील सभागृहास वीर बाजीप्रभु सभागृह असे नांव देणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.लता दलाल		अनुमोदक :श्री.मोहन मेघावाले

मा.महापौर		: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३६ नागेश्वरवाडी परिसरातील काबरा उद्यान मधील सभागृहास नियमानुसार वीर बाजीप्रभु सभागृह असे नांव देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,

| मुळ लेखाशिर्षक | सुधारित लेखाशिर्षक |
|---|---|
| GBRF-६ अ.क्र.४ प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथे प्रवेशद्वार उभारणे या कामासाठी रु. ५.०० लाख | त्यातील रु.१.५०(अक्षरी रुपये एकलाख पन्नास हजार फक्त) हे सहकारनगर येथील खुल्या जागेत लोककला उद्यानातील विविध कामे करण्यासाठी वळती करण्यात यावेत. |

वरीलप्रमाणे लेखाशिर्ष बदल करण्यास सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवण्यात येतो. कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.सतिष कटकटे अनुमोदक :श्री.रवि गांगे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येते.

| मुळ लेखाशिर्षक | सुधारित लेखाशिर्षक |
|---|---|
| GBRF-६ अ.क्र.४ प्रभाग क्र.८९ ज्योतीनगर येथे प्रवेशद्वार उभारणे या कामासाठी रु.५.०० लाख | त्यातील रु.१.५०(अक्षरी रुपये एकलाख पन्नास हजार फक्त) हे सहकारनगर येथील खुल्या जागेत लोककला उद्यानातील विविध कामे करण्यासाठी वळती करण्यात यावेत. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गरवारे उद्योग समुहाने शहराच्या विकासासाठी मदत व्हावी या उद्देशाने गरवारे कम्युनिटी सेंटरची स्थापना केली असून ती एक धर्मादाय संस्था असून हया संस्थे मार्फत ना नफा ना तोटा या तत्वावर समाजपयोगी, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रिडा तसेच मुलांसाठी व महिलांसाठी विविध उपक्रम मागील सोळा वर्षापासून महानगरपालिकेच्या सौजन्याने राबविले जातात. हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण आहे. या संस्थेला ज्योतीनगर येथील समाजमंदिर चालविण्यास देण्यात यावे. या समाजमंदिराची मालकी महानगरपालिकेचीच राहिल. स्थानिक रहिवाशांच्या सहकार्याने हे केंद्र चालविले जाईल. या केंद्रामध्ये खाजगी कार्यक्रम तसेच लग्न, मुंज अशी घरगुती समारंभ त्याचप्रमाणे कोणतेही राजकीय व धार्मिक स्वरुपाचे कार्यक्रम होणार नाहीत. सदर समाजमंदिराची संपूर्ण देखभाल, वीज, पाणी, इमारत दुरुस्ती, रंगरंगोटी परिसरातील झाडांची देखभाल इत्यादीसाठी लागणारा सर्व खर्च कम्युनिटी सेंटर मार्फत करण्यात येईल. महानगरपालिकेला काहीही अतिरिक्त खर्च पडणार नाही. गरवारे कम्युनिटी सेंटर ही संस्था ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येत असल्याने महानगरपालिकेने ज्योतीनगर मधील समाजमंदिर व त्यालगतचे मैदान सदर संस्थेस नाममात्र व दीर्घ मुदतीच्या करारावर देणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक :श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गरवारे कम्युनिटी सेंटर ही संस्था ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येत असल्याने महानगरपालिकेने ज्योतीनगर मधील आमदार निधीतून बांधण्यात आलेले स्व.शालीग्राम बसैय्ये बंधु समाजमंदिर व त्यालगतचे मैदान सदर संस्थेस नाममात्र व दीर्घ मुदतीच्या करारावर देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझे वार्ड क्र.२८ मधील आलमगीर कॉलनी येथे महानगरपालिकेचे दोन सभागृह असून माझ्या वार्डातील नोंदणीकृत संस्था अमन मेडिकल फांउडेशन औरंगाबाद या संस्थेस सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी नाममात्र भाडे तत्वावर देण्यात यावे. सध्या हे दोन्ही सभागृह रिकामे असून तेथे लहान मुले क्रिकेट व अन्य खेळ खेळून त्याचे नुकसान करीत असल्याने सदरील संस्थेस सभागृह नाममात्र भाडे तत्वावर दिल्यास सभागृहाची देखभाल होऊन संस्थेच्या वतीने तेथील गरीब व गरजू नागरीकांसाठी सामाजिक,आरोग्य विषयक व विविध उपक्रम राबविण्यास सोईस्कर होईल.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्रीमती खान मेहरुन्नीसा हमीद खान

अनुमोदक :श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युबखान

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :मंजूर करण्यास हरकत नाही संस्थेस देत आहोत का कुणी विनंती केली होती का ?

मा.महापौर :विनंती केलेली होती.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :त्या त्या भागातील सभागृह,उदयान व इतर ज्या इमारती देणे सारखे आहे त्या भागातील नागरीकाची केअरटेक म्हणून घेणेस जे वयोवृध्द नागरीक आहे ते चांगले लक्ष देवू शकतात मागणी असेल त्यांना देण्यात यावे. जे अवैध धंदे चालतात ते बंद होतील.

श्री.गजानन बारवाल :त्या त्या वार्डात सेवाभावी संस्था घेण्यास तयार असेल

मा.महापौर :या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.ज्या ज्या वार्डात समाज मंदीर, हॉल, सांस्कृतिक सभागृह असेल ते त्या त्या भागातील सेवाभावी संस्था,गृह निर्माण संस्थेने मागणी केली असेल त्यांना केअरटेकर म्हणून ते चालविण्यासाठी देण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ मधील आलमगीर कॉलनी येथे महानगरपालिकेचे दोन सभागृह असून वार्डातील नोंदणीकृत संस्था अमन मेडिकल फांउडेशन औरंगाबाद या संस्थेस सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी नाममात्र भाडे तत्वावर नियमानुसार देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात पृक्र.जी.बी.आर.डी-५ वर समर्थनगर येथील विर सावरकर चौकात विद्युतीकरण व सौदर्यीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.५ लक्ष तरतुद उपलब्ध आहे. स्वातंत्र्यसैनिक श्री.सावरकर यांच्या संघर्षमय जिवनातील दृश्य त्यांच्या पुतळया मागील भिंतीवर फायबर ऑप्टीकल मध्ये लावणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.कला बोरामणीकर अनुमोदक :श्री.सतिष कटकटे,श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात पृक्र.जी.बी.आर.डी-५ वर समर्थनगर येथील विर सावरकर चौकात विद्युतीकरण व सौदर्यीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.५ लक्ष तरतुद उपलब्ध असल्यामूळे, नियमानुसार स्वातंत्र्यसैनिक श्री.सावरकर यांच्या संघर्षमय जिवनातील दृश्य त्यांच्या पुतळया मागील भिंतीवर फायबर ऑप्टीकल मध्ये लावणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अल्पसंख्यांक मंत्रालय महाराष्ट्र राज्य आणि सिंकदर अली वज्द मेमोरियल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर 'वली नगरी' या नावाने भव्य मंडप उभारुन 'अदब,फन और तहजीब उर्दू के आंगन में' उर्दू साहित्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उर्दू साहित्य महोत्सवात चर्चासत्र, कवि संमेलन, हास्य कवि संमेलन, गजल गायन, कव्वाली, लघुनाटक,विद्यार्थ्यासाठी विविध कार्यक्रम,ग्रंथ मेळा,मीना बाजार आणि उर्दू भाषेतील पारंपारिक लोकगीत इत्यादी कार्यक्रमाचा समावेश होणार आहे.

या कार्यक्रमासाठी देशभरातून विविध क्षेत्रातील साहित्यीक,कवि आणि कलाकार येणार आहेत. या सर्वांचा राहण्याची,भोजनाची आणि निवासाची देखील सोय करण्यात आली. संपुर्ण महाराष्ट्रातुन यजमानपद भुषविण्याचा मान आपल्या शहरास मिळाला आहे.

करिता या कार्यक्रमास महानगरपालिकेतर्फे रक्कम रु.५ लाख आर्थिक सहाय्य करण्यासाठी सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी प्रस्ताव सादर.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान    अनुमोदक : श्री.रशीद खॉन (मामू)

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : जो विषय आला व हा कार्यक्रम शासनाने घेतला होता मदत करण्यास हरकत नाही. जेवढी मदत महापालिकेला करता येईल, तेवढी निश्चितपणे करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : निश्चितपणे काहीना काही मदत देण्याचा विचार करावा.

श्री.अ.रशिद खान मामु : सर्वांसाठीच हा कार्यक्रम होता कमीत कमी ३ लक्षची मदत करण्यात यावी.

मा.महापौर : स.सदस्य श्री.रेणुकादास वैद्य यांनी विनंती केली या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येवून या कार्यक्रमांसाठी ३ लक्षची आर्थिक मदत देण्यांस मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार अल्पसंख्यांक मंत्रालय महाराष्ट्र राज्य आणि सिंकदर अली वज्द मेमोरियल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर 'वली नगरी' या नावाने भव्य मंडप उभारुन 'अदब,फन और तहजीब उर्दू के आंगन में' उर्दू साहित्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उर्दू साहित्य महोत्सवात चर्चासत्र, कवि संमेलन, हास्य कवि संमेलन, गजल गायन, कव्वाली, लघुनाटक,विद्यार्थ्यासाठी विविध कार्यक्रम,ग्रंथ मेळा,मीना बाजार आणि उर्दू भाषेतील पारंपारिक लोकगीत इत्यादी कार्यक्रमाचा समावेश होणार असल्यामूळे, नियमानुसार या कार्यक्रमास महानगरपालिकेतर्फे रक्कम रु.३ लाख आर्थिक सहाय्य करण्यास व सिंकदर अली वज्द मेमोरियल ट्रस्ट या नांवाने धनादेश देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्रं. १००५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राज्य शासनाने 'महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान' ची योजना जाहीर केली असुन या योजनेत ड वर्गातील महानगरपालिकांसाठी पायाभूत सुविधा जसे रस्ते,घनकचरा व्यवस्थापन,पाणीपुरवठा, झोपडपट्टी निर्मुलन उर्जाबचत प्रकल्प,सामाजिक सुविधा, ऐतिहासिक वास्तुंचे जतन व संवर्धन मलप्रक्रिया प्रकल्प,शालेय शिक्षणासाठी पायाभूत सुविधा ईत्यादि कार्यक्रमांकरिता आर्थीक मदत करणे हा या योजनेचा हेतू आहे. या महाअभियाना अंतर्गत राज्यशासनाने निर्देशित केलेल्या अनिवार्य सुधारणा (Mandatory Reforms) पुर्ण करणे व यासाठी कालमर्यादा,वेळापत्रक ठरविणे आवश्यक आहे. विकास आराखडयास सुसंगत असलेले विविध विकास प्रकल्प अर्थसाहयासाठी या अभियाना अंतर्गत पाठविण्यांत येईल.

प्रस्तावित योजनेसाठी जवाहरलाल नेहरू नागरी-पुनरूज्जीवन अभियान (JNNURM) साठी शहर विकास आराखडा (CDP) आवश्यक आहे त्याच धर्तीवर शहर विकास आराखडा (CDP) तयार करावा लागेल. औरंगाबाद महानगरपालिकेने शहर विकास आराखडा (CDP) तयार केलेला असून त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता देखिल झालेली आहे.

तरी या प्रकरणी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत विविध विकास कामांचे प्रकल्पास राज्य शासनाचे ५० टक्के अर्थसहाय्य प्राप्त करून घेणेस व हया प्रकल्पास शासनातर्फे असलेल्या अटी शर्ती प्रमाणे महाराष्ट्र अर्बन इन्फ्रस्ट्क्चर्स डेव्हलपमेंट कंपणी लिमिटेड (MUIDCL) यांचेकडुन उर्वरित ५० टक्के रक्कम सुलभ व्याज दराने कर्ज घेणेस व आवश्यक असलेले करारनामा (MOU) करणे ईत्यादि बाबत मान्यता देणे तसेच या व्यतिरिक्त अनुदान मिळणेसाठी जेजे प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) पाठवायचे असतील ते प्रस्ताव पाठविणेस महापालिका आयुक्तांना प्राधिकृत करणेस प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

मा.महापौर :ऐनवेळी स.सदस्यांचे व काही प्रशासनाचे प्रस्ताव आलेले आहेत हे सर्व प्रस्ताव आपल्या सर्वाच्या सम्मतीने व एकमताने मंजूर करण्यात येते.

श्री.गजानन बारवाल : एक विषय टपरी देणे बाबतचा आहे जेथून टपरी काढली तेथे पुन्हा देणार असेल तर चुकीचे होईल.

मा.महापौर :या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.गजानन बारवाल :उस्मानपूरा भागात स.सदस्य श्री.कचरू मोरे यांचे वार्डात काही घरे तोडण्यात आली त्या लोकांना न्याय दयावा.

मा.महापौर :ऐनवेळचे प्रस्ताव मंजूर केलेले आहे आणखी काही प्रस्ताव आहे ते मंजूर केले जातील आपल्या सर्वाच्या सोयीकरीता आपण एकमताने ऐनवेळचे प्रशासकीय, स.सदस्यांचे प्रस्ताव मंजूर करीत आहोत

श्री.गजानन बारवाल :मंजूरी देण्यात यावी.

याचवेळी अनेक स.सदस्य ऐनवेळचे सर्व प्रस्ताव मंजूर करावे असे बोलतात.

मा.महापौर :सर्व प्रशासकीय प्रस्तावास स.सदस्यांच्या प्रस्तावास एकमताने स्वीकृतीसह मंजूरी दिलेली आहे हे एकमताने सांगितलेले आहे.सर्व ऐनवेळच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शिविल्याप्रमाणे शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान' ही योजना जाहीर केली असुन या योजनेत ड वर्ग महानगरपालिकांसाठी पायाभूत सुविधा जसे रस्ते,घनकचरा व्यवस्थापन,पाणीपुरवठा, झोपडपट्टी निर्मुलन उर्जाबचत प्रकल्प,सामाजिक सुविधा, ऐतिहासिक वास्तुंचे जतन व संवर्धन, मलप्रक्रिया प्रकल्प,शालेय शिक्षणासाठी पायाभूत सुविधा ईत्यादि कार्यक्रमांकरिता आर्थीक मदत करणे हा हेतु आहे. त्यानुषंगाने महाअभियान या अंतर्गत प्रस्तावित केल्यानुसार अर्थसाहय मिळणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मंजूरी देण्यात येते.

या महाअभियाना अंतर्गत राज्यशासनाने निर्देशित केलेल्या अनिवार्य सुधारणा (Mandatory Reforms) मान्य करण्यास व शासनातर्फे असलेल्या अटी शर्ती प्रमाणे उर्वरित ५० टक्केची रक्कम महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्टक्चर्स डेंव्हलपमेंट कंपणी मर्यादित यांचेकडुन सुलभ व्याज दराने कर्ज घेणेस मान्यता देण्यात येते. तसेच महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत विविध विकास कामासाठी अर्थसाहय मिळण्याकरीता शासनासह आवश्यक असलेले करारनामा (MOU) करून देणे तसेच अनुदान मिळणेसाठी जेजे प्रस्ताव व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) पाठवावयाचे असतील ते पाठविण्यासाठी महापालिका आयुक्तांना प्राधिकृत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १००६ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड,औरंगाबाद येथे मल्टी डायग्नोस्टीक सेंटर यात सीटी स्कॅन,एम.आर.आय.,एक्स-रे, मॅमोग्राफि,सोनोग्राफि,पॅथॉलॉजी लॅब इत्यादीचे डायग्नोस्टीक सेंटर बी.ओ.टी.तत्वावर सुरू करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ९७ दिनांक ३१.०१.२००८ नुसार मान्यता प्राप्त आहे. तसेच मे.तापडीया डायग्नोस्टीक सेंटरला संबंधीत सेंटर बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यासाठी दिनांक २७.०८.२००९ रोजीच्या मा.स्थायी समितीचा ठराव क्रमांक १२७ नुसार मंजूरी देण्यात आली आहे.

मे.तापडीया डायग्नोस्टीक सर्व्हीसेस हे रूटिन डायग्नोस्टीक सर्व्हीसेस (एमआरआय, सोनोग्राफि,मेमोग्राफि,ॲडव्हान्स पॅथॉलॉजी) यासाठी १२ टक्के रॉयल्टी महापालिकेस देतील, याशिवाय अतिरिक्त सुविधा न्युक्लीअर स्कॅन,६४ स्लाईस एमडीसीटीसाठी महिन्याला रू.१५०००/-

(रूपये पंधरा हजार फक्त) व कन्सल्टींग आणि ओपीडी सर्व्हीसेससाठी रू.५०००/- (रूपये पाच हजार फक्त) महानगरपालिकेस देतील. मासीक भाडे रक्कमेत दरवर्षी मूळ रक्कमेत ५ % वाढ करण्यांत येईल. करीता सुधारीत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सविनय सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड,औरंगाबाद येथे मल्टी डायग्नोस्टीक सेंटर यात सीटी स्कॅन,एम.आर.आय., एक्स-रे, मॅमोग्राफि,सोनोग्राफि,पॅथॉलॉजी लॅब इत्यादीचे डायग्नोस्टीक सेंटर बी.ओ.टी.तत्वावर सुरू करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ९७ दिनांक ३१.०१.२००८ नुसार मान्यता प्राप्त असल्यामूळे, तसेच मे.तापडीया डायग्नोस्टीक सेंटरला संबंधीत सेंटर बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यासाठी दिनांक २७.०८.२००९ रोजीच्या मा.स्थायी समितीचा ठराव क्रमांक १२७ नुसार मंजूरी देण्यात आली असल्यामूळे, मे.तापडीया डायग्नोस्टीक सर्व्हीसेस हे रूटिन डायग्नोस्टीक सर्व्हीसेस (एमआरआय, सोनोग्राफि,मेमोग्राफि,ॲडव्हान्स पॅथॉलॉजी) यासाठी १२ टक्के रॉयल्टी महापालिकेस देतील, याशिवाय अतिरिक्त सुविधा न्युक्लीअर स्कॅन,६४ स्लाईस एमडीसीटीसाठी महिन्याला रू.१५०००/- (रूपये पंधरा हजार फक्त) व कन्सल्टींग आणि ओपीडी सर्व्हीसेससाठी रू.५०००/- (रूपये पाच हजार फक्त) महानगरपालिकेस देतील, आणि मासीक भाडे रक्कमेत दरवर्षी मूळ रक्कमेत ५ % वाढ करण्यांस मान्यता देण्यांत येते. यासह सुधारीत प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १००७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत फारोळा येथे १०० दलली व ५६ दलली प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र आहेत. जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्यातील गढुळता कमी करण्यासाठी पी.ए.सी. पावडरचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे पाण्याचे निर्जतुंकीकरण करण्यासाठी ब्लिचींग पावडर व क्लोरीन गॅसचा वापर केला जातो. कच्च्या पाण्यातील गढुळतेच्या प्रमाणानुसार पी.ए.सी. पावडरचा दैनदिन वापर ठरवला जातो. पावसाळयाच्या दिवसात धरणाच्या पाणी साठयात वाढ झाल्यानंतर पाण्यातील गढुळतेचे प्रमाण वाढते तसेच उन्हाळयाच्या शेवटी धरणातील पाणीसाठी कमी झाल्यानंतरही पाण्यातील गढुळतेचे प्रमाण वाढते. त्याचप्रमाणे पाण्यात सडलेल्या पाणवनस्पतीमुळे पाण्याला हिरवट रंग येतो. तेव्हा पी.ए.सी. पावडरचा वापर जास्त प्रमाणावर करावा लागतो. दोन्हीही जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता लक्षात घेता फारोळा येथे दररोज १५० दलली पाण्यावर प्रक्रिया केली जाते. सर्वसाधारण परिस्थितीमुळे ३ पी.पी.एम. इतक्या प्रमाणावर पी.ए.सी. पावडरचा वापर केल्यास दररोज ४५० किलो इतक्या पी.ए.सी. पावडरची आवश्यकता आहे. या वापरानुसार जलशुध्दीकरण केंद्राची वार्षीक मागणी पावसाळयातील जीस्तीची मात्रा लक्षात घेऊन १८० मे टन इतकी आहे.

या पुरवठयाचा समावेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीमध्ये नसल्याने पुरवठयाचे अंदाजपत्रक मागील वर्षाच्या निविदेतील मंजुर पुरवठयाच्या दरांनुसार तयार केलेले असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४८,६०,०००/- इतकी आहे. सद्यस्थितीत सुरु असलेल्या पुरवठा हा मे २०१० पर्यंत सुरु राहणार असल्याने या आर्थिक वर्षात या पुरवठयावर खर्च होणार नाही. सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात या कामासाठी तरतुद उपलब्ध नाही परंतु या आर्थीक वर्षात या पुरवठयावर खर्च होणार नसल्याने आगामी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात या पुरवठयाकरीता विभागाकडून तरतुद उपलब्ध करुन घेतली जाईल. त्याचप्रमाणे सद्यस्थितीत सुरु असलेला पुरवठा पूर्ण झाल्यानंतरच नवीन पुरवठयाचे कार्यादेश देण्यात येतील.

करीता फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता पी.ए.सी. पावडर पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक रुपये ४८,६०,०००/- चे मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता पी.ए.सी. पावडर पुरवठा करण्याचे रक्कम रुपये ४८,६०,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १००८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत नविन समांतर पाणी पुरवठा योजनेचे संकल्पन व नियोजन केले.रुपये ३६९.९७ कोटी रक्कमेच्या प्रस्तावाला केंद्र शासनाच्या UIDSSMT या योजनेचे अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच सदर योजना Public Private Partnership (PPP) तत्वावर राबविण्या बाबत महानगरपालिकेने निर्णय घेतलेला असुन या संदर्भाने निविदा कार्यवाही सुरु झालेली आहे. निविदा कार्यवाही दोन टप्प्यांमध्ये असून टप्पा-१ अंतर्गत RFQ ची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. टप्पा -२ अंतर्गत RFP ची कार्यवाही सुरु आहे.

उपरोक्त योजने करीता केंद्र शासनाचे ८०% अनुदान अनुज्ञेय असून त्यापैकी ५०% रक्कम रुपये १४३.८६ कोटीचे अनुदान दिनांक ०३.११.२००९ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे. केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत शासकिय अनुदान प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालीलप्रमाणे सुधारणा (Reforms) राबविणे व त्यानुषंगने सुधारणा करणे बंधनकारक आहे.

A) Mandatory Reforms
१. E-Governance.
२. Municipal Accounting
३. Property Tax
४. User Charges
५. Internal earmarking of funds for services to Urban poor.
६. Provision of basic services to Urban poor.
B) Optional Reforms.
१. Revision of building byelaws to streamline the approval process.
२. Revision of building byelaws to make rainwater harvesting mandatory in all buildings to come up in future and for adoption of water conservation Measures.
३. Earmarking at least २०-२५ % of developed and in all housing projects (Both public and private Agencies) for EWS/LIG category with systems of cross subsidization.
४.Byelaws on reuse of recycled water.
५. Administrative reforms.
६. Structural Reforms.
७. Encouraging public private partnership.

उपरोक्त सुधारणा राबविण्या संदर्भाने विहित नमुन्यातील करारनामा औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासना सोबत केलेला आहे. वर नमूद केलेल्या सुधारणा राबऊन त्यांचा प्रगती अहवाल दर तिन महिन्यांनी शासनास सादर करणे बंधन कारक आहे. वरील सुधारणा (Reforms) राबविण्याच्या कामाकरीता (Reforms and MOA Monitoring Assistance) स्वंतत्र यंत्रणा नियुक्त करुन उपरोक्त सुधारणा (Reforms) विहित मुदतीत व शासनाने दिलेल्या निर्देशानुसार राबविणे योग्य राहील कारण त्या शिवाय UIDSSMT या योजने अंतर्गत केंद्र वा राज्य शासनाकडून दुसऱ्या टप्पा पोटी कुठलेही अनुदान उपलब्ध होणार नाही.

नाशिक व पिंप्री -चिंचवड महानगरपालिकेकडून माहिती घेतली असता केंद्र शासनाच्या JNNURM मध्ये मंजुर झालेल्या प्रकल्पांकरीता शासनाने बंधनकारक केलेल्या विविध सुधारणा (Reforms and MOA Monitoring and implementation Assistance) करीता स्वतंत्र यंत्रणा नियुक्त केलेल्या आहेत.

नाशिक महानगरपालिका - रुपये ७५० कोटी रकमेचे सहा प्रकल्प रुपये ६९ लक्ष प्रतिवर्ष

पिंप्रि-चिंचवड महानगरपालिका- रुपये २६०० कोटी रकमेचे चौदा प्रकल्प रुपये १०६ लक्ष प्रति वर्ष

औरंगाबाद महानगरपालिकेने या कामाकरीता Expression of Interest (EOI) मागविल्या नंतरच प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाबाबत माहिती मिळू शकेल.

करीता सुधारणा (Reforms) राबविण्यासाठी Expression of Interest मागवुन यंत्रणा करण्याच्या कामा संदर्भातील ठराव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेने शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत नविन समांतर पाणी पुरवठा योजनेचे संकल्पन व नियोजन केले. रुपये ३६९.९७ कोटी रक्कमेच्या प्रस्तावाला केंद्र शासनाच्या UIDSSMT या योजनेचे अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेली असल्यामूळे, तसेच सदर योजना Public Private Partnership (PPP) तत्वावर राबविण्या बाबत महानगरपालिकेने निर्णय घेतलेला असुन या संदर्भाने निविदा कार्यवाही सुरु झालेली असून निविदा कार्यवाही दोन टप्प्यांमध्ये असून टप्पा-१ अंतर्गत RFQ ची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. टप्पा -२ अंतर्गत RFP ची कार्यवाही सुरु असून या योजने करीता केंद्र शासनाचे ८०% अनुदान अनुज्ञेय असून त्यापैकी ५०% रक्कम रुपये १४३.८६ कोटीचे अनुदान दिनांक ०३.११.२००९ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झालेली असल्यामूळे, केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत शासकिय अनुदान प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालीलप्रमाणे सुधारणा (Reforms) राबविणेस मंजूरी देण्यांत येते.

A) Mandatory Reforms
१. E-Governance.
२. Municipal Accounting
३. Property Tax
४. User Charges
५. Internal earmarking of funds for services to Urban poor.
६. Provision of basic services to Urban poor.
B) Optional Reforms.
१. Revision of building byelaws to streamline the approval process.
२. Revision of building byelaws to make rainwater harvesting mandatory in all buildings to come up in future and for adoption of water conservation Measures.
३. Earmarking at least २०-२५ % of developed and in all housing projects (Both public and private Agencies) for EWS/LIG category with systems of cross subsidization.
४.Byelaws on reuse of recycled water.
५. Administrative reforms.
६. Structural Reforms.
७. Encouraging public private partnership.

तसेच उपरोक्त सुधारणा राबविण्या संदर्भाने विहित नमुन्यातील करारनामा औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासना सोबत केलेला असल्यामूळे, वर नमूद केलेल्या सुधारणा राबऊन त्यांचा प्रगती अहवाल दर तिन महिन्यांनी शासनास सादर करणेस आणि वरील सुधारणा (Reforms) राबविण्याच्या कामाकरीता (Reforms and MOA Monitoring Assistance) स्वंतत्र यंत्रणा नियुक्त करुन उपरोक्त सुधारणा (Reforms) विहित मुदतीत व शासनाने दिलेल्या

निर्देशानुसार राबविणेस मंजूरी देण्यांत येते. सुधारणा (Reforms) राबविण्यासाठी Expression of Interest मागवुन यंत्रणा करण्याच्या कामासही मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र ९६ मधील जुन्य पुलाची उंची वाढविणे या कामा करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३२०६१३६/- चे अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र. १८० दिनांक ०४.०२.२००९ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

तसेच सदर कामाकरीता निविदा पत्रके मागविण्यात आली असता सदर काम मे. अमन कन्सट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९ % जास्त दराने करुन घेण्यास मा. स्थायी समिती विषय क्र. २६० दिनांक २६.०२.२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

परंतु प्रत्यक्ष काम करतेवेळी मुळ अंदाजपत्रकातील Abutment /pier साठी PWD कडील Type Design/IRC Specification नुसार M-१५ ऐवजी M-२० आणि स्लॅबसाठी M-२० ऐवजी M-२५ ग्रेडनुसार काँक्रीट करणे आवश्यक आहे. करीता सदर बदल लक्षात घेऊन सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात असून ते रक्कम रु. ४९०२२७६/- इतक्या रक्कमेचे होत आहे.

तरी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. ४९०२२७६/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर तसेच सुधारीत अंदाजपत्रकानुसार सदरील काम मे. अमन कन्स्ट्रक्शन यांचेकडून मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९ % जास्त या दराने करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेचा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९६ मधील जुन्य पुलाची उंची वाढविणे या कामाच्या सुधारीत रक्कम रु.४९०२२७६/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच सुधारीत अंदाजपत्रकानुसार सदरील काम मे.अमन कन्स्ट्रक्शन यांचेकडून मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराने करुन घेणेसही मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मध्यवर्ती जकात नाका परिसर येथे नागरिकांच्या सुविधे करीता सुलभ शौचालय बांधावयाचे आहे. सदर ठिकाणी सुलभ शौचालय बांधणे करीता मा. पालिका सर्वसाधारण सभेने औरंगाबाद महापालिका हद्दीत एकुण २० ठिकाणी सुलभ शौचालय बांधणे बाबत यापूर्वी विषय क्रमांक ७६३ दिनांक २८.०२.२००७ अन्वये मंजुरी प्रदान केलेली असून, त्यामध्ये या स्थळाचा समावेश आहे.

सदर सुलभ शौचालय मध्यवर्ती जकात नाकाच्या ज्या भागात बांधावयाचे आहे. त्या ठिकाणी महानगरपालिकेचेच जुने डॉग हाऊस आहे. तथापि सदरचे डॉग हाऊस जुन झाले असून जिर्ण झ ाल्याने आता वापरात नाही. त्यामुळे येथे सुलभ शौचालय बांधण्याचे प्रस्तावीत आहे. तसेच या संबधी संचालक प्राणी संग्रहालय, महानगरपालिका औरंगाबाद यांनी अभिप्राय दिला असून सदर जुने जिर्ण झालेले डॉग हाऊस वापरात नसल्याने पाडून सदर ठिकाणी सुलभ शौचालय बांधणे बाबत त्यांनी अनुकूल मत नोंदविले आहे.

त्यास्तव जुने वापरात नसलेले व जिर्ण झालेले डॉग हाऊचे पाडकाम करणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. तसेच इंदिरानगर (गारखेडा) व परिसरातील जुने शौचालय तोडून तेथे सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेस परवाणगी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मध्यवर्ती जकात नाका परिसर येथे जुने वापरात नसलेले व जिर्ण झालेले डॉग हाऊचे पाडकाम करणेस व सदर ठिकाणी सुलभ शौचालय बांधणेस तसेच इंदिरानगर

(गारखेडा) व परिसरातील जुने शौचालय तोडून तेथे सुलभ पध्दतीने शौचालय बांधणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कार्यकारी अभियंता वार्ड ब व क यांनी प्रस्ताव सादर केला की, बनेवाडी येथे ३० द.ल.ली. क्षमतेचा सिवेज ट्रीटमेंट प्लॉट बांधणे या कामासाठी राज्य शासनाकडे अनुदान वितरीत करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर कामास औरंगाबाद येथे दिनांक १८.०९.२००८ रोजी संपन्न झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली असून सदरच्या कामाचा समावेश मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत करण्यात आलेला आहे. सदर बनेवाडी येथे सिवेज ट्रिटमेंट प्लॉट बांधणे या प्रकल्पाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३० कोटी असून, अनुदान प्राप्तीसाठी या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail project report) राज्य शासनास सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने शासनाने त्रुटींची पुर्तता करणे बाबत निर्देश दिले असून सदरील त्रुटींची पुर्तता शासन निर्णय २२ ऑक्टोबर २००८ व २३ डिसेंबर २००८ नुसार करणे बाबत सुचीत केले आहे. यापूर्वी पालिका सर्वसाधारण सभेने पारीत ठराव क्रमांक ३०१ दिनांक २०.०९.२००८ अन्वये शहरात विविध ठिकाणी सिवेज ट्रिटमेंट प्लॉट बांधणे या कामासाठी मंजुरी प्रदान केलेली आहे.

शासनाच्या प्राप्त झालेल्या निर्देशानुसार औरंगाबाद महानगरपालिकेला शासनाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात (१) शासना सोबत करावयाचा करारनामा व (२) विहीत नमुन्यातील सर्वसाधारण सभेचा पारीत ठराव तसेच (३) उक्त शासन निर्णयात नमुद प्रमाणे परिशिष्ठ १ व प्रपत्र १ मध्ये नमुद केलेल्या नागरी पाणी पुरवठा व्यवस्थापन व सुधारणात्मक उपाय योजना संबंधाने माहिती भरणा करुन देणे बंधनकारक आहे.

उक्त शासन निर्णयात नमूद प्रमाणे सन २०१० -११ हे वर्ष महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्ष म्हणुन सुजन व निर्मल अभियान अंतर्गत साजरे करावयाचे असून या प्रमाणे नागरी संस्थाना विविध सुधाराणात्मक उपाय योजना स्विकारण्यासाठी व त्या पूर्ण करण्यासाठी शासनासोबत लेखी करार करावयाचा आहे.

उक्त शासन निर्णयाचा थोडकयात तपशील खालील नमुद प्रमाणे आहे.

**शासन निर्णय दिनांक २२ ऑक्टोबर २००८**

१) नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम, घनकचरा व्यवस्थापन संदर्भात पर्याप्त व गुणवत्तापूर्ण सेवा किफायतशीर सेवा शुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक आर्थीक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करुन ते सुवर्ण जयंती वर्ष २०११ पर्यंत साध्य करणे.

२) या शासन निर्णयानुसार व औरंगाबाद महानगरपालिकेला उक्त प्रकल्पासाठी ७० % शासनाचा सहभाग व ३०% महानगरपालिकेचा हिस्सा अशा स्वरुपाने अनुदान प्राप्त होईल. सदरचे अनुदान नविन तसेच प्रगतीपथावरील अशा पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांना लागू राहील. तथापी यासाठी उभारावयाच्या कर्जासाठी राज्य शासनाद्वारे हमी देण्यात येणार नाही.

३) पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी लहान व मध्यम शहराच्या पायाभुत सुविधा योजने अंतर्गत UIDSSMT मंजुर झालेल्या योजनांसाठी वाढीव अनुदान प्रस्तावीत करता येणार नाही.

४) नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण,स्वच्छता,घनकचरा व्यवस्थापन संदर्भात पर्याप्त गुणवत्ता पूर्ण सेवा उपलब्ध करुन देणे या संबधाने सामाविष्ठ असलेले परिशिष्ठ १ मधील सुधारणांचे मुद्दे भरणा करुन देणे व त्याचा अमल करणे बंधनकारक राहील.

५) ज्या नागरी संस्था या सुधारणा करणार नाही अशा नागरी संस्थाना यापुढे पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांतर्गत कोणतेही अनुदान अनुज्ञेय होणार नाही.

६) नागरी संस्थाना अनुदान प्राप्तीसाठी सर्वप्रथम सुधारणात्मक उपाय योजना स्विकारणेसाठी व त्या पूर्ण करण्यासंबंधी राज्य शासनाशी आपसातील सामजस्य करार तत्वावर (MOA) करार करावा लागेल.

७) नागरी संस्थाना सुधारीत वित्तीय आकृतीबंधा प्रमाणे अनुदान देतांना परिशिष्ट १ नुसार सुधारणांचे टप्पानिहाय साध्य या बाबीचा आढावा राज्य शासनास सादर करावा लागेल.

८) ज्या महानगरपालिका करारानुसार वचनबध्दता देऊन सुधारणांची प्रक्रीया सुरु करणार नाही किंवा विहीत वेळेत पूर्ण करणार नाही अशा नागरी पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनांची मंजुरी रद्द करण्यात येईल व योजनेसाठी वितरीत केलेले अनुदान वसूल करण्यात येईल. त्याच प्रमाणे भविष्यातील प्रकल्प मंजुरीचा विचार करण्यात येणार नाही.

९) खाजगी संस्थेची गुंतवणूक व नागरी संस्थेचा सहभाग किंवा त्यांची आर्थीक स्थिती बघून कमाल अनुज्ञेय अनुदानाच्या अधीन राहून अनुदान वितरीत करण्याचा निर्णय राज्य शासनाद्वारे घेण्यात येईल.

१०) पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेच्या कामाचे समन्वय तसेच सुधारणात्मक उपाय योजना करण्यासाठी नागरी संस्थाना तांत्रिक व व्यवस्थापकीय सल्लागाराची नेमणूक करता येऊ शकेल.

११) परिशिष्ट १ मधील प्रत्येक विषयांतर्गत करावयाच्या सुधारणांचे विवरण पत्रानुसार सुधारणांचे टप्पे पूर्ण करावे लागेल. प्रत्येक विषयाबाबत करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी नागरी संस्थांनी केलेले कार्य हे वाढीव अनुदानाचे मानक म्हणुन स्विकारण्यात येईल.

यानुसार आढावा घेणेसाठी राज्य शासनाने उच्चस्तरीय समिती गठीत केली असून, सदरची समिती नागरी संस्थानी केलेल्या सुधारणांचा आढावा घेईल तसेच महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचे स्वनियंत्रण व समन्वय करील.

**शासन निर्णय दिनांक २३ डिसेंबर २००८**

१) या शासन निर्णयानुसार शासनाने निश्चित केलेल्या प्रपत्र-१ व परिशिष्ट १ मधील विविध नमुन्यात भरणा करुन देणे व करारनामा करणे यादीचा समावेश राहील.

२) शासन निर्णयानुसार शासनाने ठरवून दिलेल्या नमुन्यात सर्वसाधारण सभेचा ठराव पारीत करणे आवश्यक आहे.

३) या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत शासनाबरोबर आपसातील सांमजस्य करार तत्वावर करार (MOA) करणे बंधनकारक आहे.

उक्त नमुद प्रमाणे शासन निर्णय असून त्यानुषंगाने प्रपत्र, परिशिष्ट-१ विहीत नमुन्यात भरणा करुन देणे, शासनाने ठरवून दिलेल्या विविध नमुन्यात शासनासोबत करारनामा करणे व शासनाने ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात सर्वसाधारण सभेचा ठराव पारीत करणे इत्यादीसह अनुदान प्राप्तीसाठी पुर्तता करणे आवश्यक आहे. शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करावयाच्या करारनाम्याचा व सर्वसाधारण सभेच्या ठरावाचा नमुना खाली नमुद प्रमाणे आहे.

करारनामाचा मसुदा

करारनामा

(रुपये १००/ मुद्रांकावर)

१) महापौर/आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

आणि

२) सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय मुंबई ३२

ज्याअर्थी महारष्ट्र राज्याच्या स्थापनेचे ५० वर्ष सन २०१० मध्ये पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती वर्ष सन २०१०-११ पर्यंत नागरी पाणी पुरवठा नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम, घनकचरा व्यवस्थापन संदर्भात पर्याप्त व

गुणवत्तापूर्ण सेवा किफायतशीर सेवा शुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक आर्थीक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करुन ते सुवर्ण जयंती वर्ष २०११ पर्यंत साध्य करण्यासाठी महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० राबविण्याचा निर्णय शासनाने क्र. नापापु/२००८/प्रक्र.१/पापु-२२ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक २२.१०.२००८ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

ज्याअर्थी, या अंतर्गत नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम, घनकचरा व्यवस्थापन संदर्भात पर्याप्त व गुणवत्तापूर्ण सेवा किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिशिष्ट -१ मध्ये विहीत केलेल्या विविध तांत्रिक,आर्थीक व व्यवस्थापकीय सुधारणा करणाऱ्या नागरी संस्थाच्या पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी वाढीव अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

ज्याअर्थी संदर्भांकित शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत वाढीव अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी नागरी संस्थाना सर्वप्रथम शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मधील विहित सुधारणात्मक उपाय योजना स्विकारण्यासाठी व त्या पूर्ण करण्यासंबधी राज्य शासनाशी करार करावा लागेल. त्या अनुषंगाने महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० मध्ये सहभागी होऊन विहीत केलेल्या सुधारणा करण्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने ठरविले असून त्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये एकमताने ठराव मंजुर केलेला आहे. तसेच महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट -१ मधील मुद्याची व सुधारणाची सद्यस्थिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे.

त्याअर्थी, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना औरंगाबाद महानगरपालिकेचा ठराव क्र. ४०१ दिनांक १२.०२.२००९ नुसार प्राधिकृत केल्यानुसार,आयुक्त,औरंगाबाद महानगरपालिका आणि सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्यामध्ये खालील अटी व शर्तीसह करारनामा करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट -१ मधील चारही विषयांशी संबंधीत असलेल्या सुधारणा विहीत मुदतीत पूर्ण करणे औरंगाबाद महानगरपालिकेस बंधनकारक राहील. या सुधारणा करण्याबाबत नागरी संस्थेनी केलेली सुरुवात आणि सुधारणांचे टप्पानिहाय साध्य याचा आढावा घेऊन नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेस शासनाद्वारे मंजुरी व अनुज्ञेय अनुदान देण्यात येईल.
२. औरंगाबाद महानगरपालिकेने नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेसाठी वाढीव अनुदान प्राप्त करुनही सुधारणांची प्रक्रिया सुरु केली नाही किंवा विहीत वेळी सुधारणा पूर्ण केल्या नाही तर औरंगाबाद महानगरपालिकेच्या योजनेची मंजुरी रद्द करण्यात येईल तसेच या अगोदर वितरीत केलेले अनुदान वसूल करण्यात येईल. त्याच बरोबर भविष्यात औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्प मंजुरीचा विचार करण्यात येणार नाही.
३. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत पाणी पुरवठाव मलनि:सारण योजनेसाठी सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार वाढीव अनुदान लागू होणार असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेने स्वबळावर कर्जाची उभारणी करावी लागेल. कर्जाच्या उभारणीसाठी राज्य शासनाकडून हमी देण्यात येणार नाही.
४. औरंगाबाद महानगरपालिकेने योजनेसाठी सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार कर्ज किंवा त्यांचा आर्थिक सहभागापोटी उभारलेल्या निधी विचारात घेऊन त्या प्रमाणात राज्य शासनाद्वारे अनुदानाचे वितरण करण्यात येईल.
५. शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मधील सुधारणात्मक कार्यवाहीसाठी निश्चित केलेले उद्दिष्ट व त्याची कालमर्यादा लक्षात घेऊन औरंगाबाद महानगरपालिकेने कृती आराखडा तयार करावा. या सुधाराणात्मक उपाय योजनामध्ये काही भांडवली गुंतवणीकीची

कामे सुध्दा असून,नागरी संस्थानी त्यासाठी असलेल्या केंद्र व राज्याच्या विविध योजनेचा लाभ घ्यावा तसेच अशा प्रकल्पांसाठी कोणतेही अनुदानाची योजना नसल्यास किंवा पर्याप्त अनुदान उपलब्ध होत नसल्यास नागरी संस्थेने असे प्रकल्प खाजगी संस्थाच्या सहभागाने राबविणे आवश्यक राहील.

६. औरंगाबाद महानगरपालिकेस पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार वाढीव अनुदान घ्यावयाचे असल्यास परिशिष्ट-१ दर्शविल्यानुसार विविध सुधारणांचे साध्य केलेले उदिदष्ट दर्शवून प्रगतीपथावरील अथवा वाढीव/नवीन योजनेसाठी सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार वाढीव अनुदानासाठी प्रस्ताव सादर करावा. औरंगाबाद महानगरपालिकेने केलेल्या सुधारणांचा आढावा घेऊन राज्य शासनाद्वारे वाढीव अनुदान मंजुर करुन पहिला हप्ता वितरीत करण्यात येईल.

७. सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार वाढीव अनुदानाचा दुसरा हप्ता प्राप्त करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने परिशिष्ट-१ मधील सुधारणाबाबत निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या विवरणास प्रस्ताव सादर करावा. या टप्प्यातील उद्दिष्टांची पुर्तता तपासून औरंगाबाद महानगरपालिकेस अनुज्ञेय अनुदानाचा दुसरा हप्ता व त्यापुढील हप्ता राज्य शासनाकडून वितरीत करण्यात येईल या टप्प्यामध्ये अपेक्षीत सुधारणा औरंगाबाद महानगरपालिकेने केल्या नसल्यास अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करण्यात येणार नाही.

८. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत मंजुर होणाऱ्या पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेसाठी राज्य शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान तसेच औरंगाबाद महानगरपालिकेने उभारलेले कर्ज किंवा त्यांचा सहभाग निधी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडून ठेवणे अनिवार्य राहील.

९. महराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत मंजुर होणाऱ्या पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेवरील खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र तसेच लेखापरिक्षण सादर करणे औरंगाबाद महानगरपालिकेस अनिवार्य राहील.

१०. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत प्रकल्प मंजुर करुन वाढीव अनुदान मान्य करण्यासाठी स्थापन राज्यस्तरीय सनियंत्रण व समन्वयक समिती तसेच शासनाद्वारे स्थापन करण्यात येणाऱ्या समितीचे निर्णय औरंगाबाद महानगरपालिकेस अनिवार्य राहतील.

११. औरंगाबाद महानगरपालिकेने शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ नुसार पाणी पुरवठा, मलनि:सारण,शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापन याबाबतची सद्यस्थिती तसेच यामध्ये विहीत सुधारणाबाबत केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासीक अहवाल न चुकता अवर सचिव (पापु-२२) नागरी क्षेत्र सुधारणा कक्ष,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ३ रा मजला, नविन प्रशासन भवन मंत्रालय मुंबई -३२ यांचेकडे तसेच संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे मासीक अहवाल पाठविणे अनविार्य राहील.

१२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० या शासन निर्णय दिनांक २२.१०.२००८ च्या परिशिष्ट-१ मधील नागरी पाणी पुरवठा मलनि:सारण,स्वच्छता व घनकचरा व्यवस्थानपासंदर्भात विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा तसेच शासन निर्णयातील तरतूदी या कराराचा अविभाज्य भाग असून त्या उभय पक्षांना अनिवार्य राहतील.

१३. वर नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती अभय पक्षांना मान्य असल्याने या करारावर औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त तर राज्य शासनाच्या वतीने सह सचिव,पणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांच्याद्वारे आज दिनांक रोजी स्वाक्षऱ्या करण्यात येत आहेत.

सहपत्र : शासन निर्णय क्र.नापापु-२०८/प्र.क्र.१/पापु-२२, मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २२.१०.२००८ च्या परिशिष्ट-१ मधील सुधारणांचे सद्यस्थितीचे विवरण.

**ठराव :**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे ५० वर्ष सन २०१० मध्ये पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती वर्ष सन २०१०-११ पर्यंत नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम, घनकचरा व्यवस्थापन संदर्भात पर्याप्त व गुणवत्तापूर्ण सेवा किफायतशीर सेवा शुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक आर्थीक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करुन ते सुवर्ण जयंती वर्ष २०१०-२०११ पर्यंत साध्य करण्यासाठी महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० राबविण्याचा निर्णय शासनाने क्र.नापापु-२०८/प्र.क्र.१/पापु-२२, मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २२.१०.२००८ च्या शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत नागरी पाणी पुरवठा मलनि:सारण, शौचालय बांधकाम, घनकचरा व्यवस्थापन संदर्भात पर्याप्त व गुणवत्तापूर्ण सेवा किफायतशीर सेवा शुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मध्ये विहित केलेल्या विविध तांत्रिक आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करणाऱ्या नागरी संस्थाच्या पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी वाढिव अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

दिनांक २२ ऑक्टोबर २००८ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० अंतर्गत वाढिव अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी नागरी संस्थांना सर्वप्रथम शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मधील विहीत सुधारणात्मक उपाययोजना स्विकारण्यासाठी व त्या पूर्ण करण्यासंबधी सर्वसाधारण सभेचा ठराव करुन राज्य शासनाशी करार करावयाचा आहे.

औरंगाबाद महानगरपालिका, महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० मध्ये सहभागी होऊन विहीत केलेल्या सुधारणा अंमलात आणण्यास तसेच राज्य शासनाबरोबर करार करण्यास तयार असून त्यासाठी ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० मधील सुचविलेल्या खालील महत्वाच्या सुधारणा महानगरपालिका क्षेत्रात करण्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

१. पाणी पुरवठा योजनेचे पाणी लेखापरिक्षण,उर्जा लेखापरिक्षण व पुनर्वसन करुन हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण (NRW) किमान १५% पर्यंत कमी करणे व विजेवरील खर्च कमी करणे.
२. अनधिकृत नळजोडण्या नियमित करुन सार्वजनिक नळखाबांचे (Stand post) गट जोडण्यांमध्ये रुपांतरण करणे व त्यांची पाणीपट्टी त्या गटाकडून वसूल करणे.
३. पाण्याचे बिलींग व वसूली १००% करणे. त्यास्तव खाजगी अभिकर्ता नेमण्याची कार्यवाही करणे.
४. पाणी पुरवठा व स्वच्छता सेवांचे सार्वत्रिकरण तसेच सेवांचा दर्जा सुधारणे.
५. खाजगी संस्थांच्या सहभागाने नळ जोडण्यांना मीटर्स बसविणे व त्यांचे व्यवस्थापन करणे.
६. अस्तित्वातील ऑन साईट व ऑफ साईट प्रक्रिया व भुयारी गटार व्यवस्थेत सुधारणा करणे.
७. गरजेप्रमाणे वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करुन शहर हांगण्दारीमुक्त करणे.
८. घनकचऱ्याचे १००% संकलन करुन नियमानुसार प्रक्रिया व विल्हेवाट व्यवस्था स्थापित करणे.
९. सर्व झोपडपट्टी भागामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता व्यवस्था करणे.
१०. वरील सर्व सुधारणा करण्याकरीता नागरीक व खाजगी संस्थांना सहभागी करुन घेणे. आवश्यकता भासल्यास सदरील सेवा परिणामकारकरित्या राबविण्याकरीता त्या सेवांचे खाजगीकरण करणे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान २०१० संदर्भात राज्य शासनाबरोबर करार (MQU) करण्यास ही सर्वसाधारण सभा मा.महापौर/आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र.१०१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड फ अंतर्गत वॉर्डातील खराब पोल बॉक्स,केबल, कुपींगचे कामे करणे आवश्यक आहेत. येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी सदरील कामे करणे तातडीचे आहे. सदरील कामे न झाल्यास जीवित हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदरील कामाचे महत्व लक्षात घेता वॉर्ड फ अंतर्गत खराब पोल बॉक्स बदलणे, आर्थिंग काम करणे हा प्रस्ताव मंजूर करून सदरील कामाची खर्चाची तरतूद अर्थसंकल्प २००९-१० नविन पथदिवे व्यवस्था यामधून करण्यांत यावी. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ.रेखा कैलास काथार अनुमोदक : श्री.शशांक दामोधर विसपुते

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड फ अंतर्गत खराब पोल बॉक्स बदलणे, आर्थिंग काम करणेस मंजूरी देण्यांत येते. तसेच सदरील कामाची खर्चाची तरतूद अर्थसंकल्प २००९-१० नविन पथदिवे व्यवस्था यामधून करण्यांसही मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १०१३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड-ब अंतर्गत जलनि:सारण देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षातंर्गत तरतूद उपलब्ध नसल्यामूळे व या लेखाशिर्षातंर्गत कामे करणे आवश्यक असल्यामूळे कामाची निकड लक्षात घेवून अर्थसंकल्प सन २००९-१० मधील पान क्रमांक EE Abs-B-१ वरील अ.क्र.१ वर लेखाशिर्ष स्लम देखभाल व दुरूस्ती अंतर्गत रक्कम रूपये १५.०० लक्ष ठेवण्यात आलेल्या तरतूदीपैकी रक्कम रूपये ७.०० लक्ष इतकी रक्कम जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षात वळती करण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड-ब अंतर्गत जलनि:सारण देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षातंर्गत तरतूद उपलब्ध नसल्यामूळे व या लेखाशिर्षातंर्गत कामे करणे आवश्यक असल्यामूळे कामाची निकड लक्षात घेवून अर्थसंकल्प सन २००९-१० मधील पान क्रमांक EE Abs-B-१ वरील अ.क्र.१ वर लेखाशिर्ष स्लम देखभाल व दुरूस्ती अंतर्गत रक्कम रूपये १५.०० लक्ष ठेवण्यात आलेल्या तरतूदीपैकी रक्कम रूपये ७.०० लक्ष इतकी रक्कम जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षात वळती करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१४ :**

महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडिअम परिसरात जलतरण तलाव बांधणे व इतर कामाचे रक्कम रुपये २.५० कोटीच्या कामाची रीतसर निविदा कार्यवाही करुन मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराच्या निविदेस मंजुरी मिळाल्यानुसार दिनांक ११.५.२००७ ला कार्यादेश देण्यात आलेले होते.

सदरील प्रकल्प भागशः बी.ओ.टी.तत्वावर प्रस्तावीत असुन एजन्सीला पूर्ण करण्यात आलेल्या कामासाठी एकुण देयकापैकी ७७% रक्कमेचे देयक अदायगी करणे व उर्वरित २३% रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर टप्याटप्याने देण्याबाबत अटी व शर्तीनुसार करार आहे. एजन्सीने काम पूर्ण झाल्यानंतर पुढील तीन वर्ष प्रकल्प चालविणे,प्रकल्पापासुन मिळणारे उत्पन्न घेणे, देखभाल दुरुस्ती करणे व तीन वर्षे कालावधीनंतर महानगरपालिकेस प्रकल्प सुस्थितीत हस्तांतरित करणेचे बंधकारक करण्यात आलेले आहे.

सदरील कामाच्या कार्यादेशानुसार कामास सुरुवात करुन सदरील ठिकाणी मुख्य जलतरण तलाव, बेबी पुल, बॅलन्सींग टँक, यांचे आर.सी.सी. कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत या कामावर आतापर्यंत एकुण रक्कम रुपये ७८.२२लक्ष इतका खर्च झालेला आहे.

मा.आयुक्त महोदय यांच्या दिनांक २.८.२००८ च्या परिपत्रकान्वये महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे सदर प्रकल्पाचे काम सुमारे ८ ते १० महिने थांबविण्यात आले होते. त्याचप्रमाणे निधी अभावी कामाच्या १ ते ४ थ्या दरम्यानच्या देयकांची अदायगी होण्यास

झालेल्या विलंबामुळे कामाची गती कमी झाली. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कंत्राटदारांची देयके लगेचच पारित करण्यासारखी नसल्यामुळे ही देयके लेखा विभागाने वेळेवर पारित केली नाहीत. त्यामुळे सदरील प्रकल्पाचे काम गतीने पूर्ण होऊ शकले नाही.

सदरील प्रकल्प ठरलेल्या विहीत कालावधीत पुर्ण होत नसल्याने प्रकल्पाचा आर्थिक खर्च वाढत चालला आहे.परिणामी हा प्रकल्प विहीत मुदतीत पुर्ण होत नसल्याने महानगरपालिकेने आतापर्यंत केलेला खर्च उपयोगी ठरत नसुन शहरातील जनतेला या प्रकल्पाव्दारे द्यावयाच्या सेवा सुविधांचा जो लाभ मिळावयास पाहिजे तो मिळत नाही.त्यामुळे सदर प्रकल्प पुर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत किंवा प्रकल्प बीओटी तत्वावर देणेबाबत कार्यवाही करणेची सुचना मा.महापौर यांनी त्यांचे पत्र जा.क्रं मनपा/महापौर ८१५/२०१० दिनांक ०१.०२.२०१०.अन्वये केलेली आहे.

करीता मा.महापौर यांच्या सुचनेचा विचार करुन महानगरपालिकेची आर्थिक परीस्थीती पहाता तसेच नागरीकांना वेळेवर सोईसुविधा पुरविण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गरवारे स्टेडीयम येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील एकुण १,११,९८०.००चौ.मी.जागेपैकी मुख्य प्रशासकीय इमारती मधील बेसमेंट फ्लोअर वरील दोन बॅडमिंटन कोर्टची जागा,डॉरमेटरी इमारत जागा क्षेत्र ५९०.८५ चौ.मी,नियोजीत जलतरण तलाव व संलग्न बाबीसाठीचे जागा क्षेत्र ६०६६.९०चौ.मी.आणि परीसरातील खुली जागा क्षेत्र ११२३६.५३चौ.मी असे एकुण १७८९४.२८ चौ.मीटर क्षेत्र बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (बी.ओ.टी) तत्वावर विकासकास ३५ वर्षासाठी खालील नमुद अटी व शर्तीनुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

**अटी व शर्ती:-**

**१.** विकासकास सदरील प्रकल्पातील मुळ प्रस्तावात असलेली विकास कामे व संलग्न सुविधा तसेच नव्याने सुचविलेली सेवा सुविधा स्वखर्चाने् प्रथम पुर्ण करणे बंधनकारक राहील.

**२.** विकासकास प्रस्तावित असलेली मुळ कामे सदर कामाचे मुळ मक्तेदार मे.एलोरा कंन्स्ट्रक्शन यांच्या कडुन पुर्ण करुन घेणे् आवश्यक असुन या कामासाठी महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारचे देणे लागणार नाही.

**३.** विकासकास करारनामा सदरील प्रकल्पावर आतापर्यंत महानगरपालिकेने दिलेल्या देयकापोटीची रक्कम रुपये ७८.२२लक्ष महानगरपालिकेस करारनामा झाल्यानंतर तीन महिन्याचे आत एकरकमी भरणा करणे बंधकारक राहिल. विहीत मुदतीत रक्कम भरणा न केल्यास मुदतीनंतरच्या कालावधीसाठी १८ % दराने व्याज आकारण्यात येईल .

**४.** विकासकास मुळ प्रस्तावानुसार सदर प्रकल्पातील उर्वरीत कामे मे.एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचे मार्फत करुन घेणे आणि पुर्णत्वानंतर पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी देखभाल दुरस्तीची संपुर्ण जवाबदारी मुळ मक्तेदार मे.एलोरा कंन्स्ट्रक्शन यांची असल्याने त्याअनुषंगाने मे.एलोरा कंन्स्ट्रक्शन,महानगरपालिका आणि विकासक यांच्यात त्रिपक्षीय(Tripartiet agreement) स्वतंत्र नोंदणीकृत करारनामा करुन सदर करारनामा महानगरपालिकेकडे सादर करणे बंधकारक राहिल.सदर करारनाम्याचा मसुदा महानगरपालिकेकडुन समंत करुन घ्यावा लागेल.

**५.** विकासकाने या ठिकाणी निर्माण केलेल्या तसेच उपलब्ध करुन दिलेल्या सर्व सोई-सुविधा चालविण्यासाठी त्रयस्थ व्यक्ती/संस्थांना चालवावयास दयावयाच्या असल्यास महानगरपालिकेची पुर्व समंती घेणे आवश्यक राहिल.

**६.** विकासकास या प्रकल्पासाठी महानगरपालिकेस देय असलेली पाणीपटटी ,मालमत्ताकर आणि इतर कर/विदयुत देयके नियमानुसार भरणा करावा लागतील.

**७.** विकासकास महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या परवानगीनुसार देय असलेले चटई निर्देशांक क्षेत्र (FSI)नियमानुसार शुल्क भरुन विकसीत करता येईल.

८. विकासकास जलतरण तलावासाठी व इतर सोईसुविधेसाठी लागणारा पाणीपुरवठा व विदयुत व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल.

९. विकासकास सदरील ठिकाणी जलतरण तलाव व मुळ प्रस्तावातील बाबी व्यतिरीक्त खालील सुविधा पुरविणे बंधनकारक राहिल त्यासाठीची आवश्यक परवानगी विकास नियंत्रण नियमावलीनुसार देय राहील.

(अ)स्टीम व सौना बाथ,जॅकुजी (पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळे स्वतंत्र).
(ब)चिल्ड शॉवर (पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळे स्वतंत्र).
(क)स्क्वॅश कोर्ट.
(ड)चिल्ड्रन प्ले एरीया(स्मॉल अम्युजमेंट पार्कसह).
(इ)फुड मॉल.
(फ)स्पा सेंटर नॅचरोपॅथी सेंटर सह.
(ग)योगा सुविधा.
(ह)स्वागत कक्ष आणि प्रशासकीय इमारत(फक्त तळमजला).
(ई).जॉगींग ट्रॅक.

याशिवाय विकासकास नक्षत्र उदयान,थ्रीडी थियेटर,मिनीप्लेक्स,अँक्युप्रेशर,पाथवे, कॉन्फरन्स हॉल इत्यादी सुविधेबाबत नगररचना विभागाच्या नियमानुसार परवानगी देय राहील.तथापी या बाबी ऐच्छीक राहतील.

**१०.** विकासकास या ठिकाणी देण्यात येणा-या जागेचे भाडे खालीलनुसार आकारण्यात येईल.

**(अ)**गरवारे जलतरण तलाव येथे बांधलेल्या व प्रस्तावित बांधीव क्षेत्रा करीता तसेच वापरात असणा-या ( usable area ) क्षेत्रा करिता किमान रक्कम रुपये २०.०० प्रति.चौ.मी.प्रति महिना दर तीन वर्षाने मुळ रक्कमेत १० % ने वाढ करण्यांत येईल .

**(ब)** गरवारे जलतरण तलाव येथील खुल्या जागेच्या क्षेत्राकरीता किमान रक्कम रुपये०३.०० प्रति चौ.मीटर प्रति महिना.

**११.** विकासकास या ठिकाणी पुरविलेल्या तसेच बांधलेल्या सर्व सुविधांसाठी शुल्क आकारणी करण्याबाबतचे अधिकार महानगरपालिकेच्या समंतीने देण्यात येतील.

**१२.** विकासकास सर्व सुविधांची ,इमारतींची व परीसराची दैनंदिन देखभाल दुरुस्ती स्वखर्चाने करावी लागेल.

**१३.** विकासकास देण्यात आलेल्या संपुर्ण परीसरामध्ये वृक्षारोपण करुन त्याचे संगोपन करावे लागेल.

**१४.** विकासकास संपुर्ण सोई-सुविधा विहीत मुदतीनंतर विनाअट महानगरपालिकेकडे सुस्थितीत हस्तांतरीत कराव्या लागतील.

**१५.** विकासकाने नमुद अटी व शर्तीचे उल्लघंन केल्याचे निदर्शनास आल्यास करारनामा रदद करण्याचे सर्वस्वी अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना राहतील.

१६. विकासकास हस्तांतरित करण्यांत येणा-या परिसरात निर्धारीत करुन देण्यात येणाऱ्या सुविधा व्यतिरिक्त कोणत्याही नियमास बाधक ठरणारा उपक्रम राबविता येणार नाही.

१७. विकासकास हस्तांतरित करण्यांत येणाऱ्या परिसरात होणा-या कोणत्याही दुर्घटणेची जबाबदारी महापालिकेची राहणार नाही.

१८. विकास काम पुर्ण झाल्यानंतर सहा महिन्याने मुळ कंत्राटदारास सुरक्षा अनामत परत करण्यांत येईल त्याच वेळेस विकासकास रु.१०.०० लक्ष रक्कम महापालिकेकडे धनाकर्ष स्वरुपात सुरक्षा अनामत म्हणून (बिन व्याजी ) जमा करावी लागेल .

करीता,गरवारे स्टेडीयम येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील एकुण १११९८०.०० चौ.मी. जागेपैकी मुख्य प्रशासकीय इमारती मधील बेसमेंट फ्लोअर वरील दोन बॅडमिंटन कोर्टची जागा, डॉरमेटरी इमारत जागा क्षेत्र ५९०.८५ चौ.मी,नियोजीत जलतरण तलाव व संलग्न बाबीसाठीचे जागा

क्षेत्र ६०६६.९०चौ.मी.आणि परीसरातील खुली जागा क्षेत्र ११२३६.५३चौ.मी असे एकुण १७८९४.२८ चौ.मीटर क्षेत्र बांधा-वापरा-हस्तांतरीत करा(बी.ओ.टी)तत्वावर विकासकास ३५ वर्षासाठी देण्याबाबतचा तसेच त्यासाठी निविदा कार्यवाही /प्रक्रिया सुरु करणेस मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गरवारे स्टेडीयम येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील एकुण १,११,९८०.००चौ.मी.जागेपैकी मुख्य प्रशासकीय इमारती मधील बेसमेंट फ्लोअर वरील दोन बॅडमिंटन कोर्टची जागा,डॉरमेटरी इमारत जागा क्षेत्र ५९०.८५ चौ.मी,नियोजीत जलतरण तलाव व संलग्न बाबीसाठीचे जागा क्षेत्र ६०६६.९०चौ.मी.आणि परीसरातील खुली जागा क्षेत्र ११२३६.५३चौ.मी असे एकुण १७८९४.२८ चौ.मीटर क्षेत्र बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (बी.ओ.टी) तत्वावर विकासकास ३५ वर्षासाठी प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते १८ प्रमाणे नमुद अटी व शर्तीनुसार देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १०१५ :**

कार्यकारी अभियंता वार्ड ब आणि क यांनी मो.औरंगाबाद टाईम्स कॉलनी त्रिवेणीनगर येथे आर.सी.सी. पुल बांधणे बाबत कामासाठी सा.बां.विभागाचे सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये १७०२२००/- चे अंदाजपत्रक तयार करून त्यास मा.स्थायी समितीमध्ये दि.०६.११.२००७ रोजी विषय क्रमांक २०३ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली होती. या कामासाठी रितसर निविदा मागविण्यात आली असता मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९२% कमी दराच्या निविदेस मा.स्थायी समितीत दि.३०.४.२००८ ठराव क्रमांक १४ अन्वये मान्यता मिळालेली होती. परंतू सदरील कामाचे कार्यादेश गुत्तेदारास देण्यात आलेला नसल्याने व गुत्तेदाराने कामासाठी सुधारीत दराची मागणी करत काम करण्यास नकार दिलेला होता.

दिनांक १५.०६.२००९ रोजी मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेमध्ये मा.सभापती स्थायी समिती यांनी सदरील गुत्तेदारावर कार्यवाही करून कामाची सुधारीत दराने फेर निविदा मागविण्यासाठी सूचित केले होते. तदनंतर दि.२०.०७.२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीत विषय क्रमांक ४२ अन्वये सुधारीत अंदाजपत्रक रू.१९९०७७७/- सह फेरनिविदासाठी मान्यता प्राप्त झाली होती.

तदनंतर सदरील कामासाठी फेर निविदा मागविण्यात आली असता श्री.अब्दुल कदीर यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०१% कमी दराच्या निविदेस मा.स्थायी समिती दि.१४.०८.२००९ रोजी विषय क्र.७१ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानंतर दि.१५.०२.२०१० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीत मा.सभापती स्थायी समिती यांनी या कामासाठी लागणाऱ्या एकत्रित सुधारित अंदाजपत्रकामधील अतिरिक्त कामासाठी लागणारी वाढीव रक्कम ९.०० लक्ष लेखा विभागाने उपलब्ध करून देणेसाठी सूचित केले आहे.

करीता सदरील कामासाठीची वाढीव रक्कम रू.९.०० लक्ष म्हणजे एकूण सुधारीत अंदाजपत्रक रू.२९४११५९/- चा प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.औरंगाबाद टाईम्स कॉलनी त्रिवेणीनगर येथे आर.सी.सी. पुल बांधणेच्या कामाचे सुधारीत र.रू.२९४११५९/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जिल्हा नियोजन अंतर्गत एन-६ सिडको परिसरातील हिंदु, बौध्द,ख्रिश्चन व मुस्लीम स्मशानभुमींचा एकत्रित विकास करणेचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम खात्याच्या सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रुपये ७०,००,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामासाठी जिल्हा नियोजन समिती कडून रक्कम रुपये ७०,००,०००/- चे अनुदान प्राप्त होणार असून सदरील अंदाजपत्रका अंतर्गत एन-६ सिडको परिसरातील हिंदु,बौध्द,ख्रिश्चन व मुस्लीम स्मशानभुमीं मध्ये बर्निंगशेड,श्रध्दांजली ओटा व शेड बांधणे, संरक्षित भिंतीची उंची वाढविने, कॉक्रीट करणे व रंगकाम करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

करीता सिडको एन-६ परिसरातील हिंदु,बौध्द,ख्रिश्चन व मुस्लीम स्मशानभुमींचा विकास करणेच्या रक्कम रुपये ७०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.जिल्हा नियोजन समिती कडून अनुदान प्राप्त होईल या अटीवर मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ तथापि मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा नियोजन अंतर्गत सिडको एन-६ परिसरातील हिंदु,बौध्द,ख्रिश्चन व मुस्लीम स्मशानभुमींचा विकास करणेच्या रक्कम रुपये ७०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.जिल्हा नियोजन समिती कडून अनुदान प्राप्त होईल या अटीवर मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१७ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.६२ समतानगर कोटला कॉलनी येथील अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याचे सन २००८-०९ च्या दरसूची नुसार तयार करण्यांत आले असून अंदाजपत्रकीय र.रू.१४,२४,०००/- चे तयार करण्यात आले होते. सदरील कामास मा.स्थायी समिती सभा दिनांक २४.११.२००९ विषय क्र.२१५ अन्वये मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर तातडीने करून घेण्याच्या प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यानुसार सदर काम उपलब्ध गुत्तेदार श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येत आहे. सदर कामाची मूळ अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,२४,००० असून सदरील काम करतांना होणाऱ्या वाढीव कामामूळे सदरील कामासाठी र.रू.१५,६७,२०० लक्षची वाढ होत आहे. सदरील वाढीव रक्कम रू.१५,६७,२०० होत आहे. उक्त रक्कमेपैकी रूपये ५ लक्ष मा.सर्वसाधारण सभा दिनांक २१.१२.२००९ विषय क्र.८८७ नुसार वळती करण्यांत आलेली असून उर्वरित रक्कम रू.१०,६७,२०० ची वाढीव तरतूद सुधारीत अर्थसंकल्पात करण्यात येईल. मूळ कामाचे अंदाजपत्रक र.रू.२९,९१,२०० एवढ्या रक्कमेचे होत आहे. वाढीव रक्कमेसह सदरील काम मूळ गुत्तेदार श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दरानेच करून घेण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झालेली आहे.

तरी सदर कामासाठीच्या वाढीव रक्कम रू.२९,९१,२०० चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६२ समतानगर कोटला कॉलनी येथील अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे या वाढीव कामाचे रक्कम रू.२९,९१,२०० चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१८ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील स.न.१२,आरक्षण क्रमांक २६२ ही जागा बी.ओ.टी तत्वावर विकसीत करणेसाठी मे.पृथ्वी इंटरप्रायजेस ॲन्ड जे.व्ही. यांना देण्यात आलेली आहे. सदर बी.ओ.टी. तत्वावरील काम प्रगतीपथावर असून तेथील इमारतीचे छत (Terraces) महानगरपालिकेच्या अधिकारात राहतील अशी अट करारनाम्यामध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

सदरील इमारतीचे छत विकासक यांना भाडे पट्टयावर दिल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल या दृष्टीने सदर छत विकासक यांना भाडे पट्टयावर रुपये ५/- प्रती चौ.मी.

प्रतिमहा या दराने ज्यामध्ये दर तीन वर्षाने मुळ दरावर १२% वाढ होईल या अटीवर विकासक यांना देणेसाठी आणि छताचा अनुज्ञेय वापर (Utility) करणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथील स.न.१२,आरक्षण क्रमांक २६२ ही जागा बी.ओ.टी तत्वावर विकसीत करणेसाठी मे.पृथ्वी इंटरप्रायजेस ॲन्ड जे.व्ही. यांना देण्यात आलेली असल्यामूळे,सदर बी.ओ.टी. तत्वावरील काम प्रगतीपथावर असून तेथील इमारतीचे छत (Terraces) महानगरपालिकेच्या अधिकारात राहतील अशी अट करारनाम्यामध्ये नमुद करण्यात आलेली असून सदरील इमारतीचे छत विकासक यांना भाडे पट्टयावर दिल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल या दृष्टीने सदर छत विकासक यांना भाडे पट्टयावर रुपये ५/- प्रती चौ.मी. प्रतिमहा या दराने ज्यामध्ये दर तीन वर्षाने मुळ दरावर १२% वाढ होईल या अटीवर विकासक यांना देणेस आणि छताचा अनुज्ञेय वापर (Utility) करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,मे.एम्पायर मॉल प्रा.लि.,पी-८०,एम.आय.डी.सी.चिकलठाणा, औरंगाबाद यांनी MOU तत्वावर ए.पी.आय.कॉर्नर जालनारोड पासून ते महावितरण कार्यालय भांडार पर्यंत ३० मी.रूंद विकास योजना रस्ता व त्यांचे मिळकती मधून या रस्त्याला येवून मिळणारे दोन अंतर्गत १८ मी. रूंदीचे रस्ते विकसीत करण्यासाठी सुधारीत परवानगी मागीतली आहे.

सदर रस्ता राष्ट्रीय मानकानुसार विकसीत करावयाचा असून, यामध्ये ३० मी.रूंद रस्ता विकसीत करणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूला पादचारीसाठी फुटपाथ बांधणे, मध्यभागी डिव्हायडर बांधणे, पथदिवे उभारणे, आवश्यक तीन ठिकाणी वाहतूक नियंत्रक उभारणे इत्यादी कामाचा समावेश आहे. यामध्ये महावितरण कंपनीचे विद्युत खांब व केबल रस्त्याच्या कडेला स्थलांतरीत करणे, एम.आय.डी.सी. ची जलवाहीनी स्थलांतरीत करणे तसेच दूरध्वनी खांब व केबल स्थलांतरीत करणेच्या कामाचा ही समावेश आहे. दरसूची २००८-०९ नुसार तसेच भारत संचार निगम लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी यांनी दिलेल्या खर्चाच्या अनुमानानुसार या प्रकल्पाची किमंत रूपये १६.०५ कोटी इतकी झाली आहे.

सदरील रस्ता आपसातील सामंजस्य करार (MOU) तत्वावर करण्यात येणार असून, या प्रकल्पाचा सर्व खर्च प्रथम विकासक करणार आहे. सदरचा प्रकल्प बी.ओ.टी. धर्तीवरील असून, यामध्ये या कामावर विकासकास येणारा खर्च महानगरपालिका औरंगाबाद कडून मालमत्ता कराचे स्वरूपात समान वार्षिक हप्त्यात समायोजीत करण्यात येणार आहे. सदरील रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाला असून, रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामूळे हा संपूर्ण रस्ता चांगला तसेच पूर्ण रूंदीला (३० मी) विकसीत करणे आवश्यक आहे.

यापूर्वी विकासकाने सादर केलेल्या प्रस्तावास पालिका सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक ४२७/०७ दिनांक २५.०९.२००६ व स्थायी समितीने विषय क्रमांक ९१ दिनांक ०७.०८.२००७ नुसार या मिळकती पासून मिळणाऱ्या निव्वळ मालमत्ता कराच्या रक्कमेतून या रक्कमेच्या ७५% मर्यादेपर्यंत रस्त्याच्या विकासासाठी खर्च झालेला निधी पूढील पाच वर्षात मिळणाऱ्या मालमत्ता करातून समायोजीत करण्यात येईल अशाप्रकारे धोरणात्मक बाब म्हणून मंजूरी प्रदान केली होती. तथापी प्रकल्पाचा खर्च रूपये १६.०५ कोटी हा पाच वर्षात समायोजीत होणे शक्य नाही. त्यासाठी जास्तीचा कालावधी या समायोजनासाठी लागणार आहे.

आता विकासकाने पूर्वीच्या प्रस्तावात काही बदल सूचवून सुधारीत प्रस्ताव सादर केला होता, या सादर सुधारीत प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. तसेच या सुधारीत प्रस्तावास स्थायी समितीने विषय क्रमांक ३७७ दिनांक ११.०२.२०१० (कार्यक्रम पत्रिका क्रमांक २४) अन्वये पूढील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी प्रदान केली आहे.

०१. सदर विकासकाचा पूर्वीचा मूळ प्रस्ताव हा अंजठा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या नावे होता. आता विकासकाने विनंती केल्यानुसार त्यांचे कंपनीचे नामांतर एम्पायर मॉल प्रा.लि. झाल्याने नाव बदलास मान्यता देण्यात येते. यापूढे एम्पायर मॉल प्रा.लि. या नावाने करारनामा व पूढील कार्यालयीन औपचारिकता, पत्रव्यवहार इत्यादी करण्यात येईल.

०२. रस्त्याच्या नावाचा उल्लेख यापूढे ए.पी.आय. कॉर्नर जालना रोड टी पॉईट ते महावितरण १३२ के.व्ही.सबस्टेशन १.१० कि.मी. असा करण्यात येईल. पूर्वी हा प्रस्ताव जालना रोड टी पॉईट ते एम.आय.डी.सी. जलकुंभ ते व्होकहार्ट रिसर्च सेंटर या नावाने होता.

०३. सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्षात जेवढा खर्च येईल, त्या प्रकल्प खर्चाच्या रक्कमेवर १०% दर साल दर शेकडा व्याज प्रकल्पाच्या कराराचा कालावधी संपेपर्यंत देण्यांत येईल.

०४. रस्त्याचा हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तीन वर्षे विनामोबदला देखभाल दुरूस्ती विकासकास विनामोबदला करावी लागेल. तद्नंतरचा देखभाल व दुरूस्तीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ट करणे बाबत मान्यता देण्यात येते. हा खर्च कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांचेकडून प्रमाणित करून घेणे विकासकावर राहील. कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रमाणित केलेला देखभाल दुरूस्तीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यात येईल.

०५. मुख्य विकास योजना रस्त्याला (३० m Wide) जोडणारे अंतर्गत १८ मी.रूंदीचे दोन रस्ते जोडण्याची परवानगी, सदर रस्त्या खालील जागा महानगरपालिकेला नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे (Relinquish deed) मालकीहक्कात हस्तांतरण करून द्यावी लागेल या अटीवर मान्य करण्यात येते. तसेच भविष्यात या मॉलच्या पूर्वेस सार्वजनिक रस्त्याला जोडण्याची आवश्यकता भासल्यास त्यास हे रस्ते जोडता येतील. तसेच या रस्त्याच्या शेवटी आपणाला बांधकाम करता येणार नाही.

०६. काम करीत असतांना किंवा पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत प्रकल्पातील गृहीत बाबी व्यतिरिक्त काही बाबी अचानक समोर आल्यास व ती कामे करणे आवश्यक ठरल्यास त्यावरील खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यात येईल. तसेच ज्या बाबीवर काम होणार नाही, त्याचा खर्च प्रकल्प खर्चातून वजा करण्यांत येईल. याबाबत कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क) यांनी अतिरिक्त बाबींवरील खर्च प्रमाणित करणे आवश्यक राहील.

०७. प्रकल्पावर होणारा संपूर्ण खर्च, वार्षिक पध्दतीने समान हप्त्यात, विकासकाचा लागलेला खर्च वसूल होईपर्यंत समायोजीत करण्यात येईल या धर्तीवर मान्यता देण्यांत येते. दरम्यान वसूली कालावधीत करप्रणालीमध्ये बदल/करात वाढ झाल्यास त्याप्रमाणे समान वार्षिक हप्ता निश्चित केला जाईल/त्यात बदल करण्यात येईल.

०८. या भागाला सध्या महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा केला जात नाही. सद्यस्थितीत जलवाहीनी ही MIDC ची असल्याने त्यांचेकडून पाणी पुरवठा होतो. त्यामूळे पाणी पट्टीचा खर्च समायोजनात समाविष्ठ करण्याची विनंती तूर्त मान्य करता येत नाही. तथापी भविष्यात महापालिकेकडून पाणी पुरवठा झाल्यास प्रकल्पाचा खर्च लवकरात-लवकर समायोजीत होण्यासाठी पाणीपट्टी Project Cost Recovery Cost मध्ये समाविष्ठ करण्यांत येईल.

०९. भविष्यात चिकलठाणा औद्योगिक वसाहतीचा भाग औद्योगिक नगर वसाहत (Industrial Twonship) म्हणून घोषीत झाला तरी करण्यात येणाऱ्या आपसातील सामंजस्य कराराप्रमाणे (MOU Agreement) महानगरपालिका औरंगाबाद कार्यवाही कायम ठेवील.

१०. मुख्य ३० मी. विकास योजना रस्ता व अंतर्गत दोन १८ मी.रूंद रोडवरील सर्व प्रकारच्या जाहीरातींच्या माध्यमापासून मिळणारा महसूल जोपर्यंत या रस्त्याची दुरूस्ती विकासकाकडे राहील त्या मर्यादीत कालावधीपर्यंत Incentive म्हणून वसूल करण्याचे अधिकार विकासकाकडे राहील. तथापी सदर रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही आणि हे रस्ते नेही अतिक्रमणमुक्त राहतील याची व सदर रस्ते सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी विकासकाची राहील. तथापी याबाबत गरजेनुसार महानगरपालिका विकासकास सहकार्य/मदत करील.

११. या रस्त्यावरील पथदिव्यांचे संनियंत्रण विकासक करील व रस्त्यावरील पथदिव्यांचे वीज बिल महानगरपालिका अदा करील, तथापी प्रकाशयुक्त (Illuminated) जाहीरातींसाठी लागणारा विजेचा खर्च विकासकास करावा लागेल. त्यासाठी विकासकास स्वंतत्र विज मिटर घेणे बंधनकारक राहील. तसेच रस्त्यावरील पथदिव्यांची पूढील तीन वर्ष देखभाल दुरूस्ती विनामोबदला विकासकास करावी लागेल. तीन वर्षानंतरची देखभाल दुरूस्ती विकासकाने करावी, या तीन वर्षानंतरचा देखभाल दुरूस्तीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यात येईल, तथापी हा खर्च कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांचेकडून वेळोवेळी प्रमाणीत करून घेण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

१२. या रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या वाहतूक नियंत्रकाचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यात येईल. तथापी या वाहतूक नियंत्रकांची, त्यांची उभारणी केल्यापासून पूढील तीन वर्ष देखभाल दुरूस्ती विनामोबदला विकासकास करावी लागेल. तीन वर्षानंतरचा देखभाल दुरूस्तीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ठ करण्यांत येईल, तथापी या देखभाल दुरूस्तीचा खर्च कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांचेकडून वेळोवेळी प्रमाणित करून घेण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

१३. प्रकल्पाची किमंत चालू दरसूची नुसार तूर्त रूपये १६.०५ कोटी अशी अंदाजीत स्वरूपाने स्विकारण्यात येते.

१४. सदर रस्त्यावरील सद्यस्थितीत असलेली सर्व प्रकारची कच्ची/पक्की अतिक्रमणे या कार्यालयातर्फे हटवून देण्यात येतील.

१५. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर व देखभाल दुरूस्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर संपूर्ण प्रकल्प/प्रकल्पाची सर्व उपांगे,जागा इत्यादी आणि अतिक्रमण विरहीत रस्ता महानगरपालिकेकडे सुस्थितीत हस्तांतरीत करावा लागेल.

१६. प्रकल्पात समाविष्ठ सर्व प्रकारची कामे IRC/ISI/MORTH/NBC मानकाप्रमाणे करावी लागेल. महानगरपालिका औरंगाबाद निर्देशीत करील,त्यानुसार सर्व आवश्यक चाचण्या स्वखर्चाने वेळोवेळी करणे/चाचण्या देणे बंधनकारक राहील.

१७. या प्रकल्पाची सर्व कामे महानगरपालिका औरंगाबादच्या मार्गदर्शनाखाली व निगराणी खाली पूर्ण करावी लागतील.

१८. प्रकल्पाचा संपूर्ण प्रगती अहवाल प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तसेच देख्भाल दुरूस्तीचा कालावधी पूर्ण होईपर्यंत नियमीत लेखी स्वरूपात देणे आवश्यक राहील. तसेच केलेल्या कामाची नोंद ठेवणे, कामाची परिमाणे नोंदविणे इत्यादीसाठी कामावर आवश्यक स्वतंत्र प्रकल्प संकल्पनार्थी (Project Management Consultant) तसेच या कामासाठी योग्य अशा कंत्राटदाराची नेमणूक विकासकानी करावी, जेणेकरून प्रकल्पाचा विकास सुयोग्य पध्दतीने होईल.

१९. रस्त्याची / प्रकल्पाची सर्व उपांगे इत्यादींची देखभाल दुरूस्ती (Rapairs Manual MORTH) नुसार करावी लागेल.

उक्त नमुदप्रमाणे प्रकल्पाची अंमलबजावणी करणे योग्य वाटते. चिकलठाणा औद्योगिक वसाहत ही औरंगाबाद शहराचा एक अविभाज्य भाग आहे. सदरचा भाग झपाट्याने विकसीत होत

असून, या परिसरात अनेक मोठे मॉल्स, हॉटेल्स तसेच नागरी वसाहती आकारस येत आहेत. महानगरपालिकेला डी.पी.रस्त्याचा विकास करण्यासाठी वेळ लागतो, मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागते. तसेच महापालिकेला विज,पाणी,ड्रेनेज इत्यादी अत्यावश्यक सेवेला प्रथम प्राधान्य द्यावे लागते. त्यामूळे महापालिकेकडून विकास रस्त्यांची कामे करण्याला मर्यादा येतात. त्यामूळे जलद विकास होणेस हातभार लागणेसाठी विकासकाने दिलेला प्रस्ताव योग्य वाटतो.

सदरचा रस्ता विकासकास राष्ट्रीय मानकानुसार विकसीत करावयाचा असून, यासाठी सुरूवातीला विकासक मोठी रक्कम या रस्त्यासाठी खर्ची घालणार आहे. नियोजनपूर्वक रस्ता विकसीत करण्यात येणार असल्याने या भागातील भविष्यांतील सर्व सोयी सुविधांचा यात विचार करण्यात आलेला आहे.

औरंगाबाद शहारातील एम्पायर मॉल हा एक महत्वाकांक्षी खाजगी प्रकल्प उदयास येत असून, त्यामूळे या शहराच्या व्यापार उदीमास हातभार लागणार आहे. शहरातील हा भाग पर्यटनदृष्ट्या विकसीत होत असून, त्यामूळे शहराच्या प्रगतीत भर पडणार आहे. त्यामूळे महानगरपालिकेने सकारात्मक भूमीकेतून या प्रकल्पास प्रोत्साहन दिले पाहीजे असे वाटते.

विकासकाने सादर केलेला प्रस्ताव मोठ्या रक्कमेचा असल्याने व अशा स्वरूपाचा प्रस्ताव महानगरपालिकेला प्रथमतःच प्राप्त झालेला असल्यामूळे या प्रकल्पातील विकासकाची क्षमता तपासणे आवश्यक वाटते. त्यामूळे सदरील १.१ कि.मी.चा रस्ता एकूण दोन टप्प्यात विकसीत करणे योग्य वाटते. प्रकल्पाचा पहिला टप्प पूर्ण झाल्यानंतर विकासकाची क्षमता व प्रकल्पाचे यश तपासून पूढील टप्पा हाती घेणे बाबत निर्णय घेण्यांत येईल.

करीता विकासकाने सादर केलेला या प्रस्तावास तसेच उक्त अटी/शर्तींना आणि प्रकल्पावर खर्ची पडणारा त्यांचा खर्च त्यांना दरवर्षी जेवढा मालमत्ता कर येईल त्या १००% मालमत्ता कराच्या समान वार्षिक हप्त्याच्या स्वरूपात समायोजीत करण्यास व भविष्यात या भागाला महानगरपालिकेने पाणी पुरवठा केल्यास पाणीपट्टी देखील वार्षीक समान हप्त्यात समायोजीत करण्यास, प्रकल्पावरील विकासकाने केलेला संपूर्ण खर्च वसूल होईपर्यंतच्या कालावधीसाठी मान्यता देणे बाबतच्या सह प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ए.पी.आय.कॉर्नर,जालना रोड पासून ते महावितरण कार्यालय भांडार पर्यंतच्या ३० मी. रूंद विकास योजना रस्ता व या रस्त्याला येवून मिळणारे अंतर्गत १८ मी. रूंद रस्ते विकसीत करणे, फुटपाथ बांधणे,पथदिवे उभारणे,वाहतूक नियंत्रक उभारणे इत्यादीसह या प्रकल्पास आपसातील सामंजस्य करार (MOU) तत्वावर मे.एम्पायर मॉल प्रा.लि.,पी-८०, एम.आय.डी.सी. चिकलठाणा,औरंगाबाद असे विकासकाच्या नांव बदलासह, मालमत्ता कराचे स्वरूपात प्रकल्पाचा खर्च समायोजीत करण्यास, प्रस्तावातील नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तथापी प्रशासनाने सदर रस्त्यावर येणारा खर्च विकासकास मालमत्ता कराच्या स्वरूपात समायोजीत करून परत करणे ऐवजी तसेच प्रकल्पावर होणारा विकासकाचा खर्च दिर्घ कालावधीत मालमत्ता कराद्वारे समायोजीत करण्यात येणार असल्याने त्याऐवजी महानगरपालिकेने विकासकास Differed Payment च्या धर्तीवर प्रकल्पावर होणारा खर्च पूढील पाच वर्षात परत करणे बाबतही विचार करण्यास हरकत नाही. विकासकाने दिलेला प्रस्ताव हा महानगरपालिकेसाठी एक प्रकारे प्रायोगिक (Demo) स्वरूपाचा असल्याने हा प्रकल्प दोन टप्प्यात पूर्ण करावा. असे करीत असतांना प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर तो योग्य पध्दतीने पूर्ण होतो किंवा कसे याचा अनुभव लक्षात घेवून तसेच त्यावर होणारा खर्च आणि समायोजीत करावयाची मालमत्ता कराची रक्कम आणि प्रकल्प खर्चाच्या रक्कमेवरील १०% व्याजाची रक्कम इत्यादी बाबींची सांगड घालून प्रकल्प व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी होईल असे पहावे आणि तद्नंतरच पूढील टप्पा हाती घ्यावा. प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०२० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.३८ मधील दर्गा सुफिसंत हजरत ख्वाजा मोइनउल्ला शाह यांची दर्गा असून शहरातील सर्व धर्माचे लोक त्यांना श्रध्देने मानतात.

मोतीकारंजा येथील रस्त्यास हजरत ख्वाजा मोइनउल्ला शाह मार्ग असे नांव व मोतीकारंजा येथील चौकास हजरत ख्वाजा मोइनउल्ला शाह चौक असे नांव देण्यांस प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मोमीन सफिया फिरदौस अय्युब खान

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.किशोर तुलशीबागवाले,श्री.अशोक विरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८ मधील मोतीकारंजा येथील रस्त्यास नियमानुसार हजरत ख्वाजा मोइनउल्ला शाह मार्ग व मोतीकारंजा येथील चौकास हजरत ख्वाजा मोइनउल्ला शाह चौक असे नांव देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने वर्धापन दिना निमित्त नागरीक हा अंक प्रकाशित करण्यात आला. सदरील अंक हा दरमहा प्रकाशित करण्यासाठी वृत्त संकलन,प्रकाशन,छपाई इ.साठी एका समन्वयाची नियूक्ती करणे आवश्यक आहे.

तरी दरमहा रक्कम रू.१०,०००/- (दहा हजार रूपये मानधनावर) नागरीक या मासिकाची छपाई, संकलन व प्रकाशन यासाठी समन्वयकाची नियूक्ती करणेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जोशी                    अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त प्रकाशित करण्यांत आलेल्या नागरीक या अंकाच्या वृत्त संकलन,प्रकाशन,छपाई इ.साठी नियमानुसार दरमहा रक्कम रू.१०,०००/- (दहा हजार रूपये) मानधनावर समन्वयकाची नियूक्ती करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २९.१२.२००९ रोजी (दिनांक १९.१२.२००९ का.प.क्र.३५ ची तहकूब सभा) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात अ.क्र.५ पान क्र. GBR-D-७ वर प्रभाग क्र. ६० सिल्लेखाना विविध ठिकाणी बोअर खोदणे बाबत रुपये १.०० लक्ष निधि वळती करण्यात आलेली होती. परंतु सदरील कामाऐवजी प्र.क्र.६० अंतर्गत विविध फुटकळ कामे करण्यासाठी रुपये १.०० लक्ष निधी वळती करण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्रीमती जहूराबी नासेरखान                    अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २९.१२.२००९ रोजी (दिनांक १९.१२.२००९ का.प.क्र.३५ ची तहकूब सभा) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात अ.क्र.५ पान क्र. GBR-D-७ वर प्रभाग क्र.६० सिल्लेखाना विविध ठिकाणी बोअर खोदणे बाबत रुपये १.०० लक्ष निधि वळती करण्यात आलेली होती. परंतु सदरील कामाऐवजी प्र.क्र.६० अंतर्गत विविध फुटकळ कामे करण्यासाठी रुपये १.०० लक्ष निधी नियमानुसार वळती करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. २८ नेहरुनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे अत्यंत आवश्यक असून सदर कामे तातडीने करण्याची विनंती स्थानिक नागरीकांनी केली आहे. या कामासाठी अंदाजे ४८.०० लक्ष तरतुद अपेक्षित आहे. तरी सदरची कामे करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी अर्थसंकल्प २००९-१० मधील पान क्र.

ई-७० "क-६/४ इतर भांडवली व विकास कामे" अ.क्र.२ विकास निधी (भुसंपादन व विकास कामे) च्या रु. १०.०० कोटीमधून र.रु. ४८.०० लक्ष वळती करण्यास मान्यता देण्यात यावी. करीता उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

सुचक :श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ नेहरुनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे अत्यंत आवश्यक असल्यामूळे, सदरची कामे करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी अर्थसंकल्प २००९-१० मधील पान क्र. ई-७० "क-६/४ इतर भांडवली व विकास कामे" अ.क्र.२ विकास निधी (भुसंपादन व विकास कामे) च्या रु.१०.०० कोटीमधून र.रु.४८.०० लक्ष वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १०२४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहर विकास सेवाभावी संस्था, औरंगाबादच्या वतीने व्हिजन औरंगाबाद-२०३० या उपक्रमाचे दिनांक २७ ते २८ फेब्रुवारी २०१० रोजी आयोजन केलेले आहे. या शहराच्या विकासासंबंधी चर्चासत्र,मान्यवरांचे सादरीकरण व जनजागणरण इत्यादी सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून नागरी योजनांची माहिती याद्वारे जनतेला दिली जाणार आहे. या उपक्रमाचा भविष्यात महानगरपालिकेला शहर विकास आराखडा व योजनांच्या संदर्भात निश्चितच फायदा होणार आहे. सदर उपक्रमासाठी बराच खर्च अपेक्षित असून महानगरपालिकेतर्फे रू.३.०० लक्ष अर्थसहाय्य शहर विकास सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांना देणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक: श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.संजय जोशी अनुमोदक :श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर विकास सेवाभावी संस्था, औरंगाबादच्या वतीने व्हिजन औरंगाबाद-२०३० या उपक्रमाचे दिनांक २७ ते २८ फेब्रुवारी २०१० रोजी आयोजन केलेले असल्यामूळे,सदर उपक्रमासाठी महानगरपालिकेतर्फे रू.३.०० लक्ष अर्थसहाय्य शहर विकास सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांना देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या मुकुंदवाडी व मिटमिटा येथील माध्यमिक शाळेतील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना गणित,विज्ञान व इंग्रजी शिकविण्यासाठी मनपातील कार्यरत शिक्षकात कोणीही उपलब्ध नाहीत व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून या भागातील वार्ड शालेय समितीने ठराव घेवून सुशिक्षित बेरोजगार व पात्र व्यक्तीच्या मदतीने अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सातत्याने सुरू ठेवली आहे.

सन २००७ ते आजपर्यंत सतत तीन वर्षापासून मुंकूदवाडी शाळेत (४) चार व मिटमिटा शाळेत (३) तीन असे एकुण (७) स्वयंसेवक विनावेतन (मोफत) ज्ञानदान करीत आहेत.त्यांच्या कष्टाचे फळ त्यांना मिळावे व शाळेला त्यांची नितांत गरज असल्याने त्यांना शिक्षण सेवक म्हणून दरमहा ४०००/-(चारहजार रूपये)मानधन तत्वावर तसेच मनपाच्या इतर माध्यमिक शाळेत आवश्यकता असेल तर तेथेही मानधन तत्वावर नियुक्ती देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.बाबासाहेब डांगे

अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल,सौ.शोभा हरिश्चंद्र मिटकर,श्री.बन्सीलाल गांगवे मामा,श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मुकुंदवाडी व मिटमिटा येथील माध्यमिक शाळेतील इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना गणित,विज्ञान व इंग्रजी शिकविण्यासाठी मनपातील कार्यरत शिक्षकात कोणीही उपलब्ध नसल्यामूळे, सन २००७ ते आजपर्यंत सतत तीन वर्षापासून मुंकूदवाडी शाळेत(४) चार व मिटमिटा शाळेत (३) तीन असे एकूण (७) स्वयंसेवक विनावेतन (मोफत)

ज्ञानदान करीत असल्यामूळे व शाळेला त्यांची नितांत गरज असल्याने त्यांना ते कामकरीत असलेल्या तारखेपासून दरमहा रू.४०००/-(चारहजार रूपये) नियमानुसार मानधन तत्वावर तसेच मनपाच्या इतर माध्यमिक शाळेतही मानधन तत्वावर नियुक्ती देण्यास व भविष्यात त्यांना महापालिकेच्या सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याचा हक्क राहणार नाही तसेच महापालिकेच्या नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाही यासह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-३,एन-४ सिडको वॉर्डातील, एन-३ येथील असलेले टेनिस कोर्ट सिडको क्लब औरंगाबाद ह्या खेळाडूची असलेल्या संघटनेला दिर्घ मुदतीच्या करारावर चालवायला देण्यास सहमत असून शिफारस करत आहे. जेणेकरून त्या मैदानात खेळात योग्य असलेली सुधारणा करणे ह्या संघटनेस शक्य होईल व एकंदरीतच खेळाचा व उदयोन्मुख खेळाडूंचा विकास होईल. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती जयश्री सारंग किवळेकर                अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-३,एन-४ सिडको वॉर्डातील, एन-३ येथील असलेले टेनिस कोर्ट सिडको क्लब औरंगाबाद ह्या खेळाडूची असलेल्या संघटनेला दिर्घ मुदतीच्या करारावर नियमानुसार चालवायला देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात पृ.क्र.जीबीआर-जी-२ अ.क्र.१० वर (नविन उद्याने) या शिर्षकात शहरातील विविध उद्यानात सुरक्षा रक्षक,वाचमन करीता खोली बांधणेसाठी रक्कम रू.५० लक्ष तरतूद करण्यात आली आहे. या शिर्षकातून र.रू.२.०० लक्ष वॉर्ड क्र.१९ मधील एन-७ मनपा केंद्रीय प्रा.शाळा व वाचनालय जवळ पाणपोई बांधणे या कामासाठी वळती करण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जैस्वाल                अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात पृ.क्र.जीबीआर-जी-२ अ.क्र.१० वर (नविन उद्याने) या शिर्षकात शहरातील विविध उद्यानात सुरक्षा रक्षक,वाचमन करीता खोली बांधणेसाठी रक्कम रू.५० लक्ष तरतूद करण्यात आली आहे. या शिर्षकातून र.रू.२.०० लक्ष वॉर्ड क्र.१९ मधील एन-७ मनपा केंद्रीय प्रा.शाळा व वाचनालय जवळ पाणपोई बांधणे या कामासाठी नियमानुसार वळती करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १०२८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.१९ शिवनेरी कॉलनी म्हाडा परिसरातील एन-७ खुल्या जागेवर कमान बांधण्यात आलेली असून या कमानीस स्व.मोतीलाल जैस्वाल असे नांव देण्यांत यावे, करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जैस्वाल                अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१९ शिवनेरी कॉलनी म्हाडा परिसरातील एन-७ खुल्या जागेवर बांधण्यात आलेल्या कमानीस स्व.मोतीलाल जैस्वाल असे नांव देण्यांस नियमानुसार कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १०२९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-७ सिडको मनपा शाळेजवळील खुल्या जागेवरील पाणपोई बांधण्यात येत असून या पानपोईस स्व.दत्तात्रय बाबुलाल वाणी असे नांव देण्यांत यावे, करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जैस्वाल                अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-७ सिडको मनपा शाळेजवळील खुल्या जागेवरील पाणपोई बांधण्यात येत असलेल्या पानपोईस स्व.दत्तात्रय बाबुलाल वाणी असे नांव देण्यांस नियमानुसार कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०३० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७३ सिडको एन-२ कासलीवाल कॉर्नर या ठिकाणच्या कॉलनीला केशवानंदनगर असे नांव देण्यात यावे व सदरील रस्त्यावर कै.केशवानंदलाल मार्गे प्रवेशद्वार उभारण्याकरीता या भागातील नागरीकांनी मागणी केलेली असल्याने सदरील प्रवेशद्वार उभारण्याचा खर्च लोक वर्गणीतून करण्यात येणार आहे.

करीता कासलीवाल कॉर्नर या ठिकाणच्या कॉलनीला केशवानंदनगर असे नांव देण्याचा व कै.केशवानंदलाल मार्गे प्रवेशद्वार उभारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७३ सिडको एन-२ कासलीवाल कॉर्नर या ठिकाणच्या कॉलनीला केशवानंदनगर असे नांव देण्यास नियमानुसार कार्यवाही करणेस व सदरील रस्त्यावर कै.केशवानंदलाल मार्गे प्रवेशद्वार या भागातील नागरीकांनी सदरील प्रवेशद्वार उभारण्याचा खर्च लोक वर्गणीतून करण्यास व कै.केशवानंदलाल मार्गे प्रवेशद्वार उभारण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०३१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, ०१. वॉर्ड क्र.६४ क्रांतीचौक प्रभागातील पन्नालालनगर येथे बांधण्यात आलेले सभागृह श्री.अष्टविनायक ग्रंथालय या संस्थेस भाडे तत्वावर देण्यांत यावे. ०२.वॉर्ड क्र.६४ क्रांतीचौक प्रभागातील श्रेयनगर येथे मा.आ.श्री.विलासजी अवचट यांच्या स्थानिक विकास निधीतून बांधण्यात आलेले सभागृह गीता ज्ञानेश्वरी स्वाध्याय व सांस्कृतिक मंडळ या संस्थेस भाडे तत्वावर देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ०१. वॉर्ड क्र.६४ क्रांतीचौक प्रभागातील पन्नालालनगर येथे बांधण्यात आलेले सभागृह श्री.अष्टविनायक ग्रंथालय या संस्थेस नियमानुसार भाडे तत्वावर देण्यांस मान्यता देण्यांत येते. तसेच ०२.वॉर्ड क्र.६४ क्रांतीचौक प्रभागातील श्रेयनगर येथे मा.आ.श्री.विलासजी अवचट यांच्या स्थानिक विकास निधीतून बांधण्यात आलेले सभागृह गीता ज्ञानेश्वरी स्वाध्याय व सांस्कृतिक मंडळ या संस्थेस नियमानुसार भाडे तत्वावर देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०३२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे गारखेडा येथील स.नं.५०/१,५१/१ व ५३ या मिळकतीतून २४.०० मी.रूंद व १५.०० मी.रूंद विकास योजना रस्ता जातो या रस्त्याच्या बाधीत भागाची मालकी डॉ.आर.पी.नाथ व राजेंद्र लक्ष्मण पवार यांची असून सदरील विकास योजना रस्त्याच्या परिसराचा विकास झाला असल्याने या जागेवर वहीवाट सुरू आहे. तथापी विकास योजना रस्त्याने बाधीत जागा मूळ जमीन मालकाने कायदेशीर नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केली नाही तसेच या जागेचे भूमी संपादन अधिनियम १८९४ अन्वये भूसंपादन करण्यात आले नाही. म्हणजेच सदरील जागेवर अनाधिकृतपणे वहीवाट असली तरी कायदेशीर मालकी अथवा ताबा महानगरपालिकेचा नाही. या भागातील नागरीकांच्या सोईसाठी सदरील २४.० मी. व १५.० मी.रस्त्याचा विकास होणे आवश्यक आहे व याकरीता रस्ता रूंदीने बाधीत जागा नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेला हस्तांतरीत करून

घेणे व जागेचा रितसर ताबा घेणे आवश्यक आहे. या करीता मूळ जमीन मालकास जागेचा मोबदला पैशाच्या स्वरूपात, एफ.एस.आय.च्या स्वरूपात किंवा (टी.डी.आर.) विकास हक्क हस्तांतराच्या स्वरूपात देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने पैशाच्या स्वरूपात मोबदला देणे लोकहिताचे ठरणार नाही. करीता संबंधीत जमीन मालकांना २४.० मी. व १५.० मी.रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत जागेच्या मोबदल्यात नियमानुसार देय असलेला टी.डी.आर. (विकास हक्क हस्तांतरण) देण्यास मान्यता व्हावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजय केनेकर अनुमोदक : श्री.संजय रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे गारखेडा येथील स.नं.५०/१,५१/१ व ५३ या मिळकतीतून २४.०० मी.रूंद व १५.०० मी.रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत होणाऱ्या संपूर्ण क्षेत्रासाठी अनुज्ञेय होणारे टी.डी.आर. (हस्तांतरणीय विकास हक्क) या रस्त्याने बाधित क्षेत्राचे मालकांना नियमानुसार देण्यास आणि रस्त्याने बाधित क्षेत्राचे मालकाकडून याकरीता रस्ता रूंदीने बाधीत जागा नोंदणीकृत दस्तऐवजाने महानगरपालिकेला हस्तांतरीत करून घेणे व जागेचा रितसर ताबा घेणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.४ वानखेडेनगर एन-१३ येथे गेल्या २० ते २५ वर्षापासून काही नागरी वसाहती आहेत. व काही पूर्णतः नविन वसाहती वसलेल्या आहेत. प्रभाग क्र.४ मध्ये एकूण १५ नागरी वसाहती आहेत त्या काही दलित वसाहती काही हिंदू मुस्लीम मध्यम वर्गीय व इतर अशा सर्व स्तरातील व समाजातील नागरीकांच्या वसाहती आहेत. काही सिडको विकसीत वसाहती आहेत त्यांची एकंदरीत लोकसंख्या २०,००० पेक्षा जास्त आहेत. व मतदार संख्या ७८०० आहे. सदरील आकडेवारी ही २००१ च्या जनगणनेनुसार आहे. व प्रभागात एकूण घरे ४००० आहेत. नव्याने विकसीत झालेल्या जटवाडा रोड,सारावैभव ४२० घरे,सुधीर हनुमाननगर, खाजा गरीब नवाजनगर,राहुलनगर २०० घरे सेंट्रल जेल क्वॉर्टर ३०० घरे, तक्षशिलानगर, एकतानगर १५०० घरे एन १३ सी सेक्टर डी सेक्टर भरतनगर बेघर योजना अशी ५०० घरे, वानखेडेनगर २२० घरे महेमुदपुरा (वाडा), मुज्जफरनगर ४०० घरे व जहाँगीर कॉलनी ३०० घरे अशी घरे असून या प्रभागात २०,००० लोकसंख्या असतांना व १७ वसाहती असतांना फक्त एक रेशन दुकान आहे. ज्याचा क्र.१४४ आहे. यामध्ये फक्त १५-२० टक्के लोकांना रेशन कार्ड असून सर्व सामान्यांना दैनंदिन गरजेसाठी जीवनावश्यक वस्तुकरीता त्रास सहन करावा लागतो. या सर्व बाबींचा विचार करता या भागातील नागरीकांसाठी किमान आणखी दोन रेशन दुकांनाची अत्यंत आवश्यकता आहे. अशाच पध्दतीने काही प्रभागात अशाच पध्दतीचा सर्व्हे करून रेशन दुकानाची आवश्यकता तपासून देण्यांत यावी. करीता दोन रेशन दुकान या प्रभागात देणे करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर व तसेच मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयास कळविणेस सादर.

सुचक : श्री.रविकांत काशिनाथ गवळी अनुमोदक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.४ वानखेडेनगर एन-१३ येथील नव्याने विकसीत झालेल्या जटवाडा रोड,सारावैभव ४२० घरे,सुधीर हनुमाननगर, खाजा गरीब नवाजनगर,राहुलनगर २०० घरे सेंट्रल जेल क्वॉर्टर ३०० घरे, तक्षशिलानगर, एकतानगर १५०० घरे एन १३ सी सेक्टर डी सेक्टर भरतनगर बेघर योजना अशी ५०० घरे, वानखेडेनगर २२० घरे महेमुदपुरा (वाडा), मुज्जफरनगर ४०० घरे व जहाँगीर कॉलनी ३०० घरे अशी घरे असून या प्रभागात २०,००० लोकसंख्या असल्यामूळे, व १७ वसाहती असतांना फक्त एक रेशन दुकान असून ज्याचा क्र.१४४ आहे. यामध्ये फक्त १५-२० टक्के लोकांना रेशन कार्ड असून सर्व सामान्यांना दैनंदिन गरजेसाठी जीवनावश्यक वस्तुकरीता त्रास सहन करावा लागतो. या सर्व बाबींचा विचार करता या भागातील नागरीकांसाठी किमान आणखी दोन रेशन दुकांनाची अत्यंत आवश्यकता आहे. अशाच पध्दतीने

काही प्रभागात अशाच पध्दतीचा सर्व्हे करून रेशन दुकानाची आवश्यकता तपासून देण्यांस व दोन रेशन दुकान या प्रभागात शिफारस करून जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्या कार्यालयास कळविणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-११ येथील एच-१२ समोरील चौकास तेथील नागरीकांच्या मागणीनुसार शहीद भगतसिंग चौक असे नांवे देणे योग्य राहील.

करीता उपरोक्त प्रमाणे, एन-११ येथील एच-१२ समोरील चौकास तेथील नागरीकांच्या मागणीनुसार शहीद भगतसिंग चौक असे नांव देणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब ताठे,श्री.अशोक विरकर

अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन,श्री.महेश माळवतकर,श्री.बाबासाहेब डांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-११ येथील एच-१२ समोरील चौकास शहीद भगतसिंग चौक असे नांव देणेस नियमानुसार कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एन-११ येथील कै.पुंडलिकराव ताठे सभागृह,गजानननगर हे महानगरपालिकेने बांधलेले सभागृह आहे. हे सभागृह जय श्रीराम महिला बहुउद्देशीय शैक्षणिक संस्थेस भाडे तत्वावर देण्याबाबत संबंधितांनी विनंती केलेली आहे.

सदरील संस्था ही महिलांची संस्था आहे. या भागातील प्रसिध्द संस्था आहे. महिला सबलीकरणांच्या दृष्टीकोनातून सदरील संस्थेस उक्त सभागृह २५ वर्षाच्या भाडे तत्वावर दिल्यास महानगरपालिकेस आर्थिक फायदा व सदर हॉलची देखभाल होईल. करिता हे सभागृह महानगरपालिकेच्या नियम व अटींच्या अधीन राहून जय श्रीराम महिला बहुउद्देशीय शैक्षणिक संस्थेस भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे,श्री.संजु रिडलॉन

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे,श्री.अशोक विरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-११ येथील कै.पुंडलिकराव ताठे सभागृह,गजानननगर हे महानगरपालिकेने बांधलेले सभागृह जय श्रीराम महिला बहुउद्देशीय शैक्षणिक संस्थेस २५ वर्षाच्या भाडे तत्वावर महानगरपालिकेच्या नियम व अटींच्या अधीन राहून नियमानुसार देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४९ मधील सिडको नाट्यगृहासमोरील व जीजामाता हाऊसिंग सोसायटी शेजारील मनपाची जागा येथील रमा प्रतिष्ठाण सेवाभावी संस्थेच्या लोकोपयोगी कार्य करण्यासाठी भाडे तत्वावर देण्यांत यावी. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशोक विरकर

अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमगांवकर,श्री.विजय खुडे,श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील सिडको नाट्यगृहासमोरील व जीजामाता हाऊसिंग सोसायटी शेजारील मनपाची जागा येथील रमा प्रतिष्ठाण सेवाभावी संस्थेच्या लोकोपयोगी कार्य करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करून भाडे तत्वावर देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४९ मधील सावरकरनगर येथील मनपाच्या सभागृहास आद्य क्रांतीकारक बळवंत वासुदेव फडके सभागृह असे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक:श्री.अशोक विरकर अनुमोदक:श्री.मोहन मेघावाले,श्री.संजय केनेकर,श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील सावरकरनगर येथील मनपाच्या सभागृहास आद्य क्रांतीकारक बळवंत वासुदेव फडके सभागृह असे नांव नियमानुसार कार्यवाही करून देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४९ मधील सावरकरनगर येथील किलबिल शाळेच्या शेजारील साने गुरूजी सोसायटी मधील हरीतपट्टा व खुले मैदानास ज्येष्ठ समाजसेवक कै.काशिनाथ हरिभाऊ भराडकर यांचे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक:श्री.अशोक विरकर अनुमोदक:श्री.मोहन मेघावाले,श्री.संजय केनेकर,श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील सावरकरनगर येथील किलबिल शाळेच्या शेजारील साने गुरूजी सोसायटी मधील हरीतपट्टा व खुले मैदानास ज्येष्ठ समाजसेवक कै.काशिनाथ हरिभाऊ भराडकर यांचे नांव नियमानुसार कार्यवाही करून देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझे वॉर्ड क्र.४९ मधील मोहल्ला गुलमोहर कॉलनी येथील रहिवासीयांच्या मागणीनुसार देशमुख सायकल मार्ट पासून ते सिडको नाट्यगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यास पद्मश्री कैलासजी मानव मार्ग यांचे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशोक विरकर अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमगांवकर,श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील मोहल्ला गुलमोहर कॉलनी येथील देशमुख सायकल मार्ट पासून ते सिडको नाट्यगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यास पद्मश्री कैलासजी मानव मार्ग असे नांव नियमानुसार कार्यवाही करून देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४९ मधील सावरकरनगर येथील खुल्या जागेतील उद्यानास विनायक दामोधर सावरकर यांचे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक:श्री.अशोक विरकर अनुमोदक:श्री.मोहन मेघावाले,श्री.संजय केनेकर,श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९ मधील सावरकरनगर येथील खुल्या जागेतील उद्यानास विनायक दामोधर सावरकर यांचे नांव नियमानुसार कार्यवाही करून देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील लीग रग्बी खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर वाव मिळावा या उद्देशाने राष्ट्रीय महापौर चषक लीग रग्बी स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र रग्बी असोसिएशन औरंगाबाद या राज्य संघटनेमार्फत आयोजीत करण्यांत येवून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अशोक गोरखनाथ विरकर अनुमोदक : श्री.विजय खुडे,श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील लीग रग्बी खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर वाव मिळावा या उद्देशाने राष्ट्रीय महापौर चषक लीग रग्बी स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र रग्बी असोसिएशन औरंगाबाद या राज्य संघटनेमार्फत नियमानुसार आयोजीत करण्यांस व त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४८ मधील मोहल्ला अविष्कार कॉलनी येथील रामेश्वर मेडीकल पासून ते अविष्कार क्रिडा मैदानपर्यंत जाणाऱ्या रस्त्याला औरंगाबाद शहरातील प्रथमच महामंडळेश्वर पदवी मिळालेले संत श्री.श्री.श्री.१००८ महामंडळेश्वर सद्गुरू दत्तात्रय महाराज दहिवाल मार्ग यांचे नांव या रस्त्यास देण्यांसाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.अशोक विरकर

अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमागांवकर,श्री.संजु रिडलॉन,श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४८ मधील मोहल्ला अविष्कार कॉलनी येथील रामेश्वर मेडीकल पासून ते अविष्कार क्रिडा मैदानपर्यंत जाणाऱ्या रस्त्याला औरंगाबाद शहरातील प्रथमच महामंडळेश्वर पदवी मिळालेले संत श्री.श्री.श्री.१००८ महामंडळेश्वर सद्गुरू दत्तात्रय महाराज दहिवाल मार्ग यांचे नांव नियमानुसार कार्यवाही करून या रस्त्यास देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.४८ मधील मोहल्ला अविष्कार कॉलनी येथील मनपाच्या उद्यानास रहिवासीयांच्या मागणीनुसार स्व.प्रा.ओमप्रकाश नरसिंग शिंदे यांचे नांव देण्यांत यावे संबंधीतांचे परिवार या उद्यानाची देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यास तयार आहेत त्यांना उद्यान देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी दिर्घकाळासाठी देण्यांत यावी. जेणेकरून मनपास आर्थिक फायदा होवून उद्यानाची देखभाल दुरूस्तीचे कामेही होण्यास सोईस्कर होईल. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.अशोक विरकर

अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमागांवकर,श्री.संजु रिडलॉन,श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४८ मधील मोहल्ला अविष्कार कॉलनी येथील मनपाच्या उद्यानास स्व.प्रा.ओमप्रकाश नरसिंग शिंदे यांचे नांव नियमानुसार कार्यवाही करून देण्यांस मान्यता देण्यांत येते. तसेच संबंधीतांचे परिवार या उद्यानाची देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यास तयार असल्यामूळे,त्यांना उद्यान देखभाल व दुरूस्तीची जबाबदारी दिर्घकाळासाठी नियमानुसार देण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदल करण्यांत यावा.

| पा.क्र. | अ.क्र. | जूने लेखाशिर्ष | रक्कम लाखात | सुधारीत कामाचे नांव | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|---|
| GBR G-२ | १० | शहरातील विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक, वॉचमन करिता खोल्या बांधणे | ५० | वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर अंतर्गत दशमेशनगर येथील रेखाकंनातील खुल्या जागेत शेड बांधणे | १५ |

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदल करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

| पा.क्र. | अ.क्र. | जूने लेखाशिर्ष | रक्कम लाखात | सुधारीत कामाचे नांव | रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|---|
| GBR G-२ | १० | शहरातील विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक, वॉचमन करिता खोल्या बांधणे | ५० | वॉर्ड क्र.८९ ज्योतीनगर अंतर्गत दशमेशनगर येथील रेखाकंनातील खुल्या जागेत शेड बांधणे | १५ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात पृक्र.जीबीआर-डी-५ वर समर्थनगर येथील विर सावरकर चौकात विद्युतीकरण व सौदर्यीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.५ लक्ष तरतुद उपलब्ध आहे. स्वातंत्र्यसैनिक श्री.सावरकर यांच्या संघर्षमय जिवनातील दृश्य त्यांच्या पुतळया मागील भिंतीवर फायबर ऑप्टीकल मध्ये लावणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :सौ.कला बोरामणीकर

अनुमोदक :श्री.सतिष विश्वनाथ कटकटे,श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००९-२०१० च्या अर्थसंकल्पात पृक्र.जीबीआर-डी-५ वर समर्थनगर येथील विर सावरकर चौकात विद्युतीकरण व सौदर्यीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु.५ लक्ष तरतुद उपलब्ध असल्यामूळे, स्वातंत्र्यसैनिक श्री.सावरकर यांच्या संघर्षमय जिवनातील दृश्य त्यांच्या पुतळया मागील भिंतीवर फायबर ऑप्टीकल मध्ये लावणेकरीता नियमानुसार कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला वाव मिळावा या उद्देशाने टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन ऑफ औरंगाबाद संघटनेमार्फत आयोजन करण्यात येऊन त्यांनाही आर्थिक तरतूद करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.संजू रिडलॉन अनुमोदक : श्री.मोहन मेघावाले,श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला वाव मिळावा या उद्देशाने टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन ऑफ औरंगाबाद संघटनेमार्फत आयोजन करण्यात येऊन नियमानुसार आर्थिक तरतूद करण्यास मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र. १०४७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद लायन्स क्लब हे औरंगाबाद लायन्स क्लब ब्लड बँक उस्मानपुरा येथे उभारणार आहे. त्याकरीता या ब्लड बँक उभारणी करता महानगरपालिकेचा सुध्दा सहभाग असावा असे संबंधीत ब्लड बँक यांच्या वतीने कळविलेले असल्याने सदरील ब्लड बँक उभारणी करता महानगरपालिका फंडातून आर्थिक निधी रक्कम रू.०५ लक्ष (पाच लक्ष मात्र) उपलब्ध करून द्यावे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल,श्री.संजय शिरसाट

अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी,श्री.भाऊसाहेब वाघ,श्री.रेणुकादास वैद्य,डॉ.भागवत कराड, सौ.लता दलाल,श्री.संजय केनेकर,श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद लायन्स क्लब हे औरंगाबाद लायन्स क्लब ब्लड बँक उस्मानपुरा येथे उभारणार असल्यामूळे, त्याकरीता या ब्लड बँक उभारणी करता महानगरपालिकेचा सुध्दा सहभाग असावा असे संबंधीत ब्लड बँक यांच्या वतीने कळविलेले असल्याने सदरील ब्लड बँक उभारणी करता महानगरपालिका फंडातून र.रू.५.०० लक्ष नियमानुसार आर्थिक निधी उपलब्ध करून देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, स्लम घोषित वॉर्ड क्र.९२ कबीरनगर अंतर्गत मिलींदनगर या वसाहतीमध्ये सन १९९० पासून गोरगरीब मागासवर्गीय लोक राहतात तसेच महानगरपालिका औरंगाबादचा मालमत्ता कर सुध्दा भरतात. दि.१७.०२.२०१० रोजी रेल्वे जमीन संपादनामध्ये मिलींदनगर येथील गोरगरीब मागासवर्गीय काही लोक विस्तापित झालेले आहेत. त्यांना औरंगाबाद शहरामध्ये कूठेही त्यांचा स्वत:च्या मालकीचा प्लॉट नाही. दररोज मोलमजुरी करणारे लोक असल्यामूळे त्यांचा संसार पूर्णपणे उघड्यावर येवून बेघर झालेले आहेत. मानवतेच्या दृष्टीकोणातून विस्तापित गंगाधर भगवान कांबळे,शेषराव श्रावण प्रधान,सुर्यकांत राजाराम आचार्य,विक्रम नाथा उमप, श्रीराम शिवाजी वाघमारे,सारिकाबाई राणू,संजय हिरामन गायकवाड,दिपक सुर्यभान सातदिवे, दिलीप किसनराव ससाने,शामसिंग बनियासिंग,तारासिंग कल्याणी,शशिकलाबाई गौतम,शोभाबाई भिमराव,सलोकसिंग अवतारसिंग,दिपकसिंग अवतारसिंग,पार्वताबाई राजुसिंग इत्यादी लोक विस्तापित आहेत. यांची महानगरपालिका हर्सूल सर्वे नं.२१७ मध्ये विस्तापिताची महानगरपालिकेने अल्पशी रक्कम घेवून नियमानुसार त्यांना प्लॉट देवून त्यांना आधार द्यावा व त्यांचे पुनर्वसन करावे आणि या प्रस्तावास मंजूरी द्यावी.

सुचक : श्री.के.व्ही.मोरे अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे, श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्लम घोषित वॉर्ड क्र.९२ कबीरनगर अंतर्गत मिलींदनगर या वसाहतीमध्ये सन १९९० पासून गोरगरीब मागासवर्गीय लोक राहतात दि.१७.०२.२०१० रोजी रेल्वे जमीन संपादनामध्ये मिलींदनगर येथील गोरगरीब मागासवर्गीय काही लोक विस्तापित झालेले असल्यामूळे, विस्तापित गंगाधर भगवान कांबळे,शेषराव श्रावण प्रधान,सुर्यकांत राजाराम आचार्य, विक्रम नाथा उमप,श्रीराम शिवाजी वाघमारे,सारिकाबाई राणू,संजय हिरामन गायकवाड, दिपक सुर्यभान सातदिवे, दिलीप किसनराव ससाने,शामसिंग बनियासिंग,तारासिंग कल्याणी, शशिकलाबाई गौतम,शोभाबाई भिमराव,सलोकसिंग अवतारसिंग,दिपकसिंग अवतारसिंग,पार्वताबाई राजुसिंग इत्यादी विस्तापित लोकांना नियमानुसार त्यांचे पुनर्वसन करणे अनुज्ञेय होत असल्यास महानगरपालिका हर्सूल सर्वे नं.२१७ मध्ये विस्तापिताची महानगरपालिकेने अल्पशी रक्कम घेवून नियमानुसार देय होत असल्यास कार्यवाही करून त्यांचे पुनर्वसन करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जयहिंद कॉलनी निराला बाजार रोड येथील सी.टी.एस.नं. १७८०४ येथील सिटी मार्बल बिल्डींगमध्ये असलेल्या महानगरपालिकेचा हॉल असून त्यास श्री.वरखेडेश्वरी लक्ष्मी माता हॉल असे नांव देण्यासाठी येथील नागरीकांची मागणी होत आहे.

करीता सदरील हॉलला श्री.वरखेडेश्वरी लक्ष्मी माता हॉल असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.बोरामणीकर कला सुरेश अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,जयहिंद कॉलनी निराला बाजार रोड येथील सी.टी.एस.नं. १७८०४ येथील सिटी मार्बल बिल्डींगमध्ये असलेल्या हॉलला श्री.वरखेडेश्वरी लक्ष्मी माता हॉल असे नांव नियमानुसार कार्यवाही करून देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, खालील प्रमाणे अर्थसंकल्पातील खालील लेखाशिर्षकात १० लक्ष तरतुद उपलब्ध करुन त्यामधील ५.०० लक्ष सुधारीत लेखाशिर्षकात वळती करुन विकास कामे होण्याच्या दृष्टीकोणतुन प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | लेखाशिर्षक | सुधारीत लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | अर्थसंकल्प पान क्र.जीबीआर-एफ-१ अ.क्र.१ वर वार्ड क्र.६७ अंतर्गत विविध ठिकाणी पुनर्डाबरीकरण करणे या कामासाठी १० लक्ष तरतुद करण्यात आली. | वार्ड क्र ६७ बौध्दनगर व शिवशंकर कॉलनी भागात ड्रेनेज लाईन टाकणे २५० मी रक्कम रु.५ लक्ष |

सुचक : श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालीलप्रमाणे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षकात नियमानुसार बदल करणेस मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र | लेखाशिर्षक | सुधारीत लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | अर्थसंकल्प पान क्र.जीबीआर-एफ-१ अ.क्र.१ वर वार्ड क्र.६७ अंतर्गत विविध ठिकाणी पुनर्डाबरीकरण करणे या कामासाठी १० लक्ष तरतुद करण्यात आली. | वार्ड क्र ६७ बौध्दनगर व शिवशंकर कॉलनी भागात ड्रेनेज लाईन टाकणे २५० मी रक्कम रु.५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, स्लम घोषीत वार्ड क्र.९२ कबीरनगर या वार्डातील नागसेननगर या वसाहतीमध्ये समाज मंदिर आहे जे जुने व जीर्ण झालेले असून कधीही अनूचित घटना इमारत कोसळून घडू शकते. या इमारतीच्या जवळ कुणीही जात नाही व फिरत नाही. मात्र या इमारती भोवती लाहन-लहान मुलांची वर्दळ कायम राहते ही इमारत कोसळल्यास मानव हानी होवू शकते. ही घटना टळावी, मानव हानी होऊ नये म्हणून सदरची इमारत पाडण्यासाठी सर्वसाधारण सभेने या प्रस्तावास मंजुरी द्यावी.

सुचक : श्री.के.व्ही.मोरे अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्लम घोषीत वार्ड क्र.९२ कबीरनगर या वार्डातील नागसेननगर या वसाहतीमध्ये समाज मंदिर आहे जे जुने व जीर्ण झालेले असल्यामूळे, सदरची इमारत पाडण्यास नियमानुसार कार्यवाही करणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील योगा खेळाडूंना राज्यस्तरावर वाव मिळावा या उद्देशाने राज्यस्तरीय महापौर चषक योगासन स्पर्धेचे आयोजन औरंगाबाद जिल्हा योग संघटनेमार्फत आयोजित करण्यात येऊन त्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विमल तुकाराम बेंद्रे अनुमोदक :श्री.भगवान घडमोडे,श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील योगा खेळाडूंना राज्यस्तरावर वाव मिळावा या उद्देशाने राज्यस्तरीय महापौर चषक योगासन स्पर्धेचे

आयोजन औरंगाबाद जिल्हा योग संघटनेमार्फत आयोजित करण्यात येऊन त्यासाठी नियमानुसार आर्थिक तरतुद करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील कराटे खेळाडूंना राज्यस्तरावर वाव मिळावा,या उद्देशाने राज्यस्तरीय महापौर चषक कराटे आयोजन औरंगाबाद जिल्हा कराटे संघटनेमार्फत आयोजित करण्यात येऊन त्यांनाही आर्थीक तरतुद करण्यात यावी. करीता प्रस्ताव मी सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :डॉ.भागवत कराड अनुमोदक :श्री.संजय जोशी,श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सन २००९-२०१० औरंगाबाद शहरातील कराटे खेळाडूंना राज्यस्तरावर वाव मिळावा,या उद्देशाने राज्यस्तरीय महापौर चषक कराटे आयोजन औरंगाबाद जिल्हा कराटे संघटनेमार्फत आयोजित करण्यात येऊन त्यांनाही नियमानुसार आर्थीक तरतुद करण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक २०.०२.२०१० साठी वरील विषयास अनुसरुन वार्ड क्र.८६ इंदिरानगर अर्थसंकल्पातील तरतुदी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| GBRF-२ नविन डांबरी रस्ते (स्लम) अ.क्र.२ | बजरंगनगर येथे डांबरी रस्ता करणे १०.०० लाख | १. इंदिरा नगर येथे विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे व दुरुस्त करणेची किरकोळ कामे करणे. रु.५.०० लाख.<br>२. इंदिरानगर येथे विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे व दुरुस्तीची किरकोळ कामे करणे रु.५.०० लक्ष. |

वरील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे ही विनंती.

सुचक :सौ.वंदना प्रकाश खंदारे अनुमोदक :श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८६ इंदिरानगर अर्थसंकल्पातील तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे लेखाशिर्ष नियमानुसार बदलण्यास मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| GBRF-२ नविन डांबरी रस्ते (स्लम) अ.क्र.२ | बजरंगनगर येथे डांबरी रस्ता करणे १०.०० लाख | १. इंदिरा नगर येथे विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे व दुरुस्त करणेची किरकोळ कामे करणे. रु.५.०० लाख.<br>२. इंदिरानगर येथे विविध ठिकाणी जलनि:सारण वाहिनी टाकणे व दुरुस्तीची किरकोळ कामे करणे रु.५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र. १७ येथील N-९ H सेक्टर कडून किर्ती मंगल कार्यालयाकडे जाणाऱ्या व N-९ सत्संग भवन कडून येणाऱ्या चौकास भारतमाता चौक असे नांव देण्याबाबत येथील नागरीकांची मागणी आहे. सदर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१७ येथील N-९ H सेक्टर कडून किर्ती मंगल कार्यालयाकडे जाणाऱ्या व N-९ सत्संग भवनकडून येणाऱ्या चौकास भारतमाता चौक असे नांव नियमानुसार कार्यवाही करून देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७९ या ठिकाणी मा.खासदार श्री.राजकुमार धुत यांच्या स्वेच्छा निधीतून हॉल बांधण्यात आलेले आहे. सदरील भाग हा स्लम घोषित असून या प्रभागातील नागरीकांनी या ठिकाणी हेल्थ क्लब व अभ्यासिका केंद्र सुरू करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. करीता सदरील हेल्थ क्लब व अभ्यासिका केंद्र सुरू करण्यासाठी कुलदैवत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांनी सदरील हॉल भाडे तत्वावर चालविण्याची तयारी दर्शविलेली आहे.

करीता सदरील संस्थेस सदरील हॉल कमीत कमी दराने भाडे तत्वावर मनपाच्या अटी शर्ती नुसार भाडे तत्वावर देण्याकरीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल

अनुमोदक : सौ.शोभा हरिश्चंद्र मिटकर,श्री.बन्सीलाल तुळशीराम गांगवे (मामा),सौ.कला बोरामणीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९ या ठिकाणी मा.खासदार श्री.राजकुमार धुत यांच्या स्वेच्छा निधीतून हॉल बांधण्यात आलेल्या हॉलमध्ये हेल्थ क्लब व अभ्यासिका केंद्र सुरू करण्यास व सदरील हेल्थ क्लब व अभ्यासिका केंद्र सुरू करण्यासाठी कुलदैवत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांना भाडे तत्वावर नियमानुसार चालविण्यास देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रमांक ७६ श्रीरामनगर येथील डांबरीकरण करणे या कामासाठी पा.क्र.एससीआर-१ अ.क्र.३ वर असलेल्या तरतुदीमधून र.रू.३.०० लक्ष उर्वरित आहे. सदरील उर्वरित र.रू.३.०० लक्ष वॉर्ड क्र.७६ मध्ये फुटकळ कामे करणेसाठी वळती करण्यांत यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक ७६ श्रीरामनगर येथील डांबरीकरण करणे या कामासाठी पा.क्र.एससीआर-१ अ.क्र.३ वर असलेल्या तरतुदीमधून र.रू.३.०० लक्ष उर्वरित असल्यामूळे, नियमानुसार उर्वरित र.रू.३.०० लक्ष वॉर्ड क्र.७६ मध्ये फुटकळ कामे करणेसाठी वळती करण्यांस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.९६ मधील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंगल कार्यालयास माझ्या वॉर्डातील जूने सामाजिक कार्यकर्ते स्व.मोमीन सरदार खान असे नांव देण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मोमीन सफिया फिरदौस अय्युब खान

अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल, श्रीमती अजरा जबीन मसुद खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९६ मधील औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंगल कार्यालयास नियमानुसार स्व.मोमीन सरदार खान असे नांव देण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाने नॅशलन लेक कॉन्झर्वेशन प्लॅन व नॅशनल रिव्हर कॉन्झर्वेशन प्लॅन हे कार्यक्रम हाती घेतले असून, या कार्यक्रमांतर्गत भारतातील नद्यांचे व तलावांचे पुढील भविष्यासाठी संवर्धन व सौंदर्यीकरण करुन ते पर्यटन केंद्र म्हणुन विकसीत करणे आदी केंद्र शासनाचे उद्देश आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून अनुदान स्वरुपात निधी उपलब्ध होणार असून, तो प्रकल्प

खर्चाच्या ७०टक्के केंद्र शासन अनुदान आणि उर्वरीत ३०टक्के स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग असा वित्तीय आकृतीबंध आहे.

या प्रकल्पांतर्गत शहरातील नदी, तलावांचे संवर्धन करणे, सौंदर्यीकरण करणे, नदी/ तलावाचा परिसर पर्यटन क्षेत्र म्हणुन विकसीत करणे, पर्यटकांसाठी कॅफेटेरिया तयार करणे, बोटींगची सुविधा करणे, व इतर अनुषंगीक उपांगे विकसीत करणे इत्यादी कामाचे सर्वसाधारण स्वरुप आहे. उक्त विषयास अनुसरुन औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील ओव्हर (खाम) हर्सूल तलावाचा संवर्धन, विकास व सौंदर्यीकरण करणे योग्य वाटते. सदर तलावाची उभारणी सन १९५२ साली झालेली असून, सन १९८२ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण झालेले आहे. प्राप्त अभिलेखानुसार ओव्हर (खाम) हर्सूल तलावाखालील पाणलोट क्षेत्र ६५चौ.कि.मी क्षेत्रात विस्तारलेले आहे. सदर तलाव शहरातील काही भागाची पाण्याची गरज काही प्रमाणात का होईना भागवतो आहे. दरवर्षी होणाऱ्या पर्जन्यमानामुळे सदर तलाव भरुन ओव्हरफ्लो होतो. सदर तलावाचा सांडवा २१५ मी. लांब अशा क्षेत्रात विस्तारलेला आहे. तसेच ओव्हर (खाम) तलावाचा भाग हा राज्य महामार्गालगत असून, याच रस्त्यावर पुढे अजिंठा लेणी असल्याने पर्यटकांचा जास्त ओढा या भागाकडे असतो. त्यामुळे व केंद्र शासनाकडून अशा स्वरुपाच्या प्रकल्पासाठी मिळणारे अनुदान इत्यादी बाबी लक्षात घेता, या योजने अंतर्गत ओव्हर (खाम) तलावाचा समावेश करणे योग्य वाटते. प्रकरणी स्थळाची पाहणी या क्षेत्रातील तज्ञ व केंद्र शासनाशी संबंधीत प्रकल्प संकल्पनार्थी श्रीमती पल्लवी लाटकर, संचालिका, ग्रास रुट्स रिसर्च ॲण्ड कन्सलटंन्सी सर्व्हीसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई यांनी केली असून, त्यांनी सदर स्थळ लेक कॉन्झर्वेशन व सौंदर्यीकरणासाठी योग्य असल्याचे मत त्यांचेशी चर्चा करताना नमूद केले आहे.

त्यास्तव सदर स्थळाचा विकास करणे योग्य वाटते. वर नमूद नुसार श्रीमती लाटकर या क्षेत्रातील तज्ञ असून, त्यांनी यापूर्वी अशा स्वरुपाच्या प्रकल्पांवर उदा. माथेरान, धुळे, ठाणे व नागपुर शहराचे ठिकाणी प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन कामे केलेली आहेत. त्यांनी अशा प्रकल्पांवर काम करीत असताना एक प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन स्थानिक स्वराज्य संस्था/प्राधिकरणाची कामे केली आहेत. अशा स्वरुपाची कामे करीत असतांना त्यांनी केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाशी संपर्क ठेऊन निधी मिळवून देणे बाबत मदत केलेली आहे.

औरंगाबाद शहर एक ऐतिहासीक शहर असून, जागतिक दर्जाचे एक पर्यटन केंद्र म्हणुन मान्यता पावलेले शहर आहे. या कारणाने येथे पर्यटकांचा मोठा ओढा असतो. या शिवाय आजही सदर तलाव शहराच्या पाणी पुरवठ्यात सहभाग नोंदवित असल्याने या स्थळाचा प्रथम प्राधान्याने विकास करणे आवश्यक वाटते.

त्यास्तव सदर प्रकल्पाचा एकुण आढावा घेणेसाठी उक्त नमूद प्रमाणे श्रीमती पल्लवी लाटकर यांचा प्रदीर्घ अनुभव, उपयोगीता/मदत लक्षात घेता त्यांची या प्रकल्पासाठी प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन नेमणूक करणे व सदरचा प्रकल्प हाती घेणेसाठी धोरणात्मक बाब म्हणुन मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त नमूद प्रमाणे या प्रकल्पासाठी केंद्र शासनाचे ७०टक्के अनुदान व ३०टक्के महानगरपालिकेचा सहभाग राहणार असून, प्रकल्प संकल्पनार्थी चे शुल्क एकुण प्रकल्प खर्चाच्या अंदाजे ८ टक्के राहणार आहे. करीता सदर प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, संकल्पन करणे, अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्प पूर्ण होई पर्यंत देखभाल करणे यासह श्रीमती पल्लवी लाटकर यांची प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन नेमणूक करणे व प्रकल्पास धोरणात्मक बाब म्हणुन मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर. तसेच या प्रकरणी येथे नमूद करण्यात येते की, शासनाने या योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या इतर शहरातील प्रकल्पांसाठी सेंटेज चार्जेस म्हणून प्रकल्प खर्चाच्या ८% मंजूर केले आहेत तथापी आपल्याकडील प्रकल्पासाठी प्रकल्प संकल्पनार्थी यांना द्यावयाचे मानधन/फी देण्यापूर्वी शासनाकडून मार्गदर्शन घेवून पूढील कार्यवाही करण्यांत येईल.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात सविस्तर औरंगाबाद शहरातील हर्सूल परिसरातील खाम (ओव्हर) तलावाचे सौंदर्यीकरण करणे तसेच या तलावाचे संवर्धन करणे याकरीता केंद्र शासनाच्या मदतीने प्रकल्प राबविण्यास हरकत नाही. या प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून ७०टक्के अनुदान प्राप्त होणार आहे आणि महानगरपालिकेला प्रकल्प खर्चाच्या एकुण रक्कमे पैकी ३०टक्के वाटा उचलावा लागणार आहे. केंद्र शासनाच्या या योजनेचा लाभ घेण्याकरीता अशा प्रकारच्या प्रकल्पांची कामे यापूर्वी केलेल्या अनुभवी प्रकल्प संकल्पनार्थीची नेमणूक देखील करावी लागणार आहे. त्यामुळे (१) हर्सूल परिसरातील खाम (ओव्हर) धरण / तलावाची निवड केंद्र शासनाच्या नॅशनल लेक कॉन्झर्वेशन प्लॅन साठी करण्यात येते. (२) या प्रकल्पाच्या खर्चाचा महानगरपालिकेला ३०टक्के हिस्सा टाकण्याकरीता परवानगी / मान्यता देण्यात येते. आगामी अर्थसंकल्पात या प्रकल्पाकरीता आर्थिक तजवीज करणे करीता प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. (३) सदर प्रकल्पाकरीता प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन एकुण प्रकल्प किंमतीच्या ८ टक्के या दराने श्रीमती पल्लवी लाटकर, संचालिका, ग्रास रुट्स रिसर्च ॲण्ड कन्सलटंन्सी सर्व्हीसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येते.

प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर सभा राष्ट्रगिताने संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद